शनिवार । २६ डिसेंबर १९८१ । एक रुपया

माणूस

# राजकारण व एक कोटी झाडे

'या पुढे भारतातील शेतकरी विनाकारण गोळ्या खाणार नाहीत. तर डावपेचाचा एक भाग म्हणून आपण निवडणुका लढवू असे उद्‌गार शेतकरीनेते शरद जोशी यांनी नुकतेच निपाणी येथे शेतकरी मेळाव्यात बोलताना काढले.'

(केसरी दि. १९ डिसेंबर १९८१)

'केसरी' म्हणजे विश्वासार्हतेचे प्रतीक, असे सर्टिफिकेट प्रा. नरहर कुरुंदकर यांनी, औरंगाबाद येथे, केसरी शताब्दिमहोत्सवानिमित्त बोलताना नुकतेच दिलेले असल्याने, वरील बातमीविषयी शंका बाळगण्याचे तसे आता काहीच कारण नाही.

हे केव्हा तरी घडणे अटळच होते. जयप्रकाशांनादेखील शेवटी हे टोक गाठावेच लागले होते. जयप्रकाशांनी पक्षीय राजकारणात अनेक वर्षे काढली. निवडणुकांत भाग घेतला. त्यानंतर या सर्वांतून बाहेर पडून सर्वोदयात त्यांनी स्वतःला झोकून दिले; पण राजसत्ता जेव्हा जुलमी आणि अनिर्बंध झाली तेव्हा आपला पक्षीय राजकारणाला, निवडणुकांना असलेला विरोध बाजूला ठेवून, त्यांनी विरोधी पक्षांना एकत्र आणले, जनता पक्ष स्थापन केला व इंदिरा गांधींचा पराभव करून देश आणीबाणीच्या काळ्या कालखंडातून बाहेर काढला! जयप्रकाशांनी उभी केलेली ही शक्ती जरी पुढे फार काळ टिकली नाही तरी इंदिरा गांधींना या देशात पर्याय निर्माण होऊ शकतो, निदान २८ महिने तरी इंदिरा गांधींशिवाय देश चालू शकतो, महागाई थोडी कमी करता येते, परराष्ट्रांशी संबंध नीट ठेवता येतात, हे या जनता पक्षप्रयोगाने दाखवून दिलेच. स्वतः जयप्रकाश सत्तेवर असणे किंवा नसणे हा गौण भाग होता. त्यांना राजकारणाचा आखाडा घुमवणे शेवटी भाग पडले, ही वस्तुस्थिती आहे. इतिहासाची पुनरावृत्ती होते असे समजून पुन्हा दिल्लीमध्ये सध्या विरोधी पक्षांच्या एकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे. ही प्रक्रिया कशी काय गती व आकार धारण करते ते दिसेलच; पण अनुभव असा आहे की, इतिहासाची काही वेळा पुनरावृत्ती होत असली तरी ती जशीच्या तशी, कार्बन-कॉपीप्रमाणे होत नाही. नवीनच शक्ती पुढे येतात व जुन्याची केवळ गिरवागिरवी करणारे विस्मृतीत केव्हा गडप होतात, ते कळतही नाही. या दशकात शेतकऱ्यांची शक्ती देशभर पुढे येत आहे. ही शक्ती दडपून-चिरडून टाकण्याचा पवित्रा आज तरी इंदिरा-सत्तेने घेतलेला दिसतो. ही दडपशाही अशीच चालू राहिली तर या नाही त्या स्वरूपात, राजकारणात भाग घेऊन इंदिरा-सत्तेशी दोन हात करण्याशिवाय या नवोदित किसानशक्तीला दुसरा कोणता पर्याय उरणार आहे? महाराष्ट्रात तर दत्ता सामंतांच्या कामगारशक्तीची साथ या शेतकऱ्यांच्या शक्तीला मिळू लागलेली आहे. प्रत्येक पक्ष आपापली शेतकरी आंदोलने उभी करतोच आहे. नागपुरात, मध्य प्रदेशातील इंदूर भागात भाजपप्रणीत शेतकरी आंदोलन मूळ धरते आहे तर बारामती-पुण्यात शरद पवार ही आघाडी रचू पाहात आहेत. उत्तर प्रदेशात चरणसिंगांची ताकद अजूनही कमी नाही. दक्षिणेत नारायणस्वामी, रुद्राप्पा ही मंडळी आहेत. ७५ साली जी पोकळी जयप्रकाशांनी भरून काढली ती पोकळी, या दशकात, ही शेतकरी-नेतेमंडळी भरून काढू शकतात व जर यांच्या जोडीला कामगारशक्ती उभी राहिली तर इंदिरा-राजीव-यशवंतराव या नव्या काँग्रेसी सत्ताव्यूहाशी ही शक्ती चांगलीच टक्कर देऊ शकेल! दिल्लीतले चार विरोधी नेते एकमेकांना कितीही भेटत राहिले किंवा चंद्रशेखरांनी कितीही धावाधाव केली तरी इंदिरा-राजीव-व्यूहाला काहीच धक्का पोचू शकत नाही. या व्यूहाला मुळापासून धक्का देण्याचे सुप्त सामर्थ्य या काळात तरी नव्या, ताज्या दमाच्या शेतकरी आंदोलनातच फक्त आहे! जो आपल्या शिडात हे नवे ताजे वारे भरून घेईल तो दिल्लीवर निशाण रोवू शकेल! ७७ साली दिल्लीवर रोवल्या गेलेल्या जनता पक्ष निशाणावर शेतकरीच विराजमान झालेला होता; पण त्या वेळी निशाणाची काठी त्याच्या हातात नव्हती. यावेळी जर पुन्हा त्याने उचल घेतली तर निशाणाच्या काठीचा काही भाग तरी त्याच्या नक्की हाती येईल. एकदम, एका चढाईत सगळे यश तरी कसे मिळणार? शेवटी शंभर-दीडशे वर्षांचा वसाहतवादाचा सगळा वारसाच बदलण्याचा हा प्रश्न आहे. ७७ साली यश मिळाले; पण टिकले नाही, टिकवता आले नाही. या दशकात आणखी

एक पुढचा टप्पा शेतकरीनेत्यांना गाठता येईल. दिल्ली तशी अद्याप खूपच लाब आहे! ☐

राजकारणात सहभागी होणे म्हणजे ऊठसूठ प्रत्येक निवडणुकीत भाग घेऊन, तडजोडी-समझोते करून, कशीबशी सत्ता हस्तगत करणे नव्हे, हेही लक्षात घेतले पाहिजे. निवडणुका हा पूर्ण वेळचा व्यवसाय झालेला आहे. उमेदवार म्हटला, लोकप्रतिनिधित्व आले की, सगळयाची, सर्व तऱ्हेची कामे, लोकाचे विविध प्रश्न यातच गुतून पडणे अपरिहार्य ठरते व पुन्हा निवडून यायचे असल्याने कोणालाही नाराज करून चालण्यासारखे नसते. केवळ शेतकरीहिताची एकातिक भूमिका लोकप्रतिनिधीला घेऊन चालणार नाही. त्याला ग्राहकाचाही विचार करावा लागेल, इतरही वर्गांची, जातीजमातीची, धर्माची बंधने त्याच्या आड येत राहतील. सगळया मतदारांचा तो प्रतिनिधी असल्याने सगळयांच्या हिताहिताचा मेळ घालतच त्याला आपला राजकारणाचा व्यवसाय साभाळावा लागेल. तो तडजोडवादी होणे सध्याच्या स्थितीत अपरिहार्य आहे. शिवाय निवडणुका म्हटल्या म्हणजे पैसा आला, यंत्रणा आली. पूर्ण वेळचा उद्योगच तो! शेतकरी संघटनेची सध्याची स्थिती पाहता अशी प्रभावी निवडणूक-यंत्रणा उभी करणे तिला जमू शकेल का? कठीण वाटते. शिवाय या क्षेत्रात काँग्रेससारखे पक्ष चांगलेच मुरलेले आहेत. शेतकरी संघटनेचा या मैदानावर पराभव करणे त्यांना अवघड जाणार नाही. म्हणून मर्यादित सहभागाचा पर्यायच सद्यःस्थितीत हितकारक ठरेल. निवडणुकांकडे, राजकारणाकडे संपूर्ण पाठ फिरवणे, राजकारण वर्ज्य मानणे, हा पर्याय जसा नको, तसाच शेतकरी संघटनेला राजकीय पक्षाचे स्वरूप देणे हाही पर्याय नको. जेथे शेतकरी संघटनेचे कार्य चालू आहे, कार्यकर्त्यांचा जम बसलेला आहे, अशा निवडक ठिकाणीच शेतकरी संघटनेने, संघटनेतर्फे म्हणून उमेदवार उभे करावेत व ते निवडून येतील याची दक्षता घ्यावी. इतर ठिकाणी समविचारी पक्षाशी समझोते करून, व्यापक आघाडीचा एक घटक म्हणून वावरावे. महाराष्ट्राच्या विधानसभेत शेतकरी संघटनेचे २०-२५ प्रतिनिधी जरी निवडून गेले तरी शेतकरी हिताचे रक्षण ते करू शकतील, त्यांची बाधीलकी अन्य कशाशीही असण्याचे कारण नाही. शिवाय व्यापक आघाडीचा एक घटक म्हणूनही काही फायदे होत राहतीलच. ☐

'आम्ही केवळ गोबरगॅस प्लँटचा आणि ग्रामीण संडासाचा कार्यक्रम हाती घेतला तर भारताची अर्थव्यवस्था इकडची तिकडे होऊन जाईल. शेतीमालाला किफायतशीर भाव मिळावेत यासाठी आदोलन, राजकारण करत असता या विधायक कार्यक्रमांकडेही यापुढे लक्ष पुरवण्याचा आमचा विचार आहे' असे एक शेतकरी नेते नुकतेच सागत होते. असे जर असेल तर सोन्याहूनही पिवळे. शेतकरी सघटना आज एकाकी पडल्यासारखी झालेली आहे, ती अशा विधायक उपक्रमांमुळे ग्रामीण तसेच शहरी जनतेच्या अधिक जवळ पोचू शकेल व तिला व्यापक मान्यता मिळण्यास अडचण पडणार नाही. शेवटी रस्ता रोको, आंदोलने, निवडणुका हे नैमित्तिक कार्यक्रम झाले. नित्याची म्हणून आपली कामे शेतकरी संघटनेने ठरवून घ्यायलाच हवीत. नाही तर संघटना विस्कळित व हंगामीस्वरूपाची राहील. गाधीजीनी स्वातंत्र्यलढयाला विधायक कार्यक्रमाची जोड उगाच दिलेली नव्हती. या कार्यक्रमामुळे गाधीजीचा जनतेशी नेहमी सबंध राहिला व काँग्रेसची संघटनाही घरोघर पोचली. राजकारण आणि विधायक कार्यक्रम यांचा मेळ गाधीजीप्रमाणे नंतर कुणीही घालू शकले नाहीत. शेतकरी संघटनेचे नेते आपण गाधीवादी मार्गाने जाणार असे म्हणत आहेत. तेव्हा विधायक कार्यक्रम आणि आंदोलने यांचा मेळ जमवणे त्यांना तत्वत. तरी अवघड जाऊ नये. गोबरगॅस किंवा ग्रामीण संडास किंवा वृक्षारोपण हे कार्यक्रम समजा शेतकरी सघटनेने हाती घेतले तर ग्रामीणच काय 'इंडिया'तील शहरातील अनेक सस्थांचा, व्यक्तीचाही त्याना पाठिंबा लाभेल व हे शेतकरी आदोलन केवळ 'घेऊपासरे' नाही, देशांच्या संपूर्ण पुनर्निर्माणाचा विधायक दृष्टिकोन या आंदोलनामागे आहे, हे वेगळे सागण्याची गरजच उरणार नाही. असा विधायक कार्यक्रम रस्ता 'रोको,' निवडणुका याच्याशी जोडला नाही तर कामगार संघटना आणि शेतकरी संघटना यात फरक तो काय उरला? केवळ अर्थवाद पुरेसा नाही. परिवर्तनाचा समग्र विचार हवा, असा विचार कामगारापुढे आज ठेवला जात नाही. त्यांना राजकीय शिक्षण दिले जात नाही. म्हणून आज या क्षेत्रात बजबजपुरी व बाजार माजला आहे. ही अवस्था शेतकरी संघटनेची होऊ नये म्हणून पहिल्यापासूनच तिने रचनात्मक व आदोलनात्मक अशा दोन्ही आघाडयावर काम केले पाहिजे. एक कोटी झाडे लावणे, त्यासाठी शेतकऱ्याना तयार करणे, महाराष्ट्रातल्या शेतकरी नेत्याना अवघड आहे का?


# साप्ताहिक माणूस

वर्ष : एकविसावे

अंक : तिसावा

२६ डिसेंबर १९८१

किंमत : एक रुपया.

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी · ४४३४५९

वृत्तपत्रे, राजकीय पक्ष विरोधात असले तरी शेतकरी-नेत्यांच्या भाषणाला, मेळाव्यांना शेतकरी हजारोंच्या संख्येने जमत असतात. गेले १० नोव्हेंबरचे रस्ता रोको आंदोलन फसले असा सर्व वृत्तपत्रांनी एकांगी प्रचार केला. तरी मराठवाड्यात, नाशिक भागात हजारोंनी शेतकरी रस्त्यावर आलेच होते, ही वस्तुस्थिती आहे. ही ताकद यापुढे केवळ निवडणूकप्रचारात, आंदोलनात्मक कार्यात खर्च न होता, तिने नवनिर्माणाचा ध्यास घेतला तर ७५ साली, गेल्या दशकात, जयप्रकाशाचे नेतृत्व लाभूनही विद्यार्थीवर्गाला, राजकीय पक्षाना जे जमू शकले नाही ते या दशकात शेतकरी करून दाखवू शकतील. शेतकरी हा देशाचा मालक आहे अशी शेतकरी नेत्यांची भावना आहे. मग मालकाने सगळ्याचा विचार करायला नको का ? आपल्यापुरता विचार करतो त्याला नोकर म्हणतात. मालकाची भावना असते, निदान असायला हवी–

' आपुल्या पुरुषार्थवैभवे,
बहुतांस सुखी करावे '
' शहाणे करून सोडावे
सकळ जन ' ......

— श्री. ग. मा.

## मुंबई वार्ता

# ' साठा ' उत्तराची कहाणी

ऐका ऐका देवा मानमरातबा तुमची कहाणी !

भारतखंडामध्ये महाराष्ट्रनामे प्रदेश होता. तेथे लोकशाही पद्धती नांदत असून एक राजा राज्य करीत असे. लोकशाही असून राजाही होता हे नवल कैसे वर्तावे ? तर लोकानी नियुक्त करून दिलेल्या प्रतिनिधी मंडळास धाकात ठेवण्याची वा वश करण्याची अद्भुत कला त्या राजास अंकित होती. असा हा सामर्थ्यशाली अंतुलेराजा त्या देशी राज्य करीत असे. राज्यात सर्वत्र आबादीआबाद असावी असे त्याचे सक्त सरकारी फर्मान असल्यामुळे सर्व प्रजाजन सुखी होते तसेच सरकारी फर्मान असल्यामुळे तेथे सर्वधर्मसमभाव व बंधुता ही देखील नांदत असत. राजाही मोठा दयाळू अंतःकरणाचा होता व प्रजेने आपली व्यावहारिक दुःखे विसरून त्याचे निवारण व्हावे, म्हणून तोही नित्य त्याजमागे दुसरी कमी महत्त्वाची व्यवधाने लावून देत असे.

अशा या भूवरील जणू प्रतिस्वर्गच असणाऱ्या महाराष्ट्रदेशी मधुकर अष्टीकर नामे एक सज्जन प्रजाजन रहात असे. सरकारी फर्मानाप्रमाणे सर्वत्र सुख होते. सरकारी कृपेमुळे पोटा-पाण्याची ददात नव्हती; पण त्या सालस येरूच्या जिवाला स्वस्थता नव्हती. मनाला उल्हास नव्हता की, आयुष्यात अर्थ वाटत नव्हता. त्यास समोरील पंचपक्वान्नानी भरलेल्या ताटात गोडी वाटेना. मऊ पराच्या सात गाद्यावर निद्रा येईना. टागोर अध्यापन शिष्यवृत्ती न मिळाल्याने चाकरीतही रस वाटेना. कारण एकच - मानमरातबदेवाची कृपा नव्हती. त्याचे नाव फारसे कुणास ठाऊक नव्हते ! चार लोकात त्याच्या साहित्यास वा नावास मान्यता नव्हती. एकाही कुलकर्णी अथवा देशपांडे समीक्षकास त्याची महती पटलेली नव्हती. त्यातच महाराष्ट्र टाइम्स नामे नतद्रष्ट पत्र, नव्हे मित्र, नव्हे नव्हे शत्रूने तर त्या बापुड्याविरुद्ध बदनामीची मोहीमच काढली होती. कुणीही उठावे व त्याच्या लेखनकर्तृत्वाची कुचाळकी करावी असा मोठा घोर प्रसंग त्याजवर पातला होता. तरीही तो डगमगत नव्हता. आपली लेखणी वेठीस धरून दोन-पाच नाटके, चार-सहा कथा तो व्रतस्थपणे नित्य पाडत असे. पण तरीही मानमरातबदेवाची कृपा नव्हती.

त्यास एके रात्री निद्रावस्थेत असता दृष्टान्त घडला. दृष्टान्तात काय दिसले ? (ते भाविक व जिज्ञासूनी भक्तिभावाने परिसावे.) साक्षात देव सामोरे आले. वदते झाले, वत्सा ऐक ! मी सांगतो तसा वसा घे ! रोज प्रभाती उठावे. साहित्यदेवाची आराधना करण्याअगोदर शासनाची काकडआरती गावी. लाचारीने भक्ती करावी. स्वार्थाचे ध्येय मानावे. ढवळाढवळ आणि चमचागिरी करण्याचे सोडू नये. प्रयत्नाची कास सांडू नये. सदसद्विवेक बुद्धीचा निःपात करावा. उतावे, मातावे, अद्वातद्वा बोलत जावे. भरमसाट कल्पना मांडत जावे. राजा आणि त्याचे हुजऱ्ये सोडले तर कोणाची पत्रास बाळगू नये ! त्याना प्रसन्न करण्यासाठी हरप्रकारच्या मार्गांचा अवलंब करावा म्हणजे मी तुला प्रसन्न होईन ! इतके बोलून देव अंतर्धान पावले.

देवाची ही आज्ञा त्याने यथास्थित पाळली अकोल्यास साहित्य संमेलन भरविले. राजाच्या अभिनंदनाचा ठराव पास केला. लंडनग्रामी साहित्यसंमेलन भरविण्याची अगडबंब घोषणाही केली. उतला, मातला. साहित्यिकास जवळ केले नाही. तसा मानमरातबदेव त्यावर प्रसन्न झाला आणि त्यास अनेकविध सुखाची प्राप्ती झाली.

त्याचे हे सुख काही अज्ञ जनास बघवले नाही. त्यांनी त्याची हरएक तऱ्हेने निंदानालस्ती चालू केली. त्याच्या राजनिष्ठेत अडथळे यावेत व देवाने सांगितलेल्या व्रताच्या पालनात खंड पडावा म्हणून नाना कुभांडे रचण्यास सुरुवात केली. त्याने हाती घेतलेल्या प्रत्येक कल्याणकारी व लोकोपयोगी उपक्रमाची अप्रतिष्ठा करण्याचा घाट कित्येकानी घातला. त्याने औदार्याने नवोदितांस जलाशयात नौकाविहाराची व सृष्टिसौंदर्य निरीक्षणाची संधी देऊ केली ती झिडकारून काहींनी त्याजवर टीकास्त्र आरंभिले.

बघता–बघता एक वर्ष लोटले. साहित्यजत्रेचा समय येऊन ठाकला. आजच्या दृष्टीने ही वेळ मोठी मोक्याची आणि मोलाची असते. गतवर्षी त्याने याच मुहूर्तावर आपल्या साहित्यप्रेमाचे आणि भीड–संकोचाचे बलिदान केले होते. मंत्रीवरांना विषय नियामक समितीत आदराने पाचारून त्याची मंचावर प्राणप्रतिष्ठाही केली होती.

पण यंदा मोठा कठीण प्रसंग आला. प्रभादेवीहून कोणी एक माधव गडकरी उठला. दुसरा कोणी जयवन्त दळवीही उठला. वा. ल. कुलकर्णी, रा. भि. जोशी, श्री. पु. भागवत, सुभाष भेंडे अशा काही प्रतिष्ठितांनी त्यास साथ दिली आणि सर्वांनी मिळून मधुकर अष्टीकर आणि त्याचे आराध्यदैवत जो मानमरातबदेव त्याविना दुसरे साहित्य संमेलन भरविण्याचा घाट घातला. शासनाची मिरास न ठेवण्याचा निर्धार केला. लाचारीने न वागावयाचे ठरविले. साहित्य व साहित्यिकांचे स्वातंत्र्य अशा फुटकळ, अर्थहीन विचारांचा उदोउदो केला. शासनाच्या कृपाछत्राबाहेरच वाढण्याची धृष्टताही दाखवली. अष्टीकरास मोठ्या पेचात पडल्यासारखे झाले; कारण या नव्या साहित्य संमेलनाची कल्पना वाऱ्याने वणवा फैलावा तद्वतच सर्वत्र पसरू लागली. तिच्या धगीने येरू होरपळू लागला. आपल्या व्रताचा भंग होणार की काय, या शंकेने त्यास ग्रस्त केले.

अशा बिकट अंधःकारमय प्रसंगी पुण्यनगरीत वास्तव्य करणारा ग. वा. बेहरे नामे एक ब्राह्मण त्यांच्या जणू मदतीस धावून आला. वरकरणी अभेद्य वाटणाऱ्या मुंबई साहित्य संमेलनाच्या या किल्ल्यास त्याने खिंडारे पाडून दाखविली आणि जणू काळ्याकुट्ट नभागणांत आशेची वीज लख्खन चमकली. 'अरे, हे कसले साहित्य संमेलन? हे तर केवळ गल्लीबोळातले संमेलन; हे केवळ उपनगरीचं साहित्य संमेलन!' तो कुचेष्टेने वदता झाला. आपण असे बोललो ते केवळ ते साहित्य संमेलन 'कडक' करण्यासाठी असे त्याने नंतर निवेदन केले. तथापि त्याची आधीची युक्ती फळली होती. मुंबईनगरीत साहित्य संमेलनास लोटणाऱ्यांच्या मनात त्याने किंतु निर्माण केला. तशात त्याने राजासही जाऊन पोक्त सल्ला दिला की, ही तो बालके आहेत! त्याच्या लीलावर क्रोध तो कसला? तुम्ही यांजवर कृपाछत्र धरा! त्यांस पाठिंबा दिल्याचे पत्रक काढा. काही 'नजराणा' पाठवून ह्यांस वश करून घ्या.

हट्टी आणि अज्ञ बालकांनी या नजराण्याचा स्वीकार केला नाही; परंतु परिस्थितून मार्ग सापडला. असहकाराची कोंडी फुटली. मानमरातब देवाच्या महत्त्वात तिळमात्र कमतरता झाली नाही. साहित्यिकांची जमात. त्यामध्ये देवाच्या भगतगणांची उणीव ती कसली? साहित्य संमेलनास जायचे, तर जाण्या-येण्याची व्यवस्था सवलतीत व्हावयास हवी. वसतीसाठी सुसज्ज गृह हवे. उत्सव भव्य, सुशोभित मांडवात व्हावयास हवा. सव्वा हात केळीच्या पानावर वाढलेले साग्रसंगीत भोजन हवे. श्रीखंडातील केशरसुद्धा अस्सल इम्पोर्टेड हवे! मानपान हवा. इथे या, इथे बसा अशी ऊठ-बस हवी. नाही तर हवीत कशाला साहित्य संमेलने? मुंबापुरीत मिळणार आहे का असे काही? नसेल मिळणार तर कोण जाईल पुढच्या वर्षी अशा संमेलनास (जर भरलेच तर)? अहो, पाच मुद्रिकांच्या कुपनावरचे भोजन आम्हास काय घरी मिळत नाही? थाटमाट नाही म्हणजे साहित्य संमेलनही नाही!

उर्वरित साहित्यिकांस कालावधीने उमगणारे हे सत्य या काही मूठभर चाणाक्ष अ-साहित्यिकांस अंतर्ज्ञानाने कळून आले. त्यांनी मानमरातब देवाचे व्रत पूर्वीसारख्याच नेमाने चालू ठेवले व ते कल्याण पावले.

जसे ते, तसेच सर्व साहित्यिक, तुम्ही-आम्ही व जनता सुखी होवो!

अशी ही 'साठे' उत्तराची कहाणी याचा उत्तरी सुसंमेलन संपूर्ण.

—ललिता बर्वे

---


# आदेश ॥ शेतकरी संघटना ॥ आदेश

**शेतकऱ्यांनो,**

**सटाणा (ता. बागलण, जि. नाशिक) येथे भरणाऱ्या शेतकरी संघटनेच्या पहिल्या ऐतिहासिक अधिवेशनाला प्रचंड संख्येने हजर राहा.**

**कार्यकर्त्यांच्या बैठका**

दिनांक १ व २ जानेवारी १९८२

**खुले अधिवेशन**

दिनांक ३ जानेवारी १९८२ : दुपारी दोन वाजता

**शेतकऱ्यांनो,**

गेल्या दोन वर्षात तुम्ही दाखवलेल्या विलक्षण जागृतीमुळे तुमचे सर्व शत्रू खडबडून जागे झालेले आहेत. गेल्या १० नोव्हेंबरचे रस्ता रोको आंदोलन तर पाशवी बळाचा वापर करून, अगदी हेलिकॉप्टरचे साहाय्य घेऊन, ठेचून काढले गेले. तरीही शेतकरी दबलेला नाही, तो सावध व तयार आहे हे दाखवून देण्यासाठी, वरील अधिवेशनाला हजर राहा. लाठीमार, गोळीबाराला सामोरे जाण्यापेक्षाही हजार पटीने सटाण्याच्या अधिवेशनाला प्रत्येक तरुण शेतकऱ्याने, कोठल्याही परिस्थितीत हजर राहणे परिणामकारक ठरणार आहे, हे विसरू नका.

शरद जोशी        माधव मोरे        प्रल्हाद पाटील

# पोलंड

## आणीबाणीचा अर्थ

वा. दा. रानडे

पोलंडमध्ये 'सॉलिडॅरिटी' ही स्वतंत्र कामगार संघटना केवळ कामगार संघटना न राहता त्यातून कम्युनिस्ट सत्तेला पर्यायी शक्तिकेंद्र निर्माण होण्याचा संभव दिसू लागला तेव्हा कम्युनिस्ट राजवटीने तेथे आपली सत्ता टिकविण्यासाठी तेथे आणीबाणी आणि लष्करी कायदा पुकारला आणि लष्करी बळावर सॉलिडॅरिटीची चळवळ मोडून काढण्याची मोहीम सुरू केली. सॉलिडॅरिटीच्या हजारो कार्यकर्त्यांना अटक झाली. या संघटनेचे नेते वालेसा यांना प्रथम अटक झालेली नव्हती; पण आता त्यानाही स्थानबद्ध केल्याच्या बातम्या आहेत. पोलंडमध्ये खरोखर काय परिस्थिती आहे, हे समजणे कठीण आहे. रशियन व पाश्चात्य वृत्तसंस्थांच्या बातम्या त्यांच्या दृष्टिकोनातूनच दिलेल्या असतात. त्यातला प्रचार आणि पूर्वग्रह बाजूला ठेवूनच वस्तुस्थितीची कल्पना करायला हवी.

परिस्थिती शांत आहे, कामगार आता कामावर येऊ लागले आहेत अशा बातम्या वॉर्सा रेडिओवरून सांगण्यात येत आहेत; पण सॉलिडॅरिटीचा प्रतिकार एवढ्या लौकर बंद पडेल असे वाटत नाही. उघड आंदोलन शक्य नसल्याने आता भूमिगत आदोलन तेथे उभे राहण्याची शक्यता आहे. या संघर्षाला पुढे कोणते वळण मिळण्याचा संभव आहे? रशिया लष्करी हस्तक्षेप करील काय? अमेरिका व पाश्चात्य देशांची भूमिका काय राहील? या प्रश्नाचा विचार करताना तेथील संघर्षाचे स्वरूप प्रथम समजून घेतले पाहिजे.

सॉलिडॅरिटीचा लढा प्रतिगामी आहे. तिच्या नेत्यांचा कम्युनिस्ट पद्धतीलाच विरोध असून त्यांनी पोलंडमध्ये भांडवलशाही आणावयाची आहे असा प्रचार कम्युनिस्ट पत्रांतून केला जातो. आपल्या विरोधकांना प्रतिगामी भांडवलशाहीचे हस्तक अशी शेलकी विशेषणे लावावयाची ही कम्युनिस्टांची नेहमीचीच पद्धती आहे. समाजवाद आणण्याचा कम्युनिस्टांचा मार्ग हाच एकमेव अचूक मार्ग असे मानण्याचे कारण नाही. त्या मार्गानेही चुका झालेल्या आहेत हे रशिया व चीनमधील कम्युनिस्ट चळवळीच्या इतिहासाने दाखवून दिलेलेच आहे. लोकशाहीच्या मार्गाने समाजवाद आणता येईल, ही शक्यता कम्युनिस्ट विचारप्रणालीचे प्रणेते कार्लमार्क्स यांनीसुद्धा [illegible] केली आहे.

सॉलिडॅरिटीचा लढा हा मुख्यतः लोकशाहीचा लढा आहे. तिच्या नेत्याना कम्युनिस्ट पद्धतीत लोकशाही आणावयाची आहे. त्याची सुरुवात स्वतंत्र कामगार संघटनेचा हक्क मिळवून त्यानी केली. कम्युनिस्ट देशात कम्युनिस्ट पक्षाच्या नियंत्रणाखालील कामगार संघटना असतात. पक्षाच्या व सरकारच्या धोरणाना पाठिंबा देणे हेच त्याचे मुख्य काम. या अधिकृत संघटनांशिवाय इतर संघटना उभारण्याचे कामगारांना स्वातंत्र्य नाही. कम्युनिस्ट राजवटीतही अन्याय होऊ शकतात. त्याविरुद्ध झगडण्याचा हक्क कामगारांना असला पाहिजे. त्यासाठी स्वतंत्र कामगार संघटना उभारण्याची मोकळीक त्याना असली पाहिजे असे सॉलिडॅरिटीच्या नेत्याना वाटले व त्यांनी झगडून तो हक्क मिळविला. सर्व कम्युनिस्ट देशात फक्त पोलंडच्या कामगारानीच हा हक्क मिळविला. स्वतंत्र कामगार संघटनेप्रमाणेच स्वतंत्र शेतकरी संघटना स्थापण्याची मागणीही त्यांनी मिळविली.

कारखान्यांची व्यवस्था खऱ्या अर्थाने कामगाराच्या हाती आली पाहिजे, ही सॉलिडॅरिटीची दुसरी महत्त्वाची मागणी आहे. यासंबंधी सरकारने तयार केलेल्या बिलाने सॉलिडॅरिटीच्या नेत्यांचे समाधान झालेले नाही. कारखान्याचा संचालक सरकारने न नेमता कामगार संघटनेने त्याची निवड करावी. कारखान्याच्या उत्पादनवाढीच्या योजना आखणे, त्यासाठी आवश्यक ती यंत्रसामग्री, कच्चा माल यांची तरतूद करणे वगैरे बाबतीत संचालकास पूर्ण अधिकार असले पाहिजेत. संचालक आपल्या जबाबदाऱ्या समाधानकारकपणे पार पाडीत नाही असे आढळून आले तर त्याला बदलण्याचा व त्याच्या जागी दुसरा संचालक नेमण्याचा हक्क कामगार संघटनेला हवा अशी सॉलिडॅरिटीची मागणी आहे. आपण सुचविलेले बदल बिलात करण्यात यावे, ते मान्य झाले तरच पार्लमेंटमध्ये बिलावर होणाऱ्या चर्चेत आम्ही भाग घेऊ, ते मान्य न झाल्यास बहिष्कार घालू असा इशारा सॉलिडॅरिटीच्या नेत्यानी दिला होता. त्यांची ही मागणी मान्य झाली नाही. सॉलिडॅरिटीच्या या मागणीवर असा एक आक्षेप घेता येईल की बिलात तुमच्या सूचना मान्य झाल्या पाहिजेत यासाठी आग्रह तुम्ही जरूर धरा; पण मान्य झाल्या नाहीत तर आम्ही चर्चेवर बहिष्कार घालू हा तुमचा निर्णय लोकशाही कार्यपद्धतीशी कितपत सुसंगत आहे? चर्चेत तुमच्या सूचनांचाही विचार होईल आणि पार्लमेंट बहुमताने निर्णय घेईल तो तुम्ही मान्य करायला हवा. यावर सॉलिडॅरिटीचे नेत्यांचा मूलभूत प्रश्न असा की, सध्या पार्लमेंट प्रतिनिधींची निवडणूक तरी खऱ्या लोकशाही पद्धतीने कोठे झाली आहे? निवडणुकीत कम्युनिस्ट पक्षाशिवाय इतर उमेदवाराना उभेच राहता येत नाही. कम्युनिस्ट पक्षाने तयार केलेल्या यादीतूनच मतदारांना उमेदवार निवडावे लागतात. ही पद्धती बदलली पाहिजे! त्यासाठी पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे देशात अनेक पक्षाना काम करण्याची, आपला मतप्रचार करण्याची, संघटना बांधण्याची आणि निवडणुकीला उभे राहण्याची मोकळीक हवी. देशात स्थानिक पातळीपासून वरपर्यंत खऱ्या अर्थाने खुल्या निवडणुका झाल्या पाहिजेत अशी मागणी सॉलिडॅरिटीने केली आहे. ही मागणी मान्य करण्याची कम्युनिस्ट राजवटीची तयारी नाही. कारण अशा खुल्या निवडणुकीत आपल्याला बहुमत मिळून आपल्या हाती सत्ता टिकेलच अशी खात्री कम्युनिस्टांना वाटत नाही.

भाषणस्वातंत्र्य, मतप्रकटनाचे स्वातंत्र्य या मागण्या खुल्या निवडणुकाशीच निगडित आहेत. आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे ही प्रसारमाध्यमे कम्युनिस्ट राजवटीत सरकारी नियंत्रणाखालीच असतात. सरकारी प्रचारासाठीच त्यांचा उपयोग केला जातो. ही प्रसारमाध्यमे केवळ सरकारची मक्तेदारी न राहता सॉलिडॅरिटीलाही आपली भूमिका मांडण्यासाठी आणि आपल्या बातम्या देण्यासाठी जागा मिळाली पाहिजे, ही मागणी मतप्रकटनाच्या स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्कास अनुषंगूनच करण्यात आली आहे.

सॉलिडॅरिटीची चळवळ लष्करी दडपशाहीने दडपली जाईल असे मॉस्कोला वाटते. त्यात यश आले नाही तरच लष्करी हस्तक्षेपाचा विचार रशिया करील. कारण हा उपाय योजताना त्याच्या दूरगामी परिणामांचा विचार रशियाला करावा लागेल. सॉलिडॅरिटीला मग अमेरिका व पाश्चात्य राष्ट्रांकडून मदत मिळून त्यातून जागतिक संघर्ष निर्माण होण्याचाही संभव आहे. पोलंडचे प्रश्न तेथील जनतेलाच सोडवू द्या. बाहेरच्या शक्तींनी त्यात हस्तक्षेप करावयाचा नाही असे धोरण तर सर्वांनी पाळायला हवेच; पण लष्कराचा वापर न करता वाटाघाटीनी प्रश्न सोडवा असे जागतिक लोकमताचे दडपण पोलंडवर आणायला हवे. लष्करी दडपशाहीमुळे सॉलिडॅरिटीचे आंदोलन तात्पुरते दबल्यासारखे वाटले तरी ते कायमचे दबणार नाही. आमचा विरोध कम्युनिस्ट पद्धतीला नाही साम्यवाद आम्हाला तत्त्वतः मान्य आहे. फक्त लोकशाही मार्गाने तो आणावा अशी आमची भूमिका आहे असे सॉलिडॅरिटीनेही स्पष्टपणे जाहीर करावे म्हणजे मग कम्युनिस्ट त्याच्याविरुद्ध करीत असलेला प्रचार हा अपप्रचार कसा आहे हे लोकांना दिसून येईल! □

उत्तरमीमांसा : ३२ :

स. शि. भावे

# एका देशाभिमानी ऋषीची भविष्यवाणी !

साल : १९२६.
प्रसंग : शारदोपासक संमेलन : पहिले.
स्थळ : पुणे.
अध्यक्ष : **इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे.**

भाषणातले काही उतारे वाचू या.

'नव्या सभा व नवी संमेलने आज भरतात व उद्या मरतात; किंवा जुन्या संस्थांची नवी संमेलने कोणाच्या हुक्कीने केव्हा तरी लाजेकाजेने कशी तरी साजरी केली जातात व काहीएक काम न करता प्रगटली तशी अंतर्धान पावतात; किंवा सभासदात मतभेद होऊन संमेलने रेंगाळत पडतात किंवा सभांचे व संमेलनांचे हेतू स्पष्ट व निश्चित नसतात किंवा हेतू निश्चित असले तथापि ते नेटाने, उत्साहाने व चिकाटीने पार पाडण्याचे सामर्थ्य व कौशल्य सभासदांच्या अंगी नसते. असे नाना खेळ अवलोकनात येतात. **करिता, संमेलनावरचा माझा विश्वास प्रायः सपशेल उडून जात चालला आहे.'**

संमेलनासंबंधीच्या या अभिप्रायात ठळकपणाने बदल करावा असे गेल्या पंचावन्न वर्षांत काही घडले आहे काय ? काहीही नाही.

आणखी एक उतारा पाहू या.

'साहित्यसंमेलनाद्वारा कोणते निश्चित कार्य पुण्यातील हे शारदामंडळ साधू पाहणार असा प्रश्न केला. त्याला उत्तर असे मिळाले की मराठी भाषेचा उत्कर्षापकर्ष वर्षानुवर्षे अजमावण्याचा धंदा मंडळ नेटाने करणार ; अपकर्ष होत असल्यास तसा इशारा महाराष्ट्राला स्पष्ट देणार आणि उत्कर्ष होत असल्यास तत्प्रीत्यर्थ महाराष्ट्राचे अभिनंदन करणार.'

काही करण्यापेक्षा केवळ अजमावणे हेच संमेलनांचे कार्य ठरते यावर राजवाड्यांनी पंचावन्न वर्षांपूर्वी अचूक बोट ठेवले आहे. आजही काही वेगळा प्रकार दिसत नाही.

¤

मराठी भाषेच्या तत्कालीन अपकर्षाची राजवाड्यांची मीमांसा याच भाषणात नंतर आहे. ते म्हणतात,

'आपण कोट–दोन कोट लोक मराठी भाषा बोलत आहोत. तेव्हा मराठी भाषा अगदी मरून जाऊन तिचे अद्याप मढे बनले नाही, हे उघड आहे. **काही थोडी सबळ–दुर्बळ वर्तमानपत्रे, लेचीपेची गद्य पुस्तके, गृह्य व ग्राम्य व्यवहार यांच्यात मराठी भाषेचा उपयोग अद्याप आपण करीत आहोत.** त्यावरून दिसते की, मराठी भाषा अद्याप मेली नसून तिच्यात काही धुगधुगी उरली आहे...

'परंतु गृह, ग्राम, दुर्बल वर्तमानपत्रे व दुर्बलतर पुस्तके सोडली म्हणजे समाजाच्या **व्यवहाराचे जे बाकीचे प्रांत त्यात मराठी भाषेची झाडून सारी अंगे थंडगार पडून गेली आहेत. देशातली सर्वातली अत्यंत मोठी व महत्त्वाची संस्था म्हणजे राजसंस्था. तिचा सर्व महत्त्वाचा व्यवहार परकीय भाषेत चालतो. म्हणजे राजकीय, आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक, दिवाणी, मुलकी, लष्करी नाविक, तारायंत्रिक, प्रावासिक, स्थापत्यिक वगैरे जे जे अगणित व्यवहार सरकार करते, ते ते इंग्रजी भाषाद्वारा चालतात. तेथे आपल्या मराठीची ओळखही राहिलेली नाही.**

'बाकी राहिले जे गृह्य, ग्राम्य इ. प्रांत त्यात शिकलेले म्हणून ज्यांना म्हणतात, ते प्रत्येक दहा शब्दांस पाच-चार इंग्रजी शब्द ढकलून देतात. हौसेने ढकलून देतात असे नव्हे. तर, इंग्रजी भाषा रोमरंध्रात बालपणापासून भिनून गेल्यामुळे शिकलेले लोक मनात विचाराचा संकल्प प्रथम इंग्रजी भाषाद्वारा करतात व नंतर त्या इंग्रजीचे भाषांतर इंग्रजी-मराठी मिश्र अशा घेडगुजरी अपभ्रंशाच्या द्वारा तोंडातून सहज उच्चारितात. शिक्षितांच्या संसर्गाने अशिक्षितांच्या तोंडी इंग्रजी शब्द बसत चालले आहेत.'

राजवाड्यांचा निष्कर्ष असा आहे :–

'येणेप्रमाणे मराठीची तोंडदाबणी इतकी बेसुमार होत चालली आहे की, तिची डांबणूक अशीच आणीक पाचपंचवीस वर्षे होत गेल्यास लवकरच सर्व महाराष्ट्र इंग्रजी भाषा शुद्ध किंवा अपभ्रष्ट अशी हाँगकाँगमधील मीज्यन इंग्लीशप्रमाणे बोलू लागेल असा निश्चित अंदाज दिसतो. येणेप्रमाणे मराठी भाषेचा संकोच आता इतका अतोनात होऊन गेलेला आहे की, ती यद्यपि अद्याप सपशेल मरून गेलेली नाही, तत्रापि सध्या ती फक्त धुगधुगी धरून आहे हे कबूल करणे भाग आहे.'

¤

पंचावन्न वर्षानंतर आज परिस्थिती काय आहे ?

एक तर, इंग्रजी शिक्षितांचा तोरा अधिकच वाढला आहे. नव-ब्राह्मण्याचा अहंकार या एच. एम. सी. त आला आहे.

दुसरे म्हणजे, इंग्रजीचे ज्ञान एवढेच नव्हे तर इंग्रजीतून ज्ञान असा या नवांग्लनिष्ठ समाजाचा आग्रह चाललेला आहे. गाव, महाराष्ट्र, देश–या साऱ्या मर्यादा एका उडीसरशी ओलांडून यांना आपली मुले एकदम आंतरराष्ट्रीय समाजाची सभासद बनावीत असे वाटते आहे. मुंबई, नागपूर, पुणे औरंगाबाद, सोलापूर, कोल्हापूर, अमरावती या मोठ्या शहरांतच नव्हे तर नाशिक, अकोला, सातारा, नगर, सांगली, अशा जिल्ह्याच्या ठिकाणीदेखील या नवांग्लनिष्ठांच्या वस्त्या वाढत आहेत. शहरांतच ग्रामीण विभागातही जेथे जेथे नवधनाढ्यांच्या वस्त्या आहेत तेथे तेथे या नवांग्लनिष्ठ वृत्तीचे आकर्षण वाढते आहे. जवळजवळ प्रत्येक सहकारी साखरकारखान्याभोवती जे नवे अर्ध नागर शहर उभे राहते आहे, त्या शहरात इंग्रजी माध्यमातील शिक्षणाची सोय अगदी पूर्वप्राथमिक वर्गापासून, बख्खळ पैसा खर्च करून करण्यात येत आहे.

तिसरे म्हणजे, अशिक्षित समाज या नवांग्लनिष्ठ समाजाचे अनुकरण करून इंग्रजीचा

जास्त जास्त शिडकावा आपल्या भाषेवर करू पाहतो आहे.

चौथे म्हणजे, समाजात जी जी सार्वजनिक क्षेत्रे नव्याने बहराला येत आहेत अशा क्षेत्रात, सहजपणाने मराठीचा प्रभाव वाढण्या ऐवजी, इंग्रजीचाच प्रभाव वाढत आहे. शिक्षित आणि अशिक्षित असे उभयता या क्षेत्रात एकत्र येतात. आणि स्वतःचा मोठेपणा दाखविण्यासाठी शिक्षित आणि त्यांच्या बरोबरीला यावे अशी सुप्त आकाक्षा असल्यामुळे अशिक्षित दोघेही इंग्रजीचाच वापर करतात.

साधे प्रवासाचे क्षेत्र घ्या. स्वातंत्र्यानंतर हे क्षेत्र चांगले विकसित झाले. मोटार–गाडीच्या प्रवासी वाहतुकीचे सरकारी करणही झाले. पण सरकारीकरणामुळे मराठी करण मात्र झाले नाही. सुरुवात झाली तीच 'एस. टी.' ने. 'एसटी' हा शब्द चांगला रूढ झाल्यावर, 'येष्टी' असे ग्रामीण रूप रूळल्यावर, मग 'महाराष्ट्र-राज्य-परिवहन' हा शब्द आला. तो आता नव्याने एकदम कसा रुळणार ? त्यामुळे कागदोपत्री 'राज्यपरिवहन' आणि तोंडी 'एस्टी' असा दुहेरीपणा मात्र रुढ होत चालला आहे. जसा पहिला शब्द 'एस. टी.' असा आला, तसे पहिले बोधचिन्हही–S-T असे इंग्रजी अक्षरांचे आले. ते कशाला व कसे बदलायचे ? म्हणून तेच चालू आहे. नावाप्रमाणे, आणि बोधचिन्हाप्रमाणे या क्षेत्रातील बाकीचा शब्दसंग्रह देखील इंग्रजी अंगानेच वाढतो आहे. बस, स्टेशन, स्टॉप, ड्रायव्हर, कंडक्टर, सीट, रिझर्व्हेशन, प्लॅटफॉर्म, लगेज, स्टार्टर, डेपो, स्टँड-इनचार्ज, ब्रेकडाउन, ओव्हरटाइम, नाइट ड्यूटी, एक्सप्रेस, सुपरएक्सप्रेस, व्हाया, लगेजचा चार्ज, तिकिट, ते पंच करणे, चेंज नसल्याने कंडक्टरने पैसे न देणे, बेल, सारा 'प्रावासिक' व्यवहार इंग्रजीत बहरला आहे. येथे मराठीकरणाची खास गरज वाटत नाही इतके हे इंग्रजी 'मराठलेले' आहे.

सरकारी व बिनसरकारी प्रकटने व छोट्यामोठ्या व्यापारी जाहिराती या क्षेत्राचे आणखी एक उदाहरण घेता येईल. रोजची वृत्तपत्रे सहज चाळली तरी या जाहिरातीतून शेकडो इंग्रजी शब्द टपटपा खाली पडतील. आपणा सर्वांच्या ते परिचयाचे आहेत. म्हणून त्यांची यादी येथे देत नाही. एकच तपशील सांगतो. तो आहे गावातील किंवा हमरस्त्यांवरील मार्गदर्शक वचनांचा. मोटारचालकांसाठी ही वचने प्रथम आली ती इंग्रजीमध्ये. जणू सर्व ट्रक ड्रायव्हर किंवा बस ड्रायव्हर हे इंग्रजी सहजपणाने जाणतात असे गृहीत धरून मग त्याची मराठी भाषांतरे आली. आली ती सावकाश तुकड्या तुकड्याने. आणि वेंगरूळ मराठीत म्हणजे मुळात या सूचना कोणत्या प्रवाशांसाठी दिल्या असाव्यात ? तर अर्थातच नवांग्लनिष्ठ श्रीमंत देशी वा परदेशी प्रवाशांसाठी. नंतर लाजेकाजेस्तव आणि नाइलाजास्तव त्या मराठीत उतरवलेल्या दिमतात.

हा नाइलाज ? की आळस ? की कंटाळा ?

आणखी दोन क्षेत्रांची परिस्थिती सहज न्याहाळली तर बहुधा हे स्पष्ट होईल.

वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन ही सामूहिक प्रसाराची क्षेत्रे, राजवाड्यांच्या भाषणा नंतरच्या काळात जोमाने फोफावली आहेत. यात काय परिस्थिती आहे ?

या साऱ्या ठिकाणी मराठीला प्राधान्य नाही, इतकेच नव्हे तर प्रतिष्ठाही नाही हे प्रभाकर पाध्ये यानी नुकतेच ('सकाळ' ११-१२-८१) समर्पकपणे मांडले आहे. मराठीतर माणसांची तुच्छतेची वृत्ती यातून दिसते असे एकवार म्हणता येईल. पण, जे कार्यक्रम मराठीत (म्हणून) होतात, जे हे कार्यक्रम सादर करतात, जे कोणी त्यात भाग घेतात, त्यांची मराठीबाबत किती आस्था असते ? मराठी समृद्ध व्हावी या साठी योजनाबद्ध प्रयत्न अशा कार्यक्रमांत कितपत असतो ? दुर्दैवाने या प्रश्नांची उत्तरे नकारार्थीच द्यावी लागतील अशी परिस्थिती आहे.

क्रिकेटसारख्या परदेशी खेळांच्या वर्णनात, किंवा चर्चेत, मिडविकेट, स्क्वेअरलेग असे विदेशी शब्द आले तर ते एक वेळ समजू शकेल; पण कबड्डीसारख्या खास देशी खेळांबाबतच्या चर्चेतही इंग्रजी शब्द आणि तेही टाळता येण्याजोगे-कशाला ? पण ते येतात. सुमारे महिन्याभरापूर्वी जपानला जाऊन आलेल्या क्रीडापटूंची मुलाखत दूरदर्शनने दाखविली होती. त्यांत 'गेम' 'प्लेअर्स' असे शब्द सहजपणे वापरले जात होते. जणू काही 'खेळ' 'खेळाडू' हे शब्द श्रोत्यांना समजणार नाहीत. सर्व कार्यक्रम ऐकताना-बघताना असे जाणवत होते की, साऱ्यांना टीव्हीवर मराठी बोलताना हॉरिबली ऑक्वर्ड वाटते आहे. आणि न्यूनगंडामुळे आलेला हा ऑक्वर्डनेस इग्रजी शब्द वापरले की एकदम कमी होत होता !

आणखी असेच विस्तारलेले आणि सांस्कृतिक बाबीत समाजाच्या गळयाशी येणारे क्षेत्र म्हणजे शिक्षणाचे क्षेत्र. माणसाच्या मनाची मशागत आणि घडण शिक्षणाने होते. शिक्षणाने तशी घडण होऊ शकली नाही तर ती शिक्षणाच्या वयात होते. देश, परंपरा, संस्कृती यांचे पाणी व्यक्तित्वावर चढते ते शिक्षणाच्या वयात. आमच्या मराठी मुलाच्या मनावर कोणत्या देशाचे, परंपरेचे, संस्कृतीचे पाणी चढावे अशी आमची कल्पना आहे ? हनुमानाला The Monkey God असे रूप जेथे मिळते, आणि Shivaji was a brave warrior and ruler एवढीच शिवाजीमहाराजांविषयी माहिती जेथे मिळते, अशा इंग्रजी माध्यमाच्या, आणि परकी संस्कृतीच्या शाळांत जे कोणी आपली मुले पाठवीत असतील, त्यांना विठाईमाउली, ज्ञानोबाराय, शिवबा आणि त्यांचे मावळे, न्यायमूर्ती रानडे आणि 'केसरी' कार लोकमान्य टिळक यांच्या संस्कृतीचे पाणी आपल्या मुलांस देण्याची इच्छा नाही हे उघड आहे. आणि अशी ज्यांची मुले इग्रजी माध्यमात शिकून पपा, ममी, अंकल आणि आँटी असे लाडिक, बोबड्या उच्चारात म्हणतात, त्यांपैकीच काही महाराष्ट्रपरंपरेचा व मराठी भाषेचा मोठा अभिमान मिरवताना दिसतात हे दुर्दैव आहे. हे ढोंग आणि हा नकली आवेश राजवाड्यांनंतर पंचावन्नसाठ वर्षांनी तरी आम्ही समजून घ्यावयास हवा. आपल्या भाषणात त्यानी विचारले आहे !

'असे जर आहे, तुमची भाषा जर पोटाकरिता, व मिळणाऱ्या किंवा न मिळणाऱ्या मानाकरता तुम्ही मरत जाऊ देत आहा. तर तिचे साहित्य करण्याकरता संमेलन भरविण्याच्या हास्यास्पद खटपटी तुम्ही कोणत्या तोडाने करता ?'

परंपरेच्या आपलेपणाचा आणि अभिमानाचा हा मुद्दा एक वेळ सोडून देऊ. 'पॅरो

किंअल' म्हणून त्याची टर उडविता येते. म्हणून आपण शिक्षणाच्या शास्त्रीयतेचा मुद्दा घेऊ.

शिक्षणाचे प्रधान माध्यम म्हणून, आणि शिक्षणातील महत्त्वाची भाषा म्हणून महाराष्ट्रात मराठीला डावलणे हा शुद्ध अशास्त्रीय वेडेपणा आहे. शिक्षणाला सध्या सुरुवात होते पाचव्या-सहाव्या वर्षी. ह्या वेळपर्यंत मुलाची वाढ होते ती मायबोलीच्या बरोबरीने होते, त्याचे ज्ञान आणि त्याची मायबोली एकजीवपणे विकसित झालेली असतात. केवळ ज्ञानाचा, म्हणजे विचाराचाच नव्हे तर त्याच्या भावनेचाही विकास मायबोलीतूनच झालेला असतो माहिती, विचार, ज्ञान, परिसराची ऊब–अशी व्यक्तित्वाची एकसंध अवस्था सहाव्या वर्षी मुलाची असते.

ही व्यक्तिमत्त्वाची एकसंधता कायम ठेवून शिक्षण देणे, शिक्षण वेगाने व्हावे, ते सर्वंकष व्हावे, म्हणून या एकसंधतेचा उपयोग करून घेणे–हा शिक्षणाचा शास्त्रीय दृष्टिकोण आहे. सध्याचा इंग्रजी माध्यमवाल्यांचा दृष्टिकोण मात्र, ना धड पारंपारिक, ना धड शास्त्रीय असा आहे. हा दृष्टिकोण फक्त पोटार्थी आणि पराकाष्ठेचा संकुचित, केवळ दोन टक्के माणसांचा विचार करणारा, अतएव त्याज्य दृष्टिकोण आहे. या दृष्टिकोणास उद्देशूनच जणू राजवाडे आपल्या भाषणात म्हणतात–

'तुमच्याजवळ द्रव्य नाही. तुमच्याजवळ नियम नाही. तुमच्याजवळ शस्त्र नाही. तुमच्याजवळ शास्त्र नाही. शास्त्र मिळविण्याला लागणारी तपश्चर्या करण्याची तुमची ताकद नाही. लढण्याचे सामर्थ्य व साहस नाही. रुसण्याचे कौशल्य नाही. तेव्हा तुम्ही, तुमचे लोक, तुमचा समाज, तुमचा धर्म, तुमचे देव व तुमची भाषा यांनी मृत्युपंथ धरला यात विचित्र असे काय झाले? ...गुलामांना स्वतंत्र विचार करणारी स्वतंत्र भाषा असलेली इतिहासात कोठे नमूद नाही. करता दुःखाने तुमच्या वतीने असा निर्णय द्यावा लागतो की, तुमच्या सध्याच्या स्थितीत साहित्य संमेलने भरविण्याची दगदग तुम्ही न केली तरी मुमूर्षू मराठीचे मोठेसे नुकसान होण्याचा संभव नाही.'

राजवाड्यांचा इशारा काहीसा अतिशयोक्तीचा आहे. त्याची भाषा चांगलीच कडक आहे; पण त्यांचा अभिप्राय मात्र निःसंदिग्ध व अचूक आहे. मराठी भाषा टिकायची तर मराठी संस्कृती टिकली पाहिजे. मराठी संस्कृती टिकवायची तर तिचा म्हणजे स्वतःच्या मराठपणाचा आपुलकीने अभिमान पाहिजे.

जन्माने मराठी पण मनाने साहेबी, अशा शिक्षितांना अशी आपुलकी व असा अभिमान मराठपणाविषयी अथवा देशीपणाविषयी नाही असा १९२६ साली राजवाड्यांचा अनुभव आहे. आज साठ वर्षांनी भोवताली पाहिले तर परिस्थितीत काही अनुकूल फरक पडला आहे असे म्हणवत नाही. साहेबाचे राज्य जाऊन चौतीस वर्षे झाली. तथापि साहेबीपणाची भुरळ अजून कायम आहे.

इंग्रजी, अथवा अमेरिकन, अथवा यूरपीय–कोणत्याही गोऱ्या कातडीसमोरचा न्यूनगंड अजून कायमच आहे. परराष्ट्रीय राजकारणापासून क्रीडाक्षेत्रापर्यंत साऱ्याच क्षेत्रांत ही मानसिक गुलामगिरी फार कुरूपपणाने आज व्यक्त होते आहे. एकच, पण चरचरीत उदाहरण पाहावे. शिक्षित असो वा अशिक्षित असो, कोणाही पुरुषावर आपल्या पत्नीची ओळख करून देण्याचा प्रसंग आला तर, हजारातील ९९९ प्रसंगी, 'या आमच्या मिसेस (किंवा वाइफ)' अशीच ओळख तो करून देतो. अशी जिथे स्थिती आहे तिथे 'बाँबे'चे 'मुंबई' करण्यास केंद्राने नकार दिला तर कोणास राग येणार?

राजवाड्यांचे भय आज साठ वर्षांनी खरे ठरले आहे. राजकीय स्वातंत्र्य मिळूनही सांस्कृतिक दृष्टीने आम्ही गुलामच राहिलो आहोत. धड सनातनी परंपरा नाही, धड शुद्ध बुद्धिवादी मुक्त निष्ठा नाही. धड इंग्रजीवर प्रभुत्व नाही, धड मराठीचे प्रेम नाही. व्यक्तित्वशून्यतेच्या समस्येत सारा समाज सापडला आहे. भाषिक उदासीनता हे या रोगाचे केवळ एक लक्षण आहे. मूळ रोग बरा केल्याशिवाय हेच काय, कोणतेही लक्षण मावळणार नाही.

पण, राजवाड्यांनी विचारले आहे त्याप्रमाणे, हा रोग बरा होण्याची तळमळ व तातडी कोणास लागली आहे? □

# नाचती वैष्णव 'भाई' रे !

## पु. लं. चं नेत्रदान

चंद्रशेखर मराठे

आज-काल वृत्तपत्रांत येणाऱ्या बहुताश बातम्या मन विषण्ण करणाऱ्याच असतात. रोज सकाळी वृत्तपत्र वाचून मन चीड, संताप, खेद, असहाय्यता या नकारात्मक भावनांनी भरून जाते. असे असले तरी कधी तरी एखादी बातमी वा एखादी जाहिरातही मनास प्रसन्नता देऊन जाते.

'अवघ्या महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व' अशा चपखल शब्दानी वर्णन केलेल्या भाईचं निरागस, हसरं छायाचित्र असलेली एक जाहिरात प्रायः दर रविवारी मनाला सुखवते. भाईंचंच पेटी वाचतानाचं आणखी एक छायाचित्र असलेली दुसरी एक जाहिरात पाहून मनाचे सूर मस्त जुळून येतात. अतिशयोक्ति ही जाहिरातीची मूळ प्रकृति असली तरी, 'अवघ्या महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व' या भाईंच्या बिरुदामध्ये एका अक्षराचीही अतिशयोक्ति नाही!

भाईंबद्दलच्या वेळोवेळी येणाऱ्या वार्तादेखील माझं त्यांच्याबद्दलचं कौतुक व आश्चर्य वाढवणाऱ्या ठरतात. देशपांडे दांपत्य मर्ढेकरांच्या कवितांचं वाचन करते व त्या कार्यक्रमांना शेकडो रसिक दाद देत काव्याचा मनमुराद आस्वाद घेतात, ही गोष्टदेखील आजच्या रुक्ष व हिशेबी जमान्यात मनाला तजेला मिळवून देते. नुकतंच भाईंनी सपत्निक, आरती प्रभूंच्या काव्याचं गायन केलं. त्यांच्या या उपक्रमानं मराठी मनाला काव्याच्या सौदर्याचं नव्यानं भान येईल व काव्यवाचन या प्रकारास लोकप्रियता लाभेल असं म्हणायला हरकत नाही. नाही तरी मराठी माणसाचं आयुष्य दिवसेंदिवस फार

गद्य व तितकंच सौदेबाजही होत चाललं आहे. स्वयंकेंद्रित, स्वयंमन्य आणि पैशानं प्राप्त होणाऱ्या सुखामागे धावणाऱ्या मराठी माणसांना जीवनात काव्यासारख्या निर्व्याज भावानुभवाला स्थान आहे हे पु. लं. च्या कडूनच कळलं तर कळेल !

मराठी भाषिकांच्या सदसद्‌विवेकबुद्धीचे संरक्षणकर्ते (कॉन्शन्स कीपर) म्हणून पु. ल. गेले पाव शतक अजोड कामगिरी बजावीत आले आहेत. हे काम त्यानी पंतोजीच्या नीरसपणाने केलेलं नाही. तर हसत-खेळत, रमत-गमत, वाचकांच्या व प्रेक्षकाच्या खाद्यावर हात टाकून, डोळे मिचकावून, सलगी देऊन केलं आहे. पन्नास ते साठ या दशकामध्ये, एकीकडे कोरडा, दांभिक गांधीवाद तर दुसरीकडे नवश्रीमंत वर्गाच्या राहणीमानाचं सुप्त आकर्षण अशा ओढाताणीत मराठी माणूस सापडला होता. अशा या भ्रांत अवस्थेत सगळं असताना पु. लं. नी 'तुझं आहे तुजपाशी' हे नाटक सादर केलं व जगण्याच्या आनंदाचं एक डोळस व सुखद भान मराठी मनामध्ये जागृत केलं. याच काळात त्यानी बटाटयाची चाळ 'बांधली' व त्या रूपानं लोकांसमोर एक आरसाच ठेवला.

त्या आरशात आपलं भाडकुदळ, कोतं, वेंधळ, लुब्रं स्वरूप निरखून घेऊन मराठी माणसानं स्वतःची मनसोक्त करमणूक करून घेतली. झपाट्यानं अस्ताला जाणाऱ्या जीवनपद्धतीच्या काही मौल्यवान अशा वैशिष्ट्यांचंही या चाळीन दर्शन घडवलं. 'तुझं आहे तुजपाशी' व 'बटाटयाची चाळ' या दोन कलाकृतीमध्ये पु. लं. ना प्रसन्न अशा विनोदाची नस गवसली. त्यापूर्वीच्या त्यांच्या लेखनात खोगीरभरती, नसती उठाठेव वगैरे बोचरा उपहास व निष्ठुर विडंबन याच प्राबल्य जाणवतं. या प्रकारच्या लेखनात पु. लं. नी जीवनाच्या सर्व क्षेत्रातील दंभाची, उसन्या अवसानाची रेवडी उडवली आहे. असं काही 'भजना'च काम केल्यानतर पु. लं. नी त्यांच्या विनोदाला प्रसन्नतेची, एका नव्याच निकोप जीवनदृष्टीची झळाळी दिली. त्याच्या 'भाषाशरीराला द्रौपदीचं सत्त्व' प्राप्त झालं.

'तुझं आहे तुजपाशी' पासून खास पु. ल. शैली आकारास आली व विडंबन, उपहास, उपरोध या पारंपारिक विनोदप्रणालीला पु. लं.नी खूपच मर्यादित ठेवलं. साठ ते सत्तर या दशकात पु. लं.नी मराठी वाचकांना एकापेक्षा एक चविष्ट व प्रसन्न अशा लेखांची भरघोस भेट दिली. एका 'परिपूर्ण' (टोटल) अशा जीवनदृष्टीनं, पु. लं.नी पोस्ट खात्यापासून ते खाद्यजीवनापर्यंत सर्व पातळ्यावरील अनुभवविश्वाची एक न संपणारी मजेदार, मनमोकळी सफर केली व वाचकांना या आनंदात सहभागी करून घेतलं. आपुलकी व कौतुक यांनी समृद्ध केलेल्या व्यक्तिचित्रांची एक मालिकाच (व्यक्ती आणि वल्ली, गणगोत) पु. लं.नी मराठी साहित्यामध्ये अजरामर करून ठेवली ती याच काळात. पु. लं.च्या या साऱ्या लेखनानं, मराठी माणूस कशाला हसायचं व कशाला आपलंसं करायचं ही कला शिकला. स्वतःकडेही पाहून तो हसायला शिकला. त्याच्या डोळ्यात दुसऱ्यासाठीही दोन अश्रू उभे राहू लागले.

सत्तर ते ऐंशी या दशकात पु. लं.नी जीवनातील सौंदर्याची, चैतन्याची क्षितिजं अधिक भाविकतेनं धुंडाळली व ती अधिक प्रगल्भ, सुंदर स्वरूपामध्ये आपल्या साहित्यात रेखित केली. त्यांचं या सुमाराचं सारं लेखन (व्यंगचित्रं) भरदार, सुरेल अशा 'मारु-बिहाग'सारख्या सपन्न रागातील विलंबित ख्यालाचं सौंदर्य लेवून उभं राहिलेलं असं वाटतं. 'मारु-बिहाग' हा राग डॉ. प्रभा अत्रेंच्या नितळ अशा प्रवाही सुरात ऐकताना मनात निर्माण होणाऱ्या भावभावना व भाईंचं या काळातील लेखन (राम किंकरदा!) वाचताना मनात तरळणाऱ्या भावना यांची जातकुळी एकच! राम किंकरदासारख्या लेखात भाईंच्या शब्दाना शिल्पकृतींची रेखीवता प्राप्त झाली आहे. याही लेखनात विनोद आहे; पण त्यात, बोलताना खूण पटल्यावर दिल्या जाणाऱ्या टाळीची, सलगीतली गंमत आहे!

जवळजवळ तीसहून अधिक वर्षांचा भाईंचा हा प्रवास निरखून पाहूनसुद्धा त्यांच्याबद्दलचं कुतूहल व आश्चर्य कमी होत नाही. दर वेळी हा कलावंत वेगळाच असा गोड धक्का देऊन जातो. भाईंनी केलेला बराच मोठा दानधर्म आता सर्वांच्याच परिचयाचा आहे. त्याबद्दल वाटणार आश्चर्यही आता सवयीच झालं आहे.

सतत तीस वर्षं समाजाला नाना परीनी आनंद देऊनसुद्धा पु. लं.चं समाधान झालेलं नाही. नुकतच वृत्तपत्रात वाचलं की त्यांनी नेत्रदानाचा संकल्प जाहीर केला आहे. हे वाचून फार विस्मय वाटला. भाईंच हे दानसत्र, सध्याच्या स्वार्थी व क्रूर जगात जवळजवळ दैवी भासतं. ज्या भाईंनी साऱ्या मराठी समाजाला नवी जीवनदृष्टी दिली, त्या भाईंना स्वत.चे चर्मचक्षू देण्याची ओढ का भासावी ? सारा वेदांत वाचून, ईश्वराच निर्गुण-निराकार स्वरूप 'भोगून,' एखाद्या ब्रह्मज्ञान्याला, विठ्ठलाच्या समचरणाना हात लावल्याशिवाय शाती लाभू नये, असाच काहीसा भाईंचा हा नवा संकल्प वाटतो.

या देवमाणसानं समाजाला काय दिलं नाही ? किती मार्गांनी भाईंनी समाजाशी नातं जोडलं आहे ! साहित्य, नाटक, संगीत, चित्रपट, एकपात्री प्रयोग, काव्यवाचन, भाषणं—या साऱ्या माध्यमातून भाईंनी या मराठमोळ्या वाळवंटात, केव्हाचा, आनंदाचा एक क्षण खेळ मांडियला आहे. अशाच एका उत्स्फूर्त आणि उन्मनी खेळाचं वर्णन तुकोबानी करून ठेवलं आहे—

खेळ मांडियेला, वाळवंटी घाई,
नाचती वैष्णव भाई रे !
टाळमृदंग घाई पुष्पवर्षाव,
अनुपम्य सुखसोहळा रे !
निर्मळ चित्तें झाली नवनीतें
पाषाणा पाझर सुटती रे !

या ओळी खरं तर लताबाईंच्या साक्षात्कारी सुरामध्येच ऐकल्या पाहिजेत. खळेमास्तरानी या ओळीना नवनीताहून मृदु स्वरात भिजवलं आहे. भाई, 'अवघ्या महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व !' खर म्हणजे 'वैष्णव भाई' आहेत. जीवनाच्या भगभगीत, बोचऱ्या वाळवंटात भाईंनी शब्द, सूर, मुद्रा याचा 'अनुपम्य सुखसोहळा' निर्मिणारा खेळ मांडला आहे—त्यात टाळ-मृदंग आहेत, नर्तन-गायन आहे, हसत हसत कानउघाडणी करणारी भारुड आहेत. अशी मोठी मौज आहे !

रंगत चाललेल्या रसपूर्ण कीर्तनात बुवानी मध्येच नामस्मरण कराव, तितक्याच सहजपणे आमचे भाई, मधूनच एखाद्या दानाचा संकल्प जाहीर करतात. बाकी 'देणं' हा भाईंचा स्थायीभावच आहे. चांगल्या काव्याला, निखळ सुराना, जिवंत अभिनयाला, सर्वस्व ओकून देऊन केल्या

जाणाऱ्या सत्कार्याला भाई मनापासून दाद देतात. अशीच मनमोकळी दाद ते रस्त्याच्या कडेच्या थांब्यात पुढ्यात येणाऱ्या तंदुरी चिकनला देतात. नव्या लेखकांना, कलावंतांना सरसरून दाद देणारे भाईच ! मराठी माणसांना भाईंनी एक निर्भर हास्य दिलं, अस्सल अश्रू दिले आणि जगभरच्या आनंदयात्रेतून गवसलेलं विश्वात्मकपणाचं सौंदर्य मराठी माणसाच्या दोन खोल्यांत आणून ठेवलं. पु. लं.च्या बहुतेक प्रवासवर्णनात, नाना प्रकारच्या माणसांचंच प्रामुख्यानं दर्शन होतं. माणसं निरखण्यात, त्यांच्याशी अनामिक नातं जोडण्यात विलक्षण रमणारा हा राजा माणूस आहे. भाई एका ठिकाणी म्हणतात, 'विनोद तर मित्र जोडत असतो. भाईंचा विनोद हा त्यांच्या मित्र जोडण्याच्या अव्याहत हव्यासातून निर्माण झालेला आहे. सर्व जीवांचे 'मैत्र' आपल्याला लाभावं या तळमळीनं भाई आपल्याजवळचं असेल नसेल ते समाजाला दान करण्याच्या घाईत असतात. मग भले ते म्हणोत, 'दान या शब्दाची मला किळस आहे. !'

भाईंच्या या देकाराला आपण 'दान' म्हणतो हे केवळ अज्ञान आहे. त्यांची स्वतःची धारणा अशी आहे की, 'कलावंत समाजाकडूनच सारं काही घेऊन निर्माण होतो – समाजामधूनच कलावंत अस्तित्वात येतो— जसा बर्फ पाण्यापासून तयार होतो.' कलावंत म्हणून आपल्या अस्तित्वाचं खरं श्रेय समाजाला आहे, हे भाई प्राजलपणे सागतात. हे ऋण थोडं तरी फेडावं ही भाईंची आस आहे. 'कलावंत समाजातलाच असतो— पण समाजापेक्षा दोन अंगुळं वर राहणं, दोन पावलं पुढं राहणं हे लेखकाचं सिद्धकर्तव्य असतं— असं झालं तरच कलावंत समाजाचं जीवन न्याहाळू शकतो. कलावंताला एवढी मुभा असावी' – एक कलावंत म्हणून पु. लं. ची भूमिका अशी लख्ख आहे. किती कलावंत आज समाजाच्या पुढं 'दोन पावलं' आहेत ? कितीजण ही कलावंताची मिरास वागवतात ?

भाईंनी गेली तीस वर्षं हे व्रत सांभाळलं आहे. 'दोन पावलं' पुढं राहून समाजावर त्यांनी मायेची, कौतुकाची दृष्टी ठेवली आहे. माझ्या मराठी माणसाचं जीवन संपन्न व्हावं, बहू अंगांनी बहरून यावं, नव्याचं इथे स्वागत असावं, जुन्याबद्दल रेंगाळती आपुलकी असावी— कसलंही कोडलेपण मनावर नसावं याची भाईंनी आईच्या सहजपणे व सजगपणे चिंता वाहिली आहे: चिंतन केलं आहे—नव्या जीवनदृष्टीचं प्राण ओतून सिंचन केलं आहे.

'मुक्तांगण' हा पु. लं. चा खास स्वतःचा शब्द ! त्यांच्या दोन प्रेरणांचं फार छान दर्शन घडवणारा आहे. माणसाचं जीवन मुक्त असावं – पण मनाला अंगणाची ओढ असावी, त्यामागच्या घराची सोबत असावी हे भाईंचं सांगणं आहे, बोलणं आहे, वागणं आहे. 'मुक्तांगण' हा या अर्थानं एकशब्दी असा मंत्रच आहे. या मुक्त अंगणात साऱ्यांना प्रवेश आहे. 'मेरे अंगने मे तुम्हारा क्या काम है ?' असा प्रश्न भाई फक्त राजकारणाला, ढोंगाला विचारतात.

भाईंचा प्रवास सत्यापासून शिवाकडे, शिवापासून सुंदराकडे असा सहजच होत गेला आहे. प्रथम त्यांनी विनोदाच्या अंगानं जीवनातल्या सत्याचा मागोवा घेतला आणि ती कटु सत्यं 'आपल्या' माणसांपुढं हसत-हसवत मांडली. मंतर 'कोठा साफ' केल्यावर प्रसन्न अशा जीवनदृष्टीची सर्जनशील मशागत करून जीवनात जे जे शिव आहे त्याची ओळख करून दिली. त्यानंतरचा टप्पा म्हणजे सौंदर्याचा स्वांतसुखाय असा मुक्त आस्वाद ! यासाठी भाई आता काव्याकडे वळले आहेत, असं म्हणणं तितकंसं युक्त नाही. कारण काव्य हे भाईंचं पहिल्यापासूनच मर्मस्थान आहे. हसणाऱ्या-हसवणाऱ्या विदुषकाच्या त्या मुखवट्यामागं भाईंचं काव्यप्रेम झाकून गेलं होतं ते आता 'सरसे' झालं आहे. पु. शि. रेगे, मर्ढेकर यांच्या काव्याबाबत भाई किती तृप्त विव्हळतेनं बोलतात हे थोड्याच भाग्यवंतांना माहिती असेल ! अशा थोड्यामध्ये मी आहे, हे माझं मी भाग्य समजतो. ऐन तिशीमध्ये तुकयाच्या लडिवाळ अभंगवाणीत 'कैद' झालेले भाई आता साठीच्या शांतकाळी समर्थांचे वशज असलेल्या मर्ढेकरांच्या काव्यातील जीवघेणी आर्तता, अस्वस्थता 'उधार' घेत आहेत. संतुष्टतेचं सावट मनावर कधी येऊ नये यासाठी आटापिटा करणाऱ्या भाईंना उत्तरकालामध्ये मर्ढेकरासारखा 'दैवी असंतुष्टता' भोगणारा सहचर हवाहवासा वाटावा हे साहजिकच वाटतं. 'उद्याच्या माऊलीला, पायाचं तीर्थ घेईतो 'थांबा' असं विनवणारी भावुकता व शरणता, मर्ढेकरांच्या साऱ्या उध्वस्त सृष्टीमध्ये, कोवळेपणानं लवलवणाऱ्या हिरव्या कोंभासारखी खुणावते. सृजनशीलापुढं विनम्र होणारी ही भक्ताची भाषा भाईंना भूल पाडते यात नवल ते काय ?

सौंदर्याच्या, सृजनाच्या, खोल सहिष्णुतेच्या या स्पंदनात देणं-घेणं, करणं-करवणं-जिंकणं-हरणं या हिशेबी हिकमतींना जागा कोठली ? भाईंनी आयुष्यभरच्या 'धडपडी' नंतर काव्यात विसावा शोधावा, ही एक तितकीच काव्यमय घटना ! या विसाव्यातील काही शात क्षण मराठी माणसानाही लाभावेत हीच ओढ आता भाईंना लागलेली असावी.

मराठी माणसासाठी भाईंनी हे केलं, ते केलं, असं मी मघापासून म्हणतो आहे; पण भाईंकडून मला काय मिळालं हे सांगितल्याखेरीज मला बरं वाटणार नाही. धवल चांदणं साऱ्या सृष्टीला उजळून काढीत असतं; पण आपल्या घराच्या खिडकीच्या गजांतून आत येणारं चिमुकलं चांदणंच आपल्याला निःशब्द सोबत करीत असतं, तसंच काहीसं हे आहे.

सुमारे पाव शतक भाईंच्या शब्दांनी मला आनंदाच्या क्षणी अधिक आनंदी केलं आहे. दुःखाच्या, पराभवाच्या, निराशेच्या अंधारात सांत्वना दिली आहे. 'जीवन सुंदर आहे' हे सत्य माझ्या नजरेसमोर सतत तरळत ठेवलं आहे. मी कृतज्ञ आहे.

मागील महिन्यात मी भाईंना, त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छादर्शक पत्र पाठवलं. त्यांना ते पत्र मिळाल्या दिवशीच त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात मला पत्र पाठविलं. ते म्हणतात,

'प्रिय चंद्रशेखर,

माझ्या वाढदिवसाबद्दल पाठविलेल्या शुभेच्छांचं पत्र मिळालं. मनःपूर्वक धन्यवाद ! गोदाकाठच्या वास्तव्यात काही नवं लेखन ?'

तुमचा
भाई

लपेटदार, लाघवी अक्षरात, ही पृच्छा वाचल्यावर मला आश्चर्य वाटलं. मी कधी काळी लिहीत होतो हे कुणाच्याच, माझ्या-

पृष्ठ २३ वर

अवतीभवती । शरद कृष्णन्

# दत्ता सामंत × रामनाथ गोएंका लढत अखेरच्या टप्प्यात

इंडियन एक्सप्रेस गटामधील कामगार जेव्हा दत्ता सामंत यांच्या मागे उभे राहिले तेव्हा अपेक्षा अशी होती की,या नवीन प्रांतामध्ये उतरलेले सामंत कामगारांच्या पदरात काही तरी घसघशीत आर्थिक यश टाकतील. मासिक वेतनामध्ये लक्षणीय वाढ होईल, या अपेक्षेने सामंतांच्या भोवती जमा झालेल्या कामगारांना मनस्ताप आणि नोकरीच्या शाश्वतीबाबत तणाव या गोष्टींना तोंड द्यावे लागत आहे. औद्योगिक क्षेत्रामध्ये सामंत यांची मोठी ताकद असल्यानेच ते मोठ्या उमेदीने आणि कामगारांना भरघोस आश्वासने देऊन 'इंडियन एक्सप्रेस' प्रकरणात उतरले. एक्सप्रेसने मुख्यमंत्री अंतुले यांच्या विरुद्ध जी आघाडी उघडली होती त्यामुळे नाराज झालेल्या मुख्यमंत्र्यांनीच सामंतांना—एक्सप्रेस गटाचा संप घडवून आणण्यास प्रवृत्त केले असे आरोपही केले गेले. आपल्या मागण्यांना एक्सप्रेस व्यवस्थापन दाद देत नाही हे लक्षात आल्यावर कामगारांना थंड्या कामाचे धोरण स्वीकारायला लावून सामंतांनी आपली चुणुक दाखविली; पण व्यवस्थापन बधले नाही. एक्सप्रेस, लोकसत्ता आणि अन्य वृत्तपत्रे यांचे प्रकाशन करणे अवघड आहे हे लक्षात येताच गोएंकाशेठ यांनी प्रथम टाळेबंदी पुकारली आणि लगोलग एक्सप्रेस गटाचा मुंबईमधील गाशा गुडाळण्याची तयारी केली. या काहीशा अनपेक्षित हालचालीमुळे कामगार अस्वस्थ झाले. मालकांनी उचललेल्या या पावलाला महिना-दीड महिना होऊन गेला. लवकरच काही तरी तोड निघेल असे सांगण्यात येत असले तरी मालकांनी जे ताठर धोरण स्वीकारले आहे ते पाहता, सामंतांच्या पदरात यश टाकून जाईल अशी कोणतीही तडजोड व्यवस्थापन मान्य करणार नाही. या संपप्रकरणी सध्या तरी सामंत चांगलेच कोंडीत सापडले आहेत आणि कामगारही कदाचित सामंतांना बाजूला सारून काही वेगळा विचार करण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दत्ता सामंत यांनी गेल्या सप्टेंबरमध्ये एक्सप्रेस-प्रकरणी लक्ष घातले. कामगार मोठ्या संख्येने आपल्या मागे उभे राहतील असा विश्वास वाटल्याने त्यांनी आपल्या महाराष्ट्र कामगार संघाच्या वतीने एक्सप्रेस व्यवस्थापनाला २९ सप्टेंबर रोजी एक पत्र पाठवून दिले. एक्सप्रेस गटाच्या प्रगतीबद्दल आणि कामाच्या पद्धतीबद्दल समाधान व्यक्त करून सामंत यांनी कंपनीला मिळणारा नफा लक्षात घेता कामगारांना वीस टक्के बोनस द्यावा, तसेच कामगारांच्या वार्षिक उत्पन्नावर त्यांना दहा टक्के वाढ द्यावी, अशा दोन मागण्या पुढे रेटल्या. व्यवस्थापनाने कंपनीला मिळणाऱ्या नफ्याबाबत जो अवाच्या सवा दावा करण्यात आला होता तो खोडून काढला व अहमदाबाद, दिल्ली, चंडीगढ येथील प्रकाशने लक्षात घेता कंपनीला १४ लाख रुपयांचा तोटा झाल्याचे कळवले. नफा-तोट्याबाबत वाद खेळण्यात सामंतांना रस नाही. आर्थिक व्यवहार कागदावर नोंदले जाण्यापूर्वीच मालक भरपूर नफा उचलतात. कागदी घोडे नाचवून तोटा दाखवणे अवघड नाही असे आपले मत असल्याचे सांगून सामंत म्हणतात, 'व्यवस्थापन जर किमान वेतन एक हजार रुपये करणार असेल तर आपण लगेच कामगारांना कामावर जाण्यास सांगू.' या संदर्भात व्यवस्थापन व दत्ता सामंत यांच्यामध्ये प्रत्यक्ष बोलणी झालेली नाहीत. तथापि रजनी पटेल, राम जेठमलानी यांसारख्या मध्यस्थांमार्फत ही देवघेव झाली. सामंतांच्या कामगार संघाला बहुसंख्य कामगारांची संघटना म्हणून मान्यता देण्यासही व्यवस्थापनाने नकार दिल्याने, मध्यस्थांमार्फतच आपले म्हणणे सामंतांनी व्यवस्थापनापर्यंत पोचवले. कामगारांना सरसकट दरमहा २०० रुपये वाढ द्या अशी एका ओळीची मागणी सामंतांनी केली. त्याला प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर त्यांनी ही रक्कम वाढवून किमान तीनशे रुपये वेतनवाढ द्यावी अशी नवी मागणी केली. सामंत यांच्या मागण्या आर्थिक स्वरूपाच्या असल्या तरी त्यामध्ये सातत्य नाही. परिस्थिती पाहून ते आपल्या मागण्यांचे स्वरूप बदलत असतात. सध्या त्यांची पूर्ण कोंडी झाली आहे. कामगारांचा पाठिंबाही पहिल्या सारखा नाही. तेव्हा सन्मानाने यातून वाट काढण्याच्याच प्रयत्नात ते आहेत. व्यवहारचतुर गोएंकाशेठजींनी सामंतांना पुरेसे आत घेऊन आणि काही अनपेक्षित हालचाली करून त्यांची कोंडी केली आहे. सामंत अजूनही आक्रमक भाषा करत आहेत. एक्सप्रेस गटाला प्रचंड फायदा होतो; परंतु कामगारांना त्यांचा न्याय्य वाटा मिळत नाही, या भूमिकेचे पुरेसे समर्थन करता न आल्याने 'माझ्या मागे ५ हजार कारखान्यांमधील १० लाख कामगारांची शक्ती आहे आणि वेळ आली तर मी तिचा वापर करीन', अशी खास त्यांच्या तंत्राची भाषा ते अजूनही करतात; परंतु एक्सप्रेस गटामधील कामगारशक्ती त्यांच्यामागे एकमुखी उभी नाही. अलीकडेच त्यांनी जी सभा घेतली त्याला आश्चर्य वाटावे इतकी कमी उपस्थिती होती.

सामंतांनी आपली ताठर भूमिका सोडावी म्हणून राम जेठमलानी यांनी प्रथम प्रयत्न केले. आर्थिक व्यवहाराबाबत तुमचे समाधान झाले नसेल तर तुम्ही म्हणाल त्या व्यक्तीसमोर संपूर्ण आर्थिक तपशील ठेवण्याची व्यवस्थापनाची तयारी असल्याचे जेठमलानी यांनी सामंतांना कळवले. प्रथम त्यांनी या गोष्टीला तयारी दाखवली; परंतु त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे नंतर त्यांनी आपला विचार बदलला. व्यवस्थापनाकडे कोणताही निरोप न पाठवता त्यांनी कामगारांना मंदगती काम करण्याचे आदेश दिले. वृत्तपत्रांना हे मंदगती-प्रकरण परवडण्यासारखे नव्हते. त्यामुळे ३० ऑक्टोबर रोजी एक्सप्रेसचा अंक गरजेच्या निम्म्यानेही छापून झाला नाही.

लोकसत्तेची अवस्थाही तशीच होती. व्यवस्थापनाने लगोलग हालचाल करून प्रथम टाळेबंदी केली आणि त्यापाठोपाठ एक्सप्रेस गटाचा व्यवहार आपण कायमचा बंद करणार असल्याचेही घोषित केले. हे असे काही होईल अशी अपेक्षा नव्हती. व्यवस्थापन थोडेफार ताठर धोरण स्वीकारेल; परंतु दबाव येताच नरमाईचे धोरण स्वीकारले जाईल अशी अपेक्षा होती. गोएंकाच्या या अनपेक्षित निर्णयाने कामगार हादरले. सामंत अस्वस्थ झाले; पण गोएंका मात्र आपली घोषणा केवळ स्टंट नाही हे दाखवण्यास उत्सुक होते. त्यानी ११ नोव्हेंबरला सर्व कामगाराना वैयक्तिक नोटिसा पाठवून आपण व्यवसाय बंद करत असल्याचे कळविले. तसेच लगोलग महाराष्ट्र सरकारला पत्र पाठवून व्यवसाय बंद करण्याची परवानगी मागण्यात आली. व्यवस्थापनाकडून असेही जाहीर करण्यात आले की, एक्सप्रेस समूहामध्ये तीन महिन्यांची टाळेबंदी राहील आणि त्यानंतर गाशा कायमचा गुंडाळण्यात येईल. एक्सप्रेसचे अरुण शौरी म्हणतात, दत्ता सामंतांबरोबर वाटाघाटी करणे शक्यच नव्हते. प्रथमपासूनच त्याची भूमिका अशी होती की, व्यवस्थापनाला टोकाचा निर्णय घ्यावा लागावा. आपल्या भूमिकेमध्ये त्यांनी वारंवार बदल केला. त्याच्या निर्णयामागे कामगारहितापेक्षा इतर गोष्टीनाच जास्त महत्त्व होते, असे आपले मत असल्याचे अरुणजीनी सागितले. अंतुले प्रकरणी अरुणजीचा पहिला लेख प्रसिद्ध झाला. त्यापूर्वी तीन दिवस सामंतानी एक्सप्रेस व्यवस्थापनाकडे आपल्या युनियनच्या मागण्या करणारे पहिले पत्र पाठवले. ही वस्तुस्थिती व्यवस्थापनाला पूर्णपणे माहीत असूनही अंतुलेजीच्या सागण्यावरून मी एक्सप्रेसप्रकरणी लक्ष घातले, असा खोडसळ प्रचार व्यवस्थापनामार्फत करण्यात येतो. केवळ कामगारहिताच्या दृष्टीनेच आपण आपल्या हालचाली करतो, असा सामंताचा दावा आहे. व्यवसाय बद करणे ही सोपी गोष्ट नाही. कामगार-प्रश्नावर तो उपाय नव्हे याची गोएंकाशेठना जाणीव नाही असे नाही. कायदेशीररीत्याही अशा पद्धतीने व्यवसाय बद करता येणार नाही. महाराष्ट्राचे राज्यपाल ओ. पी. मेहरा यांनी २७ ऑक्टोबर रोजी एक वटहुकूम काढून १०० पेक्षा अधिक कामगार असलेल्या उद्योग-समूहास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय व्यवसाय बंद करता येणार नाही असे बधन घातले आहे. याच फतव्याचा दाखला देऊन कंपनीने बेकायदेशीर कारवाई केली आहे असा दावा सामंतानी केला आहे. तर व्यवस्थापनाने राज्यपालांच्या वटहुकुमाला न्यायालयामध्ये आव्हान दिले आहे. न्यायालय या प्रकरणी काय निवाडा करील तो करील, परंतु एक्सप्रेस गटाच्या ११०० कामगाराचे भवितव्य टांगणी लागले असून यातून नेमके काय निष्पन्न होईल याकडे त्याचे सारे लक्ष लागून राहिले आहे.

### पालेकर शिफारसींची अंमलबजावणी

आपल्या मागण्या पुढे रेटण्यास सामंतानी तशी चुकीची वेळ निवडली असे दिसते. एक तर व्यवस्थापनाने अलीकडेच पालेकर शिफारशीची अमलबजावणी करून मागील बाकीपोटी २४ लाख रुपयाचे वाटप केले. खेरीज २२ लाख रुपयाचा वेतनवाढीचा बोजाही स्वीकारला. कंपनीच्या नफ्याचा मोठा भाग अशा प्रकारे खर्ची पडला. वृत्तपत्रीय कागदाच्या किमती अवाजवी वाढल्याने खर्चामध्ये लक्षणीय वाढ झाली. अशा परिस्थितीमध्ये कोणताही नवा बोजा कंपनी लगोलग स्वीकारू शकणार नाही हे माहीत असूनही सामंत आपल्या मागण्या रेटत राहिल्याने अडचणी निर्माण झाल्या आहेत.

प्रचड खपाची एक्सप्रेस गटाची वृत्तपत्रे प्रसिद्ध होत नसल्याने इतराना त्याचा थोडाफार लाभ मिळत आहे. आर. के. करंजिया यांच्या 'दडेली' या वृत्तपत्राचा खप एक लाखावर गेला आहे. टाइम्स ऑफ इंडियाने जाहिरात देऊन विक्रेत्याकडे आपला अंक मिळत नसल्याने वर्गणीदार होण्याचे आवाहन केले आहे. शेठजीचा विचार काहीही असला तरी एक्सप्रेस समूहाची प्रकाशने कायमची बद होतील असे कोणालाच वाटत नाही. परतु जेव्हा ती सुरू होतील तेव्हा कामगारांच्या पदरात फार काही पडलेले नसेल आणि पुन्हा प्रकाशन सुरू झाल्यावर त्याना पूर्वीचे तेज यायला पुरेसा अवधी लागेल असे सपपरिस्थितीवरून वाटते.

## □ धार्मिक अतिरेक्यांचा हिसका

खरे वाटणार नाही, पण गोष्ट खरी आणि अलीकडची आहे मुसलमान स्त्रियानी सिनेमा पाहणे धर्माच्या विरोधात आहे असा प्रचार विजापूरमधील काही मुस्लिम तरुणानी सुरू केला. धर्मपीठामधील काही मंडळीचा त्याला पाठिंबा मिळाला आणि मग मुस्लिम तरुणानी चित्रपटगृहावर मोर्चे नेले. नतर मुस्लिम वस्तीमध्ये घरोघरी फिरून स्त्रियानी चित्रपट पाहू नयेत असा प्रचार सुरू केला. वास्तविक पाहता चित्रपटाचा आणि धर्माचा तसा काही सबंध नाही. तथापि प्रचाराचा जोर पाहून भीतीपोटी मुस्लिम महिला आणि तरुणी चित्रपटगृहाकडे जाईनाशा झाल्या. याबाबतचा प्रचार चागला जोरात असताना आणि धर्मपीठाचा या मागणीला पाठिंबा असताना तझीम या तरुणाच्या संघटनेने या मागणीचा जोरदार पाठपुरावा सुरू केला. विजापूरच्या अंजुमान ज्यु कॉलेजमधील एक शिक्षिका कु नजाम बगी याना हा सर्वच प्रकार साफ नामजूर होता. धार्मिक कारणासाठी अशी बदी घालणे त्याना मजूर नव्हते. त्यानी वाढत्या प्रचाराकडे दुर्लक्ष करून चित्रपट पाहण्याचे ठरवले. चित्रपट पहायचा की नाही हे ज्याचे त्याने ठरवावे, धर्माचा त्याच्याशी काही संबंध नाही असे त्याचे मत असल्याने त्यानी स्वत ला योग्य वाटला तो चित्रपट पहायचे ठरवले. नजामबाई सिनेमाला गेल्या आहेत हे समजले मात्र, ज्याचा मुस्लिम स्त्रियानी सिनेमा पहायला विरोध होता, अशा तरुणानी एक मोर्चा चित्रपटगृहावर नेला. जमलेल्या या मंडळीकडून बाईंना अवहेलना सहन करावी लागली. गर्दीमधून बाहेर पडणे सुरक्षित नाही हे लक्षात आल्याने त्यानी फोनवरून आपल्या वडिलांशी संपर्क साधला वडील आले व मग वातावरण जरा निवळल्यावर नजामबाई बाहेर पडू शकल्या. अर्थात सिनेमा पहायचा जो घोर अपराध त्यानी केला याची ही फक्त चुणुक होती. आपण एवढा जीव तोडून प्रचार करत असताना आणि त्याला बऱ्यापैकी प्रतिसाद मिळत असताना एक बाई सिनेमा बघण्याचे धारिष्ट दाखवते म्हणजे काय, असे वाटून याबाबत आघाडीवर असलेल्या मडळीनी नजामबाईंच्या विरुद्ध आघाडीच उघडली.

शिक्षिका म्हणून नजामबाईंचा बऱ्यापैकी लौकिक होता; परंतु त्यांनी चित्रपट पाहिल्याचे समजताच त्याना नीट शिकवता येत नाही, अशी तक्रार करण्यात आली. वर्गामध्ये त्या शिकवत असताना त्याना त्रास देण्यात येऊ लागला. नजामचे सुदैव एवढेच की, तिचे कुटुंबीय मजबूतपणे तिच्या पाठीशी उभे राहिले. तिचे वडील सेवानिवृत्त सरकारी नोकर आहेत. त्यानी हे सारे प्रकरण पोलिसाकडे नेले, पण त्याचा फारसा उपयोग होऊ शकला नाही. विजापूर हे तसे काही लहान गाव नाही किंवा मुसलमानामध्ये कोणी प्रगत विचाराची माणसे नव्हती असेही नाही. परंतु उघडपणे नजामचे समर्थन करण्यास कोणी पुढे येईना. आपल्या सहकाऱ्याचा आणि आपल्या शिक्षण-संस्थेचा आपल्याला पाठिंबा मिळेल असे नजामला वाटत होते; परंतु त्यांनीही नकारात्मक भूमिका घेतली. या साऱ्या प्रकारची बऱ्यापैकी वाच्यता झाल्यावर कोणी पत्रकार या बाईकडे गेला. त्या पत्रकाराने हे सारे प्रकरण बंगलोरच्या एका कन्नड साप्ताहिकामध्ये प्रसिद्ध केले. मुस्लिम स्त्रियानी चित्रपट पहावा की नाही याबाबतची नजामची मते प्रसिद्ध झाली मात्र, विजापुरामध्ये पुन्हा काहूर उठले. खरे वाटणार नाही पण तिच्या निषेधाच्या घोषणा देत तीन हजाराचा जमाव पोलीसचौकीवर गेला ! आपल्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्याची तक्रार जमावाचे नेतृत्व करणाऱ्या मंडळींनी केली व या बाईंना व त्याची मुलाखत प्रसिद्ध करणाऱ्या पत्रकाराला तावडतोब अटक करावी अशी मागणी करण्यात आली. नजामबाईंच्या घरी पोलीस रवाना झाले; पण त्यानी पोलीसचौकीवर येण्यास नकार दिला. स्थानिक पत्रकारानी घाबरून जाऊन प्रसिद्ध झालेल्या मुलाखतीशी आपला संबंध नाही, असे जाहीर निवेदन प्रसिद्ध केल्याने सारा रोष बाईवर होता. पोलीसचौकीवरून काही लोक त्याच्या घरी गेले; परंतु नजामबाईंनी दरवाजा उघडण्यास नकार दिला. दरवाज्यावर धडका देण्यात आल्या; परंतु तो तोडण्यात आला नाही हेच भाग्य समजायचे। संतप्त जमाव पुन्हा चौकीवर गेला. काही वरिष्ठ अधिकारी पुन्हा नजामबाईंच्या घरी गेले. मुस्लिम लिगच्या काही कार्यकर्त्यांनी सेक्शन २९५ खाली तक्रार गुदरल्याने तिने चौकीवर येऊन निवेदन देणे आवश्यक असल्याचे तिला सांगण्यात आले. तिच्या घरच्या मंडळींनी महिला पोलीस बरोबर असतील तरच ती येईल असे सांगितले; तेव्हा महिला इन्स्पेक्टर बोलावून घेण्यात आले. नजाम त्यांच्याबरोबर चौकीत गेल्यावर तेथे हजर असलेल्या असिस्टंट पोलिस सुपरिन्टेंडेंट यानी, तिने चौकीवर येण्याबाबत जी दिरंगाई दाखवली त्याबाबत तिची कानउघाडणी केली. आपल्याला वैयक्तिक जामिनावर सोडावे अशी मागणी तिने केली; परंतु ती नाकारण्यात आली. दोन तास होऊन गेले. रात्रीचे दहा वाजून गेले आणि तरी मुलगी परत आली नाही म्हणून वडील चौकीत गेले. दरम्यान जमाव कमी झाला होता. तेव्हा दबाव हलका झाल्याने पोलिसानी वडलाबरोबर तिला घरी जाऊ देण्यास परवानगी दिली आणि पोलीसबंदोबस्तामध्ये तिची पाठवणी करण्यात आली. त्यानंतरही नजामला धमक्या देण्यात आल्या. तिच्या कुटुंबावर जवळजवळ बहिष्कार घालण्यात आला.

नजामने सिनेमा पाहण्याचा जो घोर अपराध केला त्यामुळे धार्मिक अतिरेक्यानी केलेल्या साऱ्या हालचाली नजामच्या वडलानी मुख्यमंत्र्याना कळविल्या. तसेच या साऱ्या प्रकाराला वृत्तपत्रातही बऱ्यापैकी प्रसिद्धी मिळाली. मग पोलिसानी दुसऱ्या दिशेनेही थोडी फार हालचाल सुरू केली. नजामला व तिच्या कुटुंबियाना दमदाटी केल्याबद्दल दोन लोकाना पकडण्यात आले. या प्रकरणाचा बराच गाजावाजा झाल्यावर भारतीय जनता पक्षाचे एक नेते ए. के. सुब्बय्या यानी हे प्रकरण विधानसभेपर्यंत नेले. वातावरण आपल्या विरोधात आहे हे लक्षात आल्यावर अतिरेक्यानी नरमाईचे धोरण स्वीकारले असले तरी नजामला अजून आपण सुरक्षित आहोत असे वाटत नाही. कामावर जाताना आणि येताना काही हितचिंतक आणि पोलीस याचे संरक्षण तिला द्यावे लागते. आता म्हणजे एवढे रामायण झाल्यावर नजामने सिनेमा पाहण्याचे ठरवले आणि पुन्हा उपद्रव होऊ नये म्हणून पोलिससंरक्षणाची मागणी केली. तेव्हा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तिने आणखी एखादा महिना थांबावे असा सल्ला तिला पोलिसानी दिला. तिनेही तो मानला. दरम्यान बंगलोरमधील काही मुस्लिम तरुणींनी नजामबाईंचे अभिनंदन केले असून त्याच्या निर्णयाचा पाठपुरावा केला आहे. अतिरेक्याच्या अशा हालचालींचा कायम स्वरूपाचा परिणाम होत नसतोच; परंतु आज १९८१ सालातही विजापूरसारख्या शहरात असली विक्षिप्त मोहीम निघू शकते आणि दडेली करून त्याची अंमलबजावणी केली जाते याचेच आश्चर्य वाटल्यावाचून रहात नाही. विजापूरमध्ये नजामबाईंच्या संदर्भात जो प्रकार झाला त्याबाबत त्याना सहानुभूती दाखवणारी अथवा मुस्लिम स्त्रियानी चित्रपट न पाहण्याबाबत अतिरेक्यानी जी मोहीम चालवली त्याबाबत मुस्लिम धर्मपीठाकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया उमटू नये ही पण आश्चर्याचीच बाब मानावी लागेल. □


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

## सैबेरियातून केलेल्या चित्तथरारक पलायनाची कथा ( लेखांक पाचवा )




**अनुवाद : श्रीकांत लागू**

### उपासमार, दुष्काळ आणि मृत्यू

गोबीच्या त्या भट्टीत, ऑगस्टच्या उन्हाळ्यात उंचसखल वाळवंटी प्रदेशात पहिल्या दोन दिवसांतच पुढच्या भीषण संकटांची चाहूल मला लागली. पृथ्वीगोलाच्या पूर्व कडेवरून येणाऱ्या पहिल्या सूर्यकिरणांनी रात्रीची कडक थंडी कुठल्या कुठे पळून जायची. सूर्योदयाची किरणं वाळूच्या ढिगाऱ्यांवर पडून विचित्र सावल्या लांबवर घळीमध्ये पसरायच्या. भीती चोरपावलांनी आमच्याभोवती फेर धरू लागली. आम्ही दोन प्रहराचा कडाका सुरू होण्याआधी शक्य तितकं अंतर काटण्यासाठी भराभर पाय ओढत होतो. अधून-मधून आमच्यापैकी कोणी तरी जवळच्या टेकाडावर चढून दक्षिणेकडे नजर फेकायचा आणि दृष्टिपथात यायचा क्षितिजापर्यंत पसरलेला भीषण वैराण वाळवंटी प्रदेश ! मध्यान्हीला आम्ही आमच्या काठ्या रुतवायचो. त्यावर आमची जाकिटं पांघरून जराशी सावली करायचो आणि विसावायचो. आमच्या दारुण परिस्थितीची कल्पना सर्वांना आलेली होती; पण कोणी त्यावद्दल तोंडातून ब्रही काढत नव्हता. कारण एकच होतं ख्रिस्तिना ! तिच्यासमोर विषय काढून तिचं मनोधैर्य खचू द्यायचं नाही या निर्धारानं प्रत्येक जण गप्प होता.

हवेतील कोरडी उष्णता आमच्या अंगातील आर्द्रता शोषून घेत होती. पावलांमध्ये वेड्या अडकविल्यासारखी शिथिलता येत होती. प्रत्येक जण आपल्याच विचारात पाय ओढत रहायचा. तोंडातून शब्द फुटायला ताकदच राहिली नव्हती. एकापुढे एक यंत्राप्रमाणे दुसरं पाऊल टाकायचं एवढंच शिल्लक राह्यलं होतं. बहुतेक वेळा मीच आघाडीवर रहायचो. कोलो आणि ख्रिस्तिना माझ्याबरोबरच असायची. बाकीचे घोळक्याने मागे असायचे. पहाटेच्या वेळी प्रयत्न-पूर्वक त्यांना मार्गी लावावं लागत असे. दुपारची विश्रांती कमी करण्याची कधीकधी सक्ती करावी लागत असे.

मावळत्या प्रकाशात चालत असताना माझ्या मनात पुन्हा भीती डोकावली. पार मूलभूत, मन खच्ची करणारी शंका डोकावली ! या भीषण जळत्या वैराणात आमचा मृत्यू ओढवला तर—त्यापेक्षा आल्या वाटेनं पुन्हा परत गेलं तर—त्या हिरव्या, ओल्या सुंदर भूप्रदेशाकडे पुन्हा परत गेलं तर—पण नाही. अतिशय कठोरपणे तो विचार मी आत गाडून टाकला.

रात्री आम्ही धडपडत एका घळीपाशी मुक्काम केला. वातावरण थंड झालं. तारे डोकावून आमच्याकडे पहात होते. आमच्या खिळखिळ्या झालेल्या थकल्या शरीरामुळं आम्हाला पटकन झोप लागेल असं वाटलं; पण घशाला पडलेली कोरड कोणालाही झोपू देईना. प्रत्येक जण कण्हत कसनुसा होत लोळत होता. मधेच उठून वेड्यासारखा फेरी मारायचा आणि परतायचा. सगळेच जागे असल्याचं लक्षात आलं. आम्ही त्या थंड हवेचा फायदा घेत स्वत:ला गोळा करून प्रवासाला सुरुवात केली. बरं वाटत होतं. पहाटे मुक्काम केला. दोन तास विश्रांती घेऊन पुन्हा दक्षिणेकडे कसलाही बदल नसलेल्या अथांग क्षितिजाकडे खरडचाल सुरू झाली.

या एका प्रसंगानंतर आमच्या निशाचाली बंद झाल्या. मॅकोनं थांबवल्या त्या.

त्यानं मला सरळच विचारलं, 'रात्री साऱ्यांच्या सहाय्यानं तू आपला मार्ग ठरवू शकतोस काय ?' इतर सगळे माझ्या तोंडाकडे पाहू लागले.

बराच वेळ विचार करून मी कबुली दिली. 'खात्रीपूर्वक सागता येत नाही.'

'आपल्यापैकी या पद्धतीची कुणाला माहिती आहे काय ?' त्यानं मुद्दा पुढं चालू केला. कोणीच बोललं नाही.

'याचा अर्थ आपण रात्रभर चाललो तरी एकाच वर्तुळात घोटाळत रहाणं अशक्य नाही.' तो जड आवाजात बोलत होता.

त्याच्या बोलण्याचा इतरांवर झालेला विस्मयचकित करणारा प्रभाव मला जाणवला. मी विरोध करायचा प्रयत्न केला. असं दाखवून दिलं की, पहाटे सूर्य उगवताना आपली तोंडं दक्षिणेकडेच होती. म्हणजे आपली दिशा चुकलेली नाही. मी हे असं म्हणत असताना माझ्या मनात मॅको म्हणतो तशी शक्यता दिसत होती. तेव्हा काहीही असलं तरी शंकेचं बी रुजलं होतं. आधीच विकल हळव्या झालेल्या मानसिक अवस्थेत, त्रास वाढेल असं काहीही करू नये असंच वाटलं.

त्यामुळं पहाटेच्या मंद प्रकाशात, जडशील वातावरणात पुन्हा मार्गक्रमण सुरू झालं. पश्चिमेकडूनच काय, पण कुठल्याही दिशेनं हवा हलल्याचा भाससुद्धा होत नव्हता. वातावरणातील अदृश्य धूलीकण आमच्या सर्वांगावर चिपकत होते. दाढचाची अवस्था मध नसलेल्या पोळयासारखी झाली होती. तडकलेल्या ओठाच्या चिरामध्ये धूळ जाऊन बसली होती. भयानक उन्हामुळं आधीच लालवटलेल्या पापण्यांवर धूळ बसून त्या एकजीव झाल्या होत्या. तरीही पाय ओढतच होतो.

अतिशय कडक नियंत्रण ठेवूनही जवळचा शेवटचा अन्नकण पाच दिवसात संपला. चौफेर निर्जीव क्षितिज वाढत होतं. त्या वैराण रखरखीत जगामध्ये झगडणारे ८ मानवी ठिपके आणि मधूनच दिसणारा एखादा साप एवढीच जीवसृष्टी होती. आम्ही कोणत्याही क्षणी आपली धडपड थांबवून, निपचित पडून मरूनही जाऊ शकलो असतो ! सूर्य मावळेपर्यंत तात्पुरत्या तंबूच्या आश्रयानं विश्रांतिकाळ वाढवण्याचा अनावर मोह होत होता. शरीरात ओलावा नावालाही शिल्लक नव्हता. पायाची अवस्था तर अत्यंत केविलवाणी झाली होती. झिजून छिद्रं पडलेल्या आमच्या मोजडयाच्या तळव्यांतून भट्टीतल्या वाळूचे कण आत शिरत आणि मरणप्राय यातना होत. शत्रूवरही असा प्रसंग येऊ नये असं वाटायचं !

सगळयाना विश्रांती आवरती घेऊन निघण्यासाठी हल्या हल्या करायला लागायचं. इथं तर काहीच नाही. मागेही काही नाहीये. तेव्हा काही असलंच तर पुढंच असेल. नव्हे असणारच ! ख्रिस्तिना, कोलो मला तावडतोब साथ द्यायचे. मात्र कुरकुरत इतरही उठायचे. यंत्रमानवांप्रमाणे आमचा घोळका रखडायला लागायचा. माना खाली घातलेल्या कसल्या तरी विचारात, कसल्या ते एक देवालाच ठाऊक ! अशा अवस्थेत एका पावलापुढं दुसरं पाऊल ठेवत तासन तास चालायचं. बस्स एवढंच !

सहाव्या दिवशी ख्रिस्तिना धडपडली. गुडघ्यावर कोसळली ! तिची तिलाच शरम वाटली. 'माफ कर राजीव. कशी पडले ते कळलंच नाही.' ती मदतीशिवायच वाळूत उभी राहिली आणि माझ्याबरोबर पावलं ढकलू लागली. आश्चर्य म्हणजे त्याच दिवशी दुपारी मीही असाच गुडघ्यावर आदळलो. मीच माझ्यावर चिडलो, हे असं काय झालं ? एका क्षणाला मी चालत होतो. दुसऱ्या क्षणाला नमाज पढताना असतात तसा गुडघ्यावर होतो.

मी उठलो. माझ्यासाठी कुणीही आपला जो काही होता तो वेग कमी केला नव्हता. मला वाटलं उठून उभं व्हायला मला बराच वेळ लागला. इतरांचीही अवस्था माझ्यासारखीच होत असल्याचं लक्षात आलं. सगळेच अधूनमधून ताकद संपल्यासारखे कोलमडायचे. आपण कोलमोडलो आहोत हेही लक्षात यायला काही क्षण लागायचे. पुन्हा कसेबसे उठायचे आणि मार्गक्रमण सुरू व्हायचे.

कुणाचीही संपून जाण्याची इच्छा नव्हती. कार्यक्षमतेचे ताकदीचे शेवटचे कण संपत आल्याच्या खुणा अधिकाधिक भेडसावू लागल्या होत्या. यमदूताने आपले हात पसरायला सुरुवात केली होती. त्याच्या सावल्यांनी डोळे अंधारून येत होते. त्या खुणांना मान देणं म्हणजे साक्षात मृत्यूला आमंत्रण, कोणीही इतक्या सहज मरायला तयार नव्हतं !

सातव्या दिवशीचा सूर्योदय नेहमीप्रमाणे गुलाबी, सोनेरी किरणांनी फुलून आला. कसलीही आशा न बाळगता कोलोनं एक उंचवटा चढायला सुरुवात केलेली आम्ही पहात होतो. सपाटीवर चालणंही मुष्कील होतं, तिथं चढ चढायचा म्हणजे काय हाल असतील याची कल्पना करा ! रोज सकाळचा हा कार्यक्रमच होता. दूरवरचं दिसेल एवढा उजेड झाला की कोणी तरी एकानं टेकाडावर चढायचं आणि दक्षिणेकडे काही दिसतंय का ते पहायचं. कोलो वर पोचला. कपाळावर पंजाच छप्पर करून लांबवर न्याहाळू लागला. नेहमीप्रमाणेच वैतागानं उडवलेले खादे आम्हाला पहायला मिळतील असं वाटलं होतं; पण कोलो खाली न उतरता उजव्या हातानं खुणा करून काही तरी दाखवू लागला. मीही वर गेलो. थकलेल्या डोळयाना प्रथम नीट दिसेना. डोळे चोळून पुन्हा निरखून पाहू लागलो. खरंच तिकडे काही तरी होतं. कसला तरी गडद डाग दिसत होता. भुऱ्या रंगाच्या वाळूवर वेगळा कळत होता. सुमारे पाच मैलावर असावा. सकाळच्या धूसर प्रकाशात ते नक्की काय होतं ते ओळखता येत नव्हतं; पण काही तरी वेगळं आहे हे जाणवताच जीव उचंबळून येऊ लागला.

पालुको 'एखादं जनावर असेल काय?'

स्मिथ 'काय असेल ते असो; वाळूचा ढिगारा नक्की नाही. काय आहे ते आपण शोधून काढू या !'

त्याच्याजवळ पोचायला जवळपास दोन तास लागले. खरंच ती झाडं होती. अगदी खरीखुरी, हिरवीगार, जिवंत, रसरसलेली झाडं होती. पांढऱ्या टेबलक्लॉथवर शाईचा डाग पडावा तसा त्या भगभगीत वाळूच्या पार्श्वभूमीवर तो झाडांचा पुंजका दिसत होता.

स्मिथ उत्साहानं म्हणाला, 'जिथं झाडं आहेत तिथं पाणी असलंच पाहिजे!'

'ओएसिस !' कुणी तरी ओरडलं. 'ओएसिस' हा एकच शब्द सगळयाच्या तोंडातून घुमू लागला.

ख्रिस्तिना कुजबजली, 'ही तर देवाची करणी आहे. त्यानं आपल्याला वाचवलंय !'

आम्हाला जर धावता आलं असत तर आम्ही धावलोच असतो. शेवटचा अर्धा मैल आमचे पाय जितक्या वेगानं ओढता येतील तेवढ्या वेगानं ओढत होतो, धडपडत होतो. आडवे होत होतो. पाण्यासाठी हपापलो होतो. जिभा कोरड्या पडून घशाला सूज आली होती. झाडं मोठी मोठी होत गेली. झाडं पामची होती. त्याच्या सावलीत अंडाकृती खळगा दिसत होता. त्याच्यात नक्कीच पाणी असणार होतं. शंभरएक यार्ड आधी निश्चितपणे मळलेली काफिल्याची पूर्व-पश्चिम वाट दिसत होती. झाडाच्या जवळच अत्यंत विचित्र वाटणार असं भंगाराचं गुदाम असल्यासारखं दिसत होतं. बरीचशी टिनाची डबडी ढिगारून पडली होती.

सुमारे डझनभर किंवा थोडी जास्त अशी ती झाडं त्या तळ्याच्या दक्षिणेकडे चंद्रकोरीसारखी वाढली होती. त्याची सावली दिवसाचा बराच काळ त्या जलाशयावर पडत असावी. त्या निर्मळ थंडगार जलाशयाचा काठ खडबडीत दगडांनी बांधून काढल्यासारखा दिसत होता. तो नवजीवनाची साक्ष पटवून देणारा हिरवागार परिसर साधारण अर्ध्या एकरात मावला असेल.

झारोकडे वाडगा होता; पण त्यात पाणी काढून ते सर्वांना वाटत बसण्याएवढा धीर होता कुणाला ? आम्ही हपापून पाण्याजवळ पालथे पडलो आणि जनावरासारखे जिभेने लपक लपक करून जलपान करू लागलो. अमृताची चव यापेक्षा वेगळी असेल असं वाटत नाही ! आमची तोंड पाण्यात बुचकळून थोडा वेळ पडून राहिलो. अंगावर पाणी उडवून भाजून निघालेली शरीरं थंडावू लागलो. पाणी पीत रहाण्याचा मोह आवरणं अशक्य होतं. कोणी तरी वेळीच धोक्याचा इशारा दिला, अनशेपोटी एवढं पाणी पिणं बरं नव्हे ! आमच्या थैल्या पाण्यानं थबथबवून त्यांच्या सहाय्यानं आमची भेगा पडून विदीर्ण झालेली पावलं हळुवारपणे धुतली. त्या पाण्याच्या अस्तित्वानं आणि स्पर्शानं आमच्या चित्तवृत्ती नव्या उमेदीनं फुलून आल्या. स्वर्गसुखाची कल्पना यापेक्षा वेगळी असेल काय ? निराशेच्या, भीतीच्या भीषण अंध कारातून नवजीवनाचा, आशेचा प्रकाश आमच्याभोवती उजळून निघाला. आमच्या हसण्या–खिदळण्याला, गप्पाना नुसता ऊत आला. कोणाला शंका आली असती की आम्ही जलपानाऐवजी शँपेन झोकली आहे !

आमच्या सुदैवी नशिबानं अजून आपलं रूप नीट दाखवलं नव्हतं. तळ्याच्या पलीकडे पूर्वेला वीसएक यार्डांवर अजूनही थोडी धुगधुगी असलेल्या शेकोटीचे अवशेष होते. नुकताच कुठला तरी उंटाचा काफिला इथे मुक्काम करून गेला असावा, अशा त्याच्या पावलाच्या ताज्या ठश्यावरून सहज कळत होतं. बहुधा सूर्योदयाच्या पहिल्या किरणाबरोबर प्रवास सुरू केला असावा. काफिल्यात जी कुणी माणसं होती, त्यानी मास खाल्लेलं होतं. कारण त्यातली लहानमोठी हाडं त्या जळक्या लाकूडफाट्याजवळ विखुरलेली होती. हाडकं, त्याना चिकटलेले मासाचे कण ताजेच दिसत होते. एक छोटं आणि एक मोठं जनावर मारलेलं असावं. आम्ही हाडकं वाटून घेतली आणि नशिबावर खूप होऊन दातानी त्या हाडावर तुटून पडलो. बिचारा बोळका पालुको ! त्यानं माझा सुरा मागून घेतला आणि इतराप्रमाणे मासाचे अवशेष कुरतुडू लागला. नळ्या फोडून त्यातला गरही आम्ही चोखून चोखून संपवला !

दुपारचे कडक उन्हाचे दोन–तीन तास आम्ही त्या पाण्याजवळच्या गारव्यात, सावलीत स्वस्थ पडून राहिलो. सूर्य जरासा कलला, उन्हाची तिरीप डोळ्यांवर आली तशी उठून उभा राहिलो आणि त्याचबरोबर आजूबाजूचं वाळवंट सभोवार भगभगू लागलं. वाडगा घेऊन पुन्हा अमृतप्राशन केलं. स्मिथही उठला. आळोखे-पिळोखे दिले आणि तोही माझ्या सोबतीला आला. हळूहळू सर्वच जागे झाले आणि इतस्ततः वावरू लागले.

'तो कसला ढिगारा आहे ते मी पहाणार आहे.' झारो पुटपुटला. आम्ही सगळेच पहायला गेलो. शहरी जीवनाच्या खुणा दर्शविणारा तो भंगाराचा ढीग म्हणजे आजवर कधीही न सुटणारं कोडंच राहिलं आहे. गोबीसारख्या वाळवंटात त्या ढिगाचं अस्तित्व मती गुंग करणार होतं. शंभरएक पत्र्यांच्या डबड्यांचा प्रचंड ढीग होता. कसली होती कुणास ठाऊक, पण इतक्या कोरड्याठाक हवामानातही ओळखू न येण्याइतकी गंजली होती ती. त्या ढिगाच्या खालून वाळूत रुतलेलं पाव इंची जाड तारेचं एक भेंडोळं पालुकोनं खेचून बाहेर काढलं जाड ताराचे तुकडे बारीक तारेने एकत्र बांधून ठेवले होते. हात लावताच त्या गंजलेल्या बारीक तारांचा भुगा झाला. थैलीत थोडी वाळू घेऊन मूळ तार मी घासून पाहिली. गंजाचा थर त्या मानानं पातळ होता. तार चांगल्या अवस्थेत होती. त्या तारेचं काय करायचं हे कुणालाच ठरवता येईना. हा खजिना आहे हे कळत होतं. तो मागं सोडून जाणं वेडेपणाचं होतं, पण त्याचा उपयोग काय आणि कसा होईल हे काहीच उमगत नव्हतं. शेवटी बऱ्याच चर्चेनंतर बरोबर वाहून नेता येईल अशा आकारात त्याचे तुकडे वळवायचं ठरलं.

त्यानंतर दिवसाचा उरलेला वेळ याच कामात घालवला. चार फूट लांबीचे तुकडे तोडले. त्याची टोकं 'ट'कारात वळवली आणि गळ्यात सहज अडकवता येतील अशी कडी तयार केली. धातू अत्यंत टणक होता. सहज तारेचं टोक दोन दगडाच्या फटीत धरायचं आणि कुऱ्हाडीच्या पालथ्या भागानं घण घालून टोक वळवायचं. भलतंच अवघड काम ! प्रत्येकासाठी एकेक कडं झाल्यावर झारो आणि इतर एकदोघानी २ फुटी आकड्या तयार केल्या. एक टोक धारदार आणि दुसरं टोक कमरपट्ट्याला अडकवण्यासाठी वाकवलेलं. इतकं झालं तरी तार शिल्लक होती; पण आता फार झालं असं म्हणून उरलेली तार टाकून दिली. एवढ्या श्रमानंतर काही तरी सत्कार्य केल्याचा आनंद सर्वांना मिळाला.

एक अटळ प्रश्नचिन्ह आमच्या पुढं उभं होतं : केव्हा निघायचं ? आमच्या दोन प्रश्नाना उत्तरंच नव्हती. ओएसिसमधे पाणी होतं; पण अन्नाचा पत्ता नव्हता आणि पाणी बरोबर न्यायचं तर बरणी नव्हती. मकोचं म्हणणं असं की, इथंच थोडे दिवस राहिलो तर एखादा काफिला मुक्कामासाठी येईल, तेव्हा थोडासा अन्नपुरवठा होऊ शकेल. माझं मन मला सांगत होतं की, निघालं पाहिजे. मी म्हणालो, 'एका काफिल्याची थोडक्यात चुकामूक झाली आहे. यानंतर कदाचित् कित्येक आठवडे कुणी इकडे फिरकणार सुद्धा नाही. अन्नाची वाट पहात आपण इथंच खंगून जाऊ आणि प्रत्यक्षात कुणी येईल तेव्हा आपले मृतदेहच त्याना पहायला मिळतील ! चमत्कारिक परिस्थितीत आम्ही सापडलो होतो. काही तरी निर्णय घेणंच प्राप्त

होतं. इसपार या उसपार ! सध्याकाळी उशीरा निर्णय झाला. पहाटे-पूर्वीच निघायचं !

पहाट होताच आम्ही निघालो आणि अर्धा दिवस उलटेपर्यंत, मागं वळून पाहताना झाडाचा पुजका दिसत राहिला. क्षितिजावरून त्या आकृत्या नाहीशा झाल्या तेव्हा मी निश्वास टाकला !

त्यानंतरचे आमचे तीन दिवस तुलनेनं झपाट्यानं गेले. चौथ्या दिवशी त्या जीवघेण्या झळा अचानक सुरू झाल्या. सगळी ताकद शोषली जात होती. ओएसिसच्या आधीच्या प्रकाराची पुनरावृत्ती सुरू झाली. अडखळणं, धडपडणं वारंवार होऊ लागलं. वेग मंदावला. बोलणं कुजबुजण्यावर आलं. मला आठवतं मॅको म्हणाला होता, 'नरकात सुद्धा इथल्यापेक्षा कमी गरम असेल !'

पाचव्या दिवशी ख्रिस्तिना गुडघ्यावर कोसळली. मी हळुवार तिच्याकडे वळून पाहिलं. वाटलं, पूर्वीसारखीचं पुन्हा उठून उभी राहील; पण नाही. तिची हनुवटी छातीवर टेकली होती. केशसंभारानं सगळं तोंड झाकलं गेलं होतं. कसलीही हालचाल होत नव्हती. मी आणखी जवळ गेलो. ती कंबरेतनंही मोडली आणि तोंडावर कोसळली ! त्याच क्षणाला आम्ही जवळ पोचलो आणि तिला उताणी केली. सगळं तोंड वाळूनं माखलं होतं. बेशुद्ध पडली होती. मी तिच्या अंगरख्याचा गळा मोकळा केला आणि तिला थोडीशी हलवत, हळुवार आवाजात तिला जागं करू लागलो. स्मिथनं फुर्फकाचं छत्र तिच्यावर धरून सावली केली.

ती थोड्याच वेळात सावध झाली. तिनं आमच्या रिंगण धरलेल्या उत्सुक चेहऱ्याकडे पाहिलं. ओठ विलग करून करुण हसली. 'आता बरं वाटतंय. मी बहुधा पडले असणार, काय झालं कुणास ठाऊक !'

'काही घाबरू नकोस !' मी तिला धीर देत म्हणालो, 'आपण इथंच थोडी विश्रांती घेऊ म्हणजे सगळ्यानाच जरा बरं वाटेल !'

ती पुढं वाकली. माझ्या पालथ्या हातावर थोपटून म्हणाली, 'नाही, मी आता पडणार नाही !'

आम्ही तिथच थोडा वेळ बसलो. ख्रिस्तिनानं आपला पायाचा घोटा खाजवण्यासाठी हात ताणला माझी नजर सहजच तिकडं वळली. तिचा घोटा प्रचड सुजला होता, तिच्या विजारीची तळटोकं कातडीत रुतल्यासारखी झाली होती.

'ख्रिस्तिना, तुला काही चावलंय का ?'

'नाही बुवा. का ?'

'तुझा पाय सुजलेला दिसतोय !'

तिनं पाऊल जवळ ओढून वळवलं. म्हणाली, 'अरे, माझ्या तर हे लक्षातच आलं नव्हतं !'

त्यानंतर आम्ही काही तास तसेच पडत-झडत चाललो. ती आता जरा बरी वाटत होती. थोड्या वेळान ती पुन्हा कोसळली; पण या वेळी तिला हातांचा आधारही घेता आला नाही. धाडकन तोंडघशी पडली !

आम्ही सुलटी केली. तिच्या नाका-तोंडात घुसलेली वाळू साफ केली पुन्हा सावली धरली. तिला नाकानं श्वासोश्वास करताच येत नव्हता. तोंडानं अत्यंत केविलवाणा श्वास चालू होता. मी तिच्या घोट्यांकडे पाहिलं तर भयानक दृश्य दिसत होतं. घोटे अतोनात टर्रर्र सुजलेले होते. विजारीचं कापड फाटेल असे ताणलं गेलं होतं. मी सुरीनं विजार खालून फाडली आणि पाहिलं तर पार गुडघ्यापर्यंत पाणाळलेली सूज पसरली होती. सूज मी बोटानी दाबून पाहिली आणि त्या बोटाच्या दबलेल्या खुणा नंतर बरेच क्षण तशाच दिसत होत्या.

ख्रिस्तिना जवळजवळ रात्रभर तरी बेशुद्धावस्थेत होती. काही तरी फालतू कारणं सांगून आम्ही एकमेकाच समाधान करत होतो. 'उष्माघाताचा बारीकसा झटका असणार !' मी म्हणालो; पण बोलताना माझ्या पोटात शिसाचा गोळा उठला होता. मी मनोमन भ्यालो होतो.

ती शुद्धीवर आली आणि बरीच ताजीतवानी दिसली. 'मला कळतंय् की तुम्हाला मी एक लोढण झालीय्.' ती बोलू लागली, 'काय होतंय् ते माझं मलाच कळत नाहीये. पाय तर भलतेच लठ्ठ झालेयत !'

'ख्रिस्तिना, सुजेमुळं खूप दुखत का ?'

'छे. छे. अजिबात दुखत नाही. मी इतकी अचाट चाललेय ना म्हणून सूज आली असणार, दुसरं काय ?'

त्या पाचव्या दिवशी अंधार पडेपर्यंत आम्ही चालत राहिलो. अधूनमधून पडझड चालूच होती, पण तिनं माझ्या आणि कोलोच्या सोबतीनं प्रवास चालू ठेवला होता. सूर्यास्तानंतर आम्ही मुक्कामासाठी थांबलो. आमच्यात बसून ती अधूनमधून आपल्या पायांकडे पहात होती. ती काहीच बोलत नव्हती आणि आम्हीही काही कळलं नाही अस भासवत होतो.

सहाव्या दिवशी सकाळचे दोन तास हवेत सुखद गारवा होता आणि वाळवंटात चालणं जितकं सुखाचं वाटेल तेवढं वाटत होतं; पण थोड्याच वेळात निरभ्र आकाशात सूर्यानं आपला झोतप्रभाव दाखवायला सुरुवात केली.

ख्रिस्तिनाच्या कोपराला स्पर्श करून विचारलं, 'या भगभगाटात तू चालू शकशील का ?'

'मला वाटतं जमेल मला.'

पण पाचच मिनिटांनी ती पुन्हा मोडकळून तोंडावर कोसळली. पुन्हा एकदा तिच्यावर सावली धरून डोळे उघडण्याची वाट पाहू लागलो अगदी लहान मुलासारखा श्वास चालू असल्यासारखं वाटत होतं.

मी तिच्यापासून जरा दूर झालो. बाकीचे माझ्याभोवती जमले. मी म्हणालो, 'ती सर्वांगानं सुजली आहे. हे काय चाललय हे कुणी जाणू शकतं का ?'

या असल्या लक्षणाचा अर्थ कुणालाच ठाऊक नव्हता. आम्ही पुन्हा तिच्याजवळ गेलो आणि वाट पहात थांबलो. माझ्या टोपीनं तिला वारा घालू लागलो.

तिनं पुन्हा एकदा डोळे उघडले. म्हणाली, 'माझा तुम्हाला

**'नरकातसुद्धा इथल्यापेक्षा कमी गरम असेल'**

खूप त्रास होतो आहे ना?' आम्ही नकारार्थी माना हलवल्या. ती क्षीण आवाजात पुढे म्हणाली, 'मला वाटतं तुम्ही मला इथेच सोडून जावं!'

आम्ही सर्वांनी एकाच वेळी निषेध नोंदवला. कोलो तिच्याजवळ ओणवा झाला. 'असं काही तरी बोलू नकोस, वेडयासारखं करू नकोस पोरी, आम्ही तुला सोडून कुठेही जाणार नाही!' ती तशीच आणखी अर्धा तास पडून राहिली. उठायचा तिनं केविलवाणा प्रयत्न केला; पण तो जमलाच नाही. पुन्हा कोसळली!

मी कोलोला म्हणालो, 'आपण आधार देऊ या!' आम्ही तिला उचलून उभी केली. 'तुम्ही धरून चाललात तर मी चालू शकेन!' ती म्हणाली.

आश्चर्य म्हणजे तिला चालता येऊ लागलं, मी आणि कोलोनं तिचे बखोटे धरले होते. दोनएक फर्लांगांनंतर ती पुन्हा पडते की काय असं वाटलं. तिला पुन्हा नीट आधार दिला. चाल पुढे सुरू झाली. तिची मनाची उभारी फार मोठी होती. कसलाही हुंकार नव्हता, कण्हणं नव्हतं. शक्यतो ताठ चालायचा ती प्रयत्न करत होती. यानंतर ती जेव्हा कोलमडली तेव्हा आम्हीही तिला सांभाळू शकलो नाही. तिच्या मानसिक आणि शारीरिक ताकदीचा शेवटचा कण संपला होता. आता कसलीही हालचाल करायला ती संपूर्ण असमर्थ होती. सूर्य माथ्यावर आला तरी आम्ही तिच्याभोवती घोळका करून उभेच होतो. शेवटी मी आणि कोलोनं एकमेकांकडे पाहिलं. दोघांनी तिला झोळीसारखं अर्धवट उचललं आणि पुन्हा चालायला सुरुवात केली. त्या अवस्थेत मैलभर जाऊ शकलो. मग माझीही ताकद संपली. तिला खाली ठेवलं आणि श्वासासाठी मी झगडू लागलो.

आम्ही तिथेच निवारा केला आणि त्या दिवसाचे सगळयात भडक उन्हाचे तीन तास आम्ही तिथंच काढले. ती निपचित, कसलीही हालचाल न होता तिथं पडून होती. तिची ओंगळवाणी सूज आणखी पसरली होती. सूज पाण्यानं पूर्ण बदबदली होती.

सूर्य जरासा कलला आणि कोलोनं तिला झोक्यात वर उचलली आणि चालायला सुरुवात केली. मी त्याच्याबरोबर आणि बाकीचे आसपासच होते. पाव मैलानंतर त्यानं तिला खाली ठेवली, मग पुन्हा उचलली. एखाद्या लहान मुलाला उचलावं तसं कोलोनं तिला उचललं होतं. तिचं डोकं कोलोच्या रुंद खांद्यावर विसावलं होतं. अत्यंत काळजीपूर्वक तिला तो वाहून नेत होता. त्या धिप्पाड नरपुंगवानं त्या कोकराला ज्या पद्धतीनं कुशीत घेतलं होतं ते दृश्य मी आयुष्यात कधीही विसरणार नाही! निदान चार तास तरी ही भयानक वाटचाल सुरू होती. ती त्याच्या गालाला स्पर्श करून हळूच म्हणाली, 'कोलो, मला आता जमिनीवर ठेव ना, प्लीज मला आता नुसतं पडून राहू दे!'

मी आधार दिला आणि दोघांनी तिला हळुवारपणे जमिनीवर ठेवली. आम्ही भोवती गोळा झालो. तिच्या विलग झालेल्या ओठामधून एक स्मितरेषा हळूच डोकावली. आमच्या सगळयांकडे तिनं आळीपाळीनं आपले स्वच्छ निळे डोळे फिरवले. अतिशय शांत दिसत होती. तिनं हळूच आपले डोळे मिटले.

पालुको म्हणाला, 'पोरगी फार फार थकून गेलीय. गरीब बिचारी!'

अत्यंत हताशपणे, आता पुढं काय करायचं हे न कळल्यामुळं नुसतेच घोळका करून उभे होतो. कोलोचे खांदे अतिश्रमामुळं लोंबल्यासारखे दिसत होते. एकमेकांकडे नजरा टाकत होतो; पण कुणीच काही बोलायच्या परिस्थितीत नव्हतं. मी खाली ख्रिस्तिनाच्या उघडया डोळयाकडे पाहिलं आणि क्षणात वाकून तिच्या छातीला कान लावला. कसलाही ठोका ऐकू येत नव्हता. माझा विश्वासच बसेना. मी दुसरा कान लावला तरीही काही नाही! मी मान वर करून तिचं क्षीण मनगट हातात घेतलं. नाडीचा पत्ता नव्हता. सगळे माझ्याकडे अपेक्षेनं पहात होते. मी तिचा हात सोडला मात्र, धप्पदिशी तो जमिनीवर पडला!

अमेरिकन स्मिथनं काही बोलायचा प्रयत्न केला. मला उत्तर द्यायच होतं; पण शब्दच फुटेना. ओघळले फक्त अश्रू! खारट थेंब माझ्या डोळयांतून वाहू लागले. सगळे बांध फुटून मी प्रचंड हुंदके देऊ लागलो. इतरांनीही आपल्या भावनांना थोपवणं अशक्य होतं. त्या दैवदुर्लक्षित भूमीवर आम्ही सात पुरुष धाय मोकलून मनसोक्त रडलो. आम्हाला सगळया जगात जीव की प्राण असलेला एक कोवळा जीव आमच्यापासून हिरावून घेतला गेला होता. ख्रिस्तिनाची ज्योत कायमची विझली!

अमेरिकन स्मिथनं प्रथम आवर घातला. 'मित्रांनो, आपण आता कुणालाही दोष देत बसण्यात अर्थ नाही. ती आपल्याबरोबर अत्यंत सुखात होती. आपण आता तिचं दफन इतमामानं पार पाडू या!'

जवळच एका घळीच्या तळाशी एक खड्डा खणला. खणताना वाळूतले गोटे बाजूला काढून ठेवले. तिला अलगद उचलून आत निजवली. तिच्या छातीवर तिचा छोटासा क्रूस होता. आमच्या टोप्या हातात घेऊन खड्डयासमोर उभे राहिलो. शेवटची प्रार्थना म्हणायला कुणी पाद्री आमच्यात नव्हता. प्रत्येकानं आपापल्या भाषेत आपल्या पद्धतीनं अत्यंत मनोभावे करुणा भाकली. तिच्या आत्म्याला शांती लाभो अशी प्रार्थना केली. स्मिथ प्रथमच इंग्लिशमध्ये बोलत होता. थरथरल्या हातांनी आम्ही तिच्या पार्थिव देहावर वाळू लोटली आणि सगळा खड्डा झाकून टाकला. तिच्या समाधीची जागा कळण्यासाठी बाजूला ठेवलेले गोटे नीट सभोवार रचले.

कोलोनं तिचीच काठी उचलून टोकाचा एक तुकडा तोडला. जवळच्या एका चामडयाच्या वादीनं तो मोठया तुकडयाला बांधून क्रूस तयार केला आणि तिच्या थडग्यावर रोवून ठेवला. आम्ही तिचा साश्रु नयनांनी शेवटचा निरोप घेतला आणि आमच्या मोकळया वाटेनं चालायला सुरुवात केली.

विचित्र गोष्ट अशी होती की, त्या पोरीशिवाय दुसरा कसलाही विचारच डोक्यात रहात नव्हता. चालणंही अत्यंत क्लेशदायक. सवय झाली होती, त्या प्रक्रियेसाठी कसलाही विचार करण्याची गरज नव्हती. तासनतास भणाणणाऱ्या उन्हामुळं मेंदू सडायची वेळ आली होती. डोक्यात घण बसायचे, विचारांची शृंखला अचानक तुटायची. तरीही माझ्या लक्षात असं आलं की, ती अजूनही माझ्या मागोमाग येते आहे, या समजुतीनं मैलच्या मैल, पावलं न उचलता चालत होतो; पण केव्हा तरी अशी वेळ यायचीच की तिला पहाण्याकरता म्हणून मान मागं वळायची आणि तिचं नसलेपण सुरीसारखं घुसायचं, मन विव्हळायचं. त्या दिवशीची रात्र अत्यंत त्रासदायक,

तहानलेल्या अत्यंत विकल अवस्थेत काढली. ती अजूनही आपल्या-बरोबर आहेच असंच मन सांगायचा प्रयत्न करत होतं आणि तिच्या मृत्यूची प्रत्येक ताजी जाणीव पुन्हा वेदनांचा कल्लोळ उडवून जायची!

ख्रिस्तिनाच्या आठवणीची धार कमी होण्यासाठी आणखी एक शोकान्त व्हावा लागला.

ओएसिसमधून निघाल्याच्या आठव्या दिवशी मॅको वाळूत तोंडघशी पडला. पडताना काठीचा आधार घेण्याचंही भान त्याला उरलं नव्हतं. लाकडाचा ओंडका पडावा तसा पालथा पडला. दोन्ही हात बाजूलाच राहिले. आम्ही त्याच्याकडे पाहिलं आणि त्याच ओळखीच्या ओंगळ खुणा दृष्टीला पडल्या. मोजडीचा वरचा पोटरीचा भाग गुबगुबीत दिसत होता. त्याला उताणा केला आणि थैलीनं वारा घालायला सुरुवात केली. लवकरच तो शुद्धीवर आला. उठून उभा राहिला. मान दोन्ही बाजूला झटकली. आपली काठी उचलली आणि चालायला लागला. चाल धड नव्हती. पुन: पुन: कोसळत होता; पण दिशा पुढं जाण्याची होती. पायावरची सूज क्षणोक्षणी वर चढत होती.

पहिल्या आघातानंतर मॅकोनं ख्रिस्तिनापेक्षा जास्त वेळ तग धरली. नवव्या दिवशी दोन तासांच्या अवधीत निदान अर्धा डझन वेळा तरी तो कोसळला !

त्या रात्री त्याला फार शांत झोप लागली असावी असं वाटत होतं. दहाव्या दिवशी सकाळी नुसता जिवंत होता असं नाही तर त्याची ताकद परत आल्यासारखं वाटू लागलं; पण ज्योत विझताना अधिक तेजानं झळाळते तसला प्रकार होता ! आमच्याबरोबरच तोही निघाला, पाय ओढतच; पण इतर कशाचाही आधार न घेता. सुमारे अर्ध्या तासानं पहिल्यांदा ढासळला. त्यानंतर त्या प्रकाराची पुनरावृत्ती होऊ लागली. न रहावून मी आणि कोलोनं त्याला आधार दिला. दुपारच्या विश्रांतीच्या वेळेपर्यंत त्याचा नुसताच लळालोंबा झाला होता ! आमच्या खांद्यांवरून एखाद्या झोळीसारखा फरफटत होता. स्मिथ आणि पालुकोनं आमचा भार हलका करून त्याला खाली विसावलं. जाकिटांची सावली केली आणि त्याच्याभोवती बसून राहिलो. तो निश्चेष्ट पडून होता. फक्त त्याचे डोळे तो जिवंत असल्याचं सांगत होते.

थोड्या वेळानं त्यानं डोळे मिटले. मला वाटलं तो संपला; पण नाही, श्वास चालू होता. त्यानं पुन्हा डोळे उघडले आणि लगेच पुन्हा न उघडण्यासाठी मिटले गेले. संपलं ! कसलाही आचका नाही, झटका नाही. आत्मा मुक्त होताना शरीरानं कसलीही हालचाल केली नाही. ख्रिस्तिनाप्रमाणंच मॅकोजवळ शेवटचे म्हणून उच्चारायला शब्दच नव्हते !

चित्रगुप्ताच्या नोंदवहीतलं एक खातं बंद झालं. त्याचं पूर्ण नाव सिगमण्ड मॅकोवस्की, वय ३७, पोलंडच्या लष्करातला माजी कॅप्टन. पोलंडमध्ये कुठं तरी त्याची पत्नी आहे. तिच्या नवऱ्याच्या मनोधैर्याबद्दल, शौर्याबद्दल तिला कळवायची माझी इच्छा आहे. आम्ही त्याचं मानानं दफन केलं. कोलोनं पूर्वीसारखीच काठी तोडून क्रूस तयार करून, थडग्यावर रोवला. मागल्याप्रमाणेच प्रार्थना म्हटल्या आणि त्याच्या कलेवराचा आम्ही निरोप घेतला !

मी दिवसांचा हिशेब ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होतो. अन्नपाण्यावाचून माणूस किती काळ जिवंत राहू शकतो याचा उल्लेख कुठे वाचला होता की काय हे आठवायचा प्रयत्न करत होतो. उष्माघाताचा झटका कोणाला केव्हा येईल ते सांगता येत नव्हतं. केव्हा तरी निराशेचे काळोखे ढग मनावर अकस्मात दाटून यायचे आणि तीव्रतेनं जाणवायचं की आपण उरलेले सहाजणसुद्धा सर्वनाशाकडे अटळपणे चाललो आहोत ! प्रत्येक निराशाजनक पहाटे हाच विचार उफाळायचा. वाटायचं, यानंतर कोणाची पाळी ? सहा मानवी सांगाडे वाळू पिसत, पाय ओढत वाटचाल करत होते. कुठल्या दिशेनं ? कुणास ठाऊक ! वाळू अधिकच भुसभुशीत होऊ लागली. आम्हाला पाय ओढूच द्यायचे नाहीत असं जणू त्या वाळूनं निर्धारानं ठरवलं होतं. कोणीही पडलं, की काही झालंच नाही असा देखावा करून उठून चालायला लागायचा. आता आम्ही उघडपणे पायांवर त्या ओंगळवाण्या सुजेच्या खुणा दिसतात की काय ते तपासू लागलो. मृत्युघंटेच्या खुणा निरखू लागलो.

मृत्यूच्या छायेत वावरताना कधी नव्हे ते मनानं एकमेकांच्या अत्यंत जवळ आलो. आपण निराश झालोत हे दाखवायला कुणीही तयार नव्हतं. भीतीचा उच्चारही कुणी करत नव्हतं. एकच विचार मोठ्यानं बोलला जात होता, तो म्हणजे जवळपास कुठं तरी पाणी असलंच पाहिजे ! त्या एकाच आशेवर आम्ही जिवंत होतो. प्रत्येक घळीमध्ये सुंदर पाण्याचा ओहोळ वाहातोय अशी आम्ही कल्पना करायचो आणि ते मृगजळ ठरलं तरी त्यानंतर पुन्हा तशा अनेक पाण्यानं भरलेल्या घळी होत्या. आम्ही जिवंत होतो ते त्या कल्पनारम्य पाण्यामुळं !

सबंध वाळवंटात जर इतर कुठली जीवसृष्टी आढळली असेल तर ते म्हणजे साप ! वाळूतल्या बिळात सर्वांग लपवून नुसती तोंडं बाहेर ठेवून बघत असायचे. ते जिवंत कसे रहात असतील हे एक आश्चर्यच होतं. त्यांना आमची जराही भीती वाटत नव्हती आणि आम्हालाही त्यांना त्रास देण्याची इच्छा होत नव्हती !

⌑

## गोबीच्या वाळवंटाचा शेवट

मॅकोच्या निधनानंतर दोन दिवसांत सगळ्यांची सहनशक्ती संपुष्टात आली होती. जर काही दैवी क्रिया घडली तरच निभाव होता, एरवी सारं संपतच आलं होतं आणि खरोखरच ती किमया घडली. अकस्मात वाळून गेलेल्या तळ्याचा शोध लागला. थोडंसं खणल्यावर चिखलयुक्त पाणी सापडलं. जीव, तात्पुरता का होईना वाचवण्यासाठी ते पुरेसं होतं. तहान भागली; पण भुकेचं काय ?

स्मिथ म्हणाला, ' साप खाणं एवढाच उपाय दिसतोय मला. बरं, माणसानं साप खाणं ही काही फार अभूतपूर्व गोष्ट नाही. त्याचं वीष हे तोंडाजवळच्या एका पिशवीत असतं. तेवढं जर वेगळं केलं तर साप खायला काहीच हरकत नाही ! '

सहाजिकच ही गोष्ट अंमलात यायला फार वेळ लागला नाही.

लगोलग दोन साप प्रयत्नपूर्वक पकडले आणि त्यांचा फन्ना उडाला! वाळवंटाच्या पुढल्या प्रवासात आमचे जीव वाचवले ते या सापांनी!

किती दिवस सरले कुणास ठाऊक; पण एका सकाळी आमच्या आशा पल्लवित करणारा शोध लागला. दक्षिणेकडचा प्रदेश उंचावत गेला होता आणि सुमारे ५० मैलांवर असलेल्या पर्वताचा तळ टेकड्यांमधे विलीन झाला होता. ते दृश्य पहाताच आमच्या नसा आनंदानं फुगून तट्ट झाल्या.

आमचं मध्य आशियाच्या भूगोलाचं ज्ञान अगाध होतं. उच्च पर्वत दिसताच तो हिमालय असावा. दिशेत थोडी चूक झाल्यामुळं तो थोडासा पूर्वेकडे राहिला असावा आणि तो हिमालय म्हणजेच आपण भारताच्या अगदी उंबरठ्यावर आहोत, असंच आम्हाला वाटायला लागलं होतं; पण आमचा मूर्खपणा जरा उशीरा लक्षात आला. हिमालय आणि आम्ही यात तिबेटचा अत्यंत किचकट डोंगराळ प्रदेश अस्ताव्यस्त पसरला होता.

त्या डोंगरापर्यंत पोचायला तरी आम्हाला दोन दिवस रखडावं लागलं. भुसभुशीत वाळू संपून घट्ट जमीन पायाला लागली, तेव्हा वाळवंट संपल्याची सुखद जाणीव झाली. त्या बारक्या खडकाळ डोंगरावर चढायला सुरुवात करण्याआधी चांगली दोन तास विश्रांती घेतली. पायातल्या मोजड्या काढून, वाळू काढून टाकली आणि चढणीवर पाऊल ठेवलं. गोबीचं भीषण वैराण वाळवंट अखेर आम्ही पार केलं होतं.

चढ सुरू झाला. चढणीच्या पलीकडे कुठे तरी पाणी असेल अशी वेडी आशा मनाला होती पण निराशेशिवाय काहीच पदरात पडलं नाही. पलीकडे उतरलो तर नुसतीच अस्ताव्यस्त पसरलेल्या खडकाची दरी होती. तिथेच रात्र काढली. सकाळी पुन्हा दुसरी चढण सुरू. माथ्यावर पोचायला बरेच तास लागले. पलीकडे पुन्हा एक दरी. पूर्वेकडे दिसणारी पर्वतांची रांग जास्तच उंच भासू लागली. दरीत वाळू पसरलेली दिसत होती. साप मिळण्याची आशा होती, म्हणून अंधार पडण्याआधी दरीत उतरायची इच्छा होती.

आमचं नशीब बलवत्तर म्हणून त्या झऱ्याची आणि आमची चुकामूक झाली नाही. आम्ही सगळे उतरणीवरच होतो. आमच्या लक्षात आलंच नव्हतं. पण झारोन, काय वाटलं कुणास ठाऊक, मात्र वळून पाहिलं आणि आनंदातिशयानं आरोळी ठोकली, 'पाणी!' आम्ही सगळ्यानीच मागं वळून पाहिलं. खरंच, एक गोलदार खडकाच्या बाजूनं करंगळीएवढी धार चांदीसारखी लखलखत, पडत होती. आम्ही सगळे धडपडत अधाशीपणे त्या जागेजवळ पोचलो. हाताची बोटं शिरतील एवढ्याच एका फटीतून ते निर्मळ, स्वच्छ थंडगार पाण्याचे थेंब ओघळत होते. ते जिथं पडत होतं तिथून त्याला एक बारीकसा मार्ग करून दिला आणि आमच्या टिनपाट डबड्यात साठवायला सुरुवात केली. ते अमृततुल्य पाणी आम्ही अधाशासारखं प्यालो. त्या डबड्यानं आम्हाला फार फार मदत केली होती. त्या वेळी दुपार होत होती आणि एकमतानं असं ठरलं की, आणखी एक दिवस या पाण्याच्या अवतीभवतीच काढायचा.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो डोंगर-उतार, गरमागरम दरी पार करून पुढच्या डोंगरचढणीवर येऊन ठेपलो होतो. साधारण पधराएक मैलाची रपेट झाली असेल माथ्यावरून पुन्हा दिशेचा अंदाज घेतला. अगदी समोर गेलो असतो तर प्रचंड उंची गाठावी लागली असती तेव्हा थोडी दिशा बदलून आग्नेयेला १० अंश कोन साधून जरा कमी उंचीचा प्रदेश पायाखाली घेतला. संध्याकाळच्या सुमारास हृदय आनंदानं उचंबळून आलं. ओएसिस सोडल्यावर इतक्या दिवसांनंतर प्रथमच वनस्पतींचं दर्शन झालं होतं. खडकांमध्ये खोचून बसविल्यासारखे टोकेरी गवताचे पुंजके दिसू लागले.

पण दमछाक करणारी रपेट दिवसामागून दिवस चालूच होती. अन्नासाठी अजूनही सापावरच अवलंबून रहावं लागत होतं. पहिला साप खाल्ल्यापासून जवळपास तीन आठवडे तेच आमचं अन्न झालं होतं. तहानेची गरज मात्र मधून मधून भागत होती. मधूनच लागणारे झुळझुळणारे झरे आमची तहान भागवत होते. पाण्याशिवाय दिवस गेला असं होत नव्हतं.

त्यानंतर एका प्रसन्न सकाळी एक डोंगरमाथा गाठला आणि पलीकडे दरीत नजर टाकली आणि हृदय भरून आलं. हिरवगार गवत दरीत जिकडे तिकडे पसरलं होतं. त्याहीपेक्षा चित्तथरारक गोष्ट तिथं होती. शंभरएक मेंढरं—बारीक ठिपक्यासारखी इतस्ततः चरत हिंडत होती. आम्ही झपाट्यानं उताराला लागलो व तो कळप पाच मैल दूर असेल नसेल तोच दोन कोली जातीचे लांबलचक, केसाळ धनगरी कुत्रे दिसले. आम्हाला पहाताच कळपाला वळसा घालून लांब ढेंगा टाकत कळप आणि आम्ही यांच्यामधे उभे राहून ते गुरगुरू लागले.

झारोनं आपल्याच भाषेत त्यांना समजावलं, 'काही घाबरू नका मेंढराना आम्ही काही करत नाही' तुमचा मालक कुठाय?'

कोलो तेवढ्यात गुरगुरला 'आयला, त्या मेंढराच्या जरा जवळ जायला मिळाल तर, तर या कुऱ्हाडीच्या एकाच फटक्या...

'कोलो, अरे एवढा उतावीळ होऊ नकोस, मालकानेच बहुधा आपल्याला अटकाव करण्यासाठी त्या कुत्र्याना पाठवलं असावं' असं मी म्हणालो. 'आपण या कळपापासून दूर जाऊ या. कदाचित त्यामुळे ते कुत्रे आपल्याला मालकाची दिशा दाखवतीलही.'

आम्ही दिशा बदलून कळपापासून दूर जाऊ लागलो. त्या श्वानांनी आमच्याकडे नीट पाहिलं. त्यांचं बहुधा समाधान झालं असावं. त्यांनी तोंडं फिरवली आणि दरीच्या समोरच्या उताराकडे भरधाव सुटले. त्यांच्या धावण्याच्या दिशेकडे माझी नजर गेली आणि आश्चर्याचा धक्काच बसला. तिकडे बोट दाखवून मी ओरडलो. तिकडे धुराचं वलय हळूच वर उठताना दिसत होतं.

माविनको उत्साहानं एकदम म्हणाला, 'दुपारच्या वेळी धूर याचा अर्थ तिथं काही तरी शिजतय.'

खडकाच्या आडोशाला ती आगोटी पेटलेली होती. त्या खडकाला लागूनच एकावर एक दगड रचून एका माणसाला पुरेल एवढा निवारा केलेला होता. तिथं एक म्हातारा बसला होता. त्याच्या बाजूलाच ते मघाचे कुत्रे ल्हा ल्हा करीत बसले होते. तो कुत्र्याना उद्देशून काही तरी कुजबुजला. त्याचा अर्थ समजून ते कुत्रे पुन्हा त्या कळपाकडे सुसाट गेले. त्या आगोटीवर ठेवलेल्या बीडाच्या किटलीतून वाफ येत होती.

स्मिथ ओणवा होऊनच पुढे गेला आणि त्यानं अभिवादन केलं. तो म्हातारा हसतच उठला. खाली वाकून त्याला आणि नंतर आम्हाला

आळीपाळीनं अभिवादन करता झाला.

म्हाताऱ्याची गालफड बरीच उंचावलेली होती. पांढऱ्या दाढीच्या आजूबाजूला दिसणारी त्याची कातडी उन्हानं करपून काळपट लाल झाली होती. डोक्यावर शेळीच्या कातड्याची टोपी. तिच्या कनाती पूर्वी भेटलेल्या मोगलांसारख्याच होत्या. तशाच वर वळवलेल्या होत्या. पायात घट्ट लोकरीचे छान शिवलेले बूट. त्याला जाडजूड चामड्याचे तळवेही होते. गुडघ्यापर्यंत लोंबत असलेला त्याचा उघडा, मेंढरांच्या कातड्यांचा कोट, एका वळलेल्या लोकरीच्या दोरीनं एकत्र ठेवला होता. पाच फुटी दांडक्याचा आधार घेऊन तो उभा होता. त्याच्या मैत्रीपूर्ण वागणुकीबद्दल शंकाच नव्हती. अचानक आलेल्या पाहुण्यांमुळं त्याला झालेला आनंद त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता.

तो खूप उत्साहानं बोलत होता. पण एक–दोन मिनिटातच त्याच्या लक्षात आलं की त्याचा एकही शब्द आम्हाला ढिम्मसुद्धा कळत नव्हता. मी रशियन बोलायचा प्रयत्न केला त्यावर त्याचा चेहरा आमच्याइतकाच निर्विकार राहिला संभाषण होऊ शकत नाहीये, आपल्याला बाहेरच्या जगातली काही बातमी मिळत नाहीये. याचं दुःख त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतं. मला वाटतं तो असं सांगायचा प्रयत्न करत होता की त्यानं आम्हाला खूप लांबून पाहिलं होतं आणि आमच्यासाठी त्यानं काही तरी अन्न शिजत ठेवलं होतं. त्यानं आम्हाला शेकोटीभोवती बसायला विनवलं आणि आमच्या येण्यामुळं थाबलेलं त्याचं भांड्यातलं ढवळणं पुन्हा सुरु झालं. मी आडोशात सहज डोकावून पाहिलं. आत फक्त एकाच माणसाला झोपता येईल एवढीच जागा होती आणि एकच छोटीशी चटई अंथरली होती.

आपल्या मोठ्या लाकडी चमच्यानं ते कढण ढवळता ढवळता त्यानं पुन्हा संभाषण चालू करायचा प्रयत्न केला; पण उं-हूं. काहीच जमेना. स्मिथनं घसा साफ करून हाताच्या खुणांचा उपयोग करत आम्ही सगळे ल्हासाला जाणार आहोत असं सांगितलं.

त्यातला 'ल्हासाला' हा शब्द बरोबर पोचला होता. स्मिथनं ल्हासाचा पुनरुच्चार केला त्याबरोबर त्या धनगरानं आपल्या अंगरख्याच्या आत हात घालून एक प्रार्थनाचक्र बाहेर काढलं. ते त्यानं बरीच वर्षं जपून ठेवलेलं असावं. त्यावर काही धार्मिक खुणा कोरलेल्या होत्या. या चक्रानं सूर्याकडे निर्देश करून, गोलगोल हात फिरवला, बरेच वळसे दिले.

मी म्हणालो, 'आपल्याला ल्हासाला पोचायला किती दिवस लागतील ते सांगायचा तो प्रयत्न करतोय.'

त्याचा हात तर पवनचक्रासारखा भिरभिरत होता. च्यामारी, भलतंच लांब दिसतंय ल्हासा इथून.

त्यानं पुरवलेल्या माहितीबद्दल आम्ही त्याचे आभार मानले. त्यानं आपल्या खिशातून एक मिठाची थैली काढली आणि त्या कढणात घालता घालता आम्हाला त्या कढणात डोकावून बघायला सांगू लागला. आम्ही घोळका करून पाहू लागलो. आत करड्या रंगाचं घट्टसर कढणं उकळत होतं. त्यानं पुन्हा ढवळलं. त्यातलं एक चमचाभर बाहेर काढलं फुंकर घातली, चाटून चव पाहिली आणि खूष होऊन जीभ ओठावरून फिरवली.

त्यानं आमच्याकडे पहात डोळे मिचकावले आणि मजेशीर मिटक्या मारल्या. त्याचा गमत्या स्वभाव पाहून आम्हीही हास्यविनोद करून खेळकर वातावरणात भर घातली. फार दिवसांनी असा मोकळेपणा लाभला होता.

त्याचे विदुषकी हावभाव चालूच होते. काही तरी धार्मिक विधी केल्याच्या आविर्भावात त्याने खोपटातून कापडात गुंडाळलेली कसली तरी वस्तू आणली आणि एखादा गारुडी जसं वातावरण निर्माण करतो, तसं गूढ वातावरण करत तो मधेच डोळे मिचकावत त्यात काय असेल ते ओळखायला आम्हाला उद्युक्त करत होता. शेवटी त्यानं त्यातून एक सुरेख कोरीव लाकडी वाडगा काढला. पाच इंच व्यास आणि ३ इंच खोलीचं भांडं होतं ते. फारच सुंदर कारागिरी होती.

त्या वाडग्यात त्यानं ते कढण डावलीनं काढलं तो वाडगा खाली कातड्यावर ठेवला आणि आतमध्ये जाऊन मातीचा खुजा घेऊन आला त्यामध्ये मेंढीचं दूध होतं. त्यातलं थोडसं त्या वाडग्यात घालून, शेजारीच बसलेल्या झारोकडे त्यानं तो वाडगा दिला.

झारोनं त्यातलं चमचाभर चाखलं आणि आपल्या खास पद्धतीनं जीभ आणि ओठांची मजेशीर लपलप केली आणि वाडगा पुढच्याला देऊ लागला. म्हाताऱ्यानं खुणेनं सुचवलं. ते सगळं एकट्यासाठी आहे. झारोनं अत्यंत चवीनं, पण झटक्यात ते संपवलं आणि तृप्त होत म्हणाला, 'आयला, भलतंच झकास आहे!'

त्यात बहुधा बार्ली आणि कसली तरी चरबी होती. त्यात गोड ताजं दूध मिसळल्यावर माझा वाटा मी मोठ्या आनंदानं मिटक्या मारीत संपवला. खरंच ते प्रकरण झकास होतं.

सगळ्यांना पुन्हा एकवार वाटप करून मग त्या धनगरानं आपला वाटा संपवला. नंतर ते किटलीवजा भांडं. आगोटीवरून थंड होण्यासाठी खाली उतरवलं. त्याला कडी नसल्यामुळे ते उतरवताना त्याला जरा त्रासच झाला. त्या भांड्याला पूर्वी केव्हा तरी कडी असावी. कारण त्यासाठी केलेली दोन भोकं दिसत होती. त्यानंतर त्यानं जी वस्तू आम्हाला नजर केली, त्यामुळं तर आमच्या आनंदाला पारावार उरला नाही. तंबाकू होता तो प्रत्येकाला २–३ सिगरेटी तयार करता येतील एवढा त्यानं वाटला. कागदाचे जे काही कपटे शिल्लक होते त्याच्या विड्या करून धूम्रपानाचा आनंद मनमुराद लुटला.

आमच्या यजमानानं केलेल्या आमच्या स्वागतानं आम्ही अगदी गहिवरून गेलो होतो. तोही आमच्याकडे कृतकृत्य नजरेनं पहात होता. तिथली थोडी साफसफाई करण्यासाठी आम्ही त्याला मदत करू लागलो, तर कशाला हात लावू देईना. त्यानं पुन्हा आगोटी पेटवून आमच्यासाठी चहा तयार केला. खास तिबेटी रसायन होतं. या वेळी मात्र आम्हाला त्यात तरंगणाऱ्या चरबीच्या गुठळ्यांची मागच्यासारखी किळस आली नाही.

त्यानं आमच्यावर केलेल्या उपकाराची थोडीशी परतफेड करावी

## आम्ही सगळे ल्हासाला जाणार आहोत असं सांगितलं...

म्हणून कोलोला म्हटलं की, आपण त्याला किटलीसाठी एक कडी करून देऊ या. सर्वांनाच ती कल्पना पसंत पडली. लगेच कामाला लागले· आमच्याजवळचं तारेचं एक कडं तोडून, वळवून त्याची कडी केली आणि त्याच्या किटलीला अडकवून दिली. ते पाहून तो कमा-·लीचा खूष झाला.

त्याला आणखी कशा प्रकारे मदत करता येईल याचा विचार करू लागलो. कुणी तरी सुचवलं की, जळणासाठी लाकूड फाटा आणून देऊ या ! झालं. लगेच त्या कामगिरीवर निघालो. तासभर खपून जळणासाठी लाकडं गोळा केलीच; पण त्याचबरोबर कोलोनं एक छोटं झाडच्या झाडच त्याच्यासाठी आणून टाकलं.

धनगर आमच्या परतण्याची वाट पहात होता. तोपर्यंत तो एका सुऱ्याला धार चढवत होता. बाजूलाच ते दोन्ही कुत्रे होते. आम्ही येताच आम्हाला बसायला सांगून कुत्र्यांना घेऊन तो बाहेर पडला.

थोड्याच वेळात तो परतला. येताना त्यानं दोन शिंगांच्या मधल्या लोकरीला पकडून एक मेंढा खेचत आणला. कुत्रे जिभल्या चाटीत अवतीभवती उड्या मारीत होतेच. पाचच मिनिटांत त्या मेंढयाचा खातमा झाला ! अतिशय कुशलतेनं ते काम उरकलं होतं. कातडं सोलण्यापासून तुकडे करीपर्यंत ज्या सफाईनं त्याचा हात चालत होता ते पाहून आमची आम्हालाच लाज वाटली. अर्धा मेंढा मीठ चोळून खोपटात त्यानं टांगून ठेवला. मुंडकं आणि इतर सटर-फटर तुकडे कुत्र्यांसाठी लांब फेकले !

अर्धा मेंढा त्या शेकोटीवर खरपूस भाजला. आणि त्या रात्री आम्ही पोट फुटेपर्यंत खाल्लं. आम्ही खुणा करून आजची रात्र तिथंच काढायचा मानस दाखवला. त्यानंही आनंदानं संमती दिली. तो एकटाच त्या खोपटात झोपला. बाकी सहा जण त्या शेकोटीच्या उबेत गोलाकार झोपलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्यानं कुठून तरी बार्लीच्या वड्या काढल्या. प्रत्येकी तीन याप्रमाणे त्या आमच्यात वाटल्या. मग चहाच्या कार्यक्रम झाला आणि झालं आदरातिथ्य कमी पडलं म्हणून की काय, त्यानं उरलेला मेंढा भाजला आणि आमच्यात वाटून दिला आणि वर दक्षिणा म्हणून तंबाखूचंही वाटप केलं !

मध्यान्ह टळताच आम्ही निघालो. निघताना त्याचा लाकूडफाटा पुन्हा भरून ठेवायला विसरलो नव्हतो. त्याचे आभार कसे आणि कोणत्या शब्दांत मानावे हे आम्हाला कळेचना. त्याची पाठ थोपटत नुसतंच हसून आम्ही त्याचा निरोप घेतला. मला खात्री आहे त्याला सहा दिलदार मित्र लाभल्याचं आश्वासन मिळालं होतं !

अखेरीस आम्ही खाली वाक - वाकून त्याचा निरोप घेतला, तिकडच्या पद्धतीप्रमाणं वाकताना, त्याच्या चेहऱ्यावर आमची नजर खिळलेली होती. अतिशय गहिवरून त्यानंही प्रतिनिरोप घेतला. आम्ही वळलो आणि तडक निघालो. थोडं अंतर गेल्यावर मी मागे वळून पाहिलं तेव्हा तो आमच्याकडे पाठ करून बसला होता आणि बाजूला बसलेल्या कुत्र्याच्या पाठीवर हात फिरवत होता ! (क्रमशः)


योद्धा शेतकरी

शेतकरी नेते श्री. शरद जोशी यांचे व्यक्तिमत्त्व व विचार सादर करणारे, तसेच त्यांच्या व कै. माधवराव बोरस्ते, श्री. प्रल्हाद पाटील, श्री. माधवराव मोरे इत्यादींच्या नेतृत्वाखाली लढल्या गेलेल्या नासिकच्या ऊस–शेतकरी–आंदोलनाचा चक्षुर्वै सत्यं वृत्तान्त कथन करणारे पुस्तक

लेखक : विजय परुळकर

सचित्र आवृत्ती । पंचरंगी मुखपृष्ठ । किंमत : रुपये छत्तीस

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.

पुस्तके

# एक साधंसुधं ग्रामीण दर्शन-' राब '

ग्रामीण साहित्यातील साचेबंदपणाचे कवच फोडण्याचा प्रयत्न करणारे साहित्य अजूनही फारसे रुजलेले नाही; ग्रामीण कादंबरी तर या प्रयत्नांच्या जवळपासही अद्याप फारशी पोहोचलेली नाही, हा आरोप अनंत मनोहरांची ' राब ' वाचल्यावर अधिकच पक्का होतो.

स्वतःचे वेगळेपण घेऊन ग्रामीण साहित्य महाराष्ट्रात रूजू लागले ते १९२० नंतर. गांधीवाद व समाजवाद या विचारसरणी महाराष्ट्रात बळावू लागल्यानंतर. मूलतः हे वाङ्मय प्रचारकी थाटाचे होते. राजकीय आणि सामाजिक विचारांची सांगड घालून किंवा या विचारांचा गाभा असलेले लेखन प्रारंभीच्या काळात झाले. वरेरकर, माटे ही त्याची उदाहरणे म्हणून सांगता येतील. श्री. ना. पेंडसे, र. वा. दिघे हे त्यानंतरची बदलत जाणारी अभिव्यक्ती घेऊन आलेले लेखक. रा. रं. बोराडेही त्यांच्याच पंथातील; पण बोराडयांची ' पाचोळा ' किंवा आनंद यादवांची ' गोतावळा ' त्यातल्या त्यात नव्या युगाची चाहूल देतात. महादेव मोरे किंवा चंद्रकुमार नलगे आदी अगदी अलिकडच्या काळातले लेखकही फारसे काही आशादायक चित्र निर्माण करताना दिसत नाहीत.

शहरी जीवनाला विटलेला आणि ग्रामीण रानदांडगेपणाचे आकर्षण असलेला वाचक वर्ग आणि त्याला हवे ते देण्याची वृत्ती जोपासणारा वर्ग, म्हणूनच प्रामुख्याने ग्रामीण साहित्यिकाकडे सतत पाहिले गेले. वरील लेखक हे त्याच पंथातले. यापलीकडे ग्रामीण जीवनातील व्यंगे, खोचक-भोचकता, दारिद्र्य आणि गुंडगिरी याचं भांडवल करून त्यात विनोदाची मिरपूड टाकून वाचकाला खेळवणारा एक वर्गही निर्माण झाला. श्री. अनंत मनोहर या वर्गात मोडत नाहीत, हे मात्र आवर्जून सांगितलं पाहिजे. त्यांची ' राब ' ही ग्रामीण जीवनाचा लालित्यपूर्ण आस्वाद घेत जाणारी आणि तेथील माणसाचे माणूसपण शोधणारी वाटचाल वाटते. त्यात कोणाची खुशामत करण्याची वृत्ती नाही, की कोणाला नावे ठेवण्याची प्रवृत्ती नाही. नेमकेपणाने कोणाच्या दारिद्र्यावर बोट ठेवलेलं नाही, की कोणाच्या गुंडगिरीचं स्तोम माजवलेलं नाही. ते एक साधंसुधं समाजदर्शन आहे !

ही कादंबरी वाचनीय आहे, असं म्हणताना प्रथम इथे काय वाचायला मिळेल आणि काय मिळणार नाही, हे पाहिलं पाहिजे. ही कादंबरी आतापर्यंतच्या ग्रामीण वाङ्मयाच्या साच्यातलीच असल्यामुळे त्या अनुषंगानेच त्याचा शोध घ्यावा लागेल. या कादंबरीत तुम्हाला रंग-रंगवलेल्या ' भानगडी ' भेटणार नाहीत; गावाला नासवणारी रंगेल आणि रंगेल ' बाई ' सापडणार नाही; गावावर एक हुकमी-मनमानी सत्ता गाजवणारा सरपंच–पाटील दिसणार नाही; श्रीमंतीच्या बळावर कुळांना लुटणारा सावकार आढळणार नाही; कुणाला बसलेले दारिद्र्याचे भयानक चटके तुमच्या डोळयाला पाणी आणणार नाहीत, कुणाच्या वेडगळ अज्ञानाचे किस्से तुम्हाला हसवायला येणार नाहीत; मात्र तुम्हाला तुमचं चित्त प्रसन्न करणारी सुबोध-सुंदर भाषा इथे मोहून टाकील. कोकणातील निसर्गाचं सौंदर्य तुम्ही कोणत्याही पाल्हाळाशिवाय अनुभवू शकाल. तिथल्या समाजरूपाचं अप्रूप तुम्ही मनात साठवू शकाल; मनुष्य स्वभावाचे एकेक कंगोरे तपासू शकाल. त्यात दिसणारी सामान्यांची दांडगी समज आणि व्यवहारज्ञान तुम्हाला भारावून टाकील. अज्ञान, उदासीनता, श्रद्धा आणि अंधश्रद्धा सामोऱ्या येतील. एका अनुभवविश्वाचं भांडार तुमच्यापुढे खुलं होईल. त्याला बैठक आहे, ऋतुचक्र आणि लहरी हवामानाची; नदी-नाले-जंगल, वनचर-जलचर, चैतन्य आणि सन्नाटा यांची. '

हा एवढा ताळेबंद मांडला तरी कादंबरीची नेमकी कल्पना येण्यास तो पुरेसा होणार नाही. त्यासाठी कादंबरी काय आहे, हे मुळातूनच पहावे लागेल.

अनेक व्यक्तिचित्रं आणि निसर्गचित्र यांची समूह जीवनाच्या पार्श्वभूमीवर घातलेली ती एक सांगड आहे. धोंडबाराव, शिवा, गुणा, बाबाजी, बाळू मोरे, चंदाराव, पुतळा या ' राब ' मधील ठळक व्यक्तिरेखा. यांच्या जोडीला पूरक म्हणून सुमारे पन्नास व्यक्तिरेखा कमी-अधिक स्वरूपात श्री. मनोहरांनी इथे रंगवल्या आहेत.

कोकणचा निसर्गाने नटलेला आणि दारिद्र्य हाडीमाशी मुरलेला प्रदेश. या प्रदेशातलं आनेगाव हे एक मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेलं खेडं आणि त्यातही मुख्यतः तिथली राबवाडी ही या कादंबरीची कर्मभूमी. साऱ्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून या आनेगावचं उभे राहिलेलं रूप आणि त्याच्या गर्भात लपलेले काही समाजविरोध, समाजप्रश्न, म्हणजे ' राब '.

येथे 'राक्षस पार्टी' आणि 'देव पार्टी' असा प्रकार नाही. त्यामुळे धोंडबाराव हा खलपुरुष म्हणून रंगवतानाही कुठे अतिरेक होणार नाही, याची दक्षता अनंत मनोहरांनी घेतली आहे. संपत्तीसाठी आपल्या थोरल्या दिवंगत भावाच्या मुलाला देशोधडीला लावणारा धोडबाराव संपत्तीच्या वेडाने आंधळा झालेला नाही. पोलीस पाटील असला तरी 'जनलोका'च्या विरोधात टोकाची भूमिका घेण्याचं धाडस त्याला नाही. तो एक साधासुधा स्वार्थलोलूप माणूस आहे. श्रद्धा–अंधश्रद्धा–प्रेम–राग–लोभ हे सारे गुणावगुण त्याच्यात आहेत. ' तुम्ही पुतण्याची इस्टेट बळकावलीत म्हणूनच माझी तीन मुलं हकनाक गेली. चौथाही जायच्या पंथावर आहे. तेव्हा आता इस्टेटीचा मोह सोडा, ' असं बायकोने बजावल्यावर तो सुनेला बोलावून पुतण्याची वाटणी तिच्या पदरात घालायला तयार होतो.

अनंत मनोहरांनी स्वभावचित्रण करताना हे जे बारकावे रेखाटले आहेत त्यातून त्यांची काही तरी नवं, वेगळं करण्याची धडपड दाखवते; पण परंपरागत कल्पनांचा पूर्णपणे त्याग करायलाही ते धजावत नाहीत; आणि म्हणूनच नंतर धोंडबारावाकरवी पुतण्याचा

मुलगा शिवा याच्यावर करणी करणे, शिवा गावात स्थिरावला, हे लक्षात आल्यावरही त्याच्या उभ्या शेताला आग घालणे आदी कामं ते करवून घेतात आणि शिवाच्या शेताला आग घालताच त्याच्या पापाचे शंभर घडे भरले, असं जणू बजावून त्याला सर्पदंश घडवून यमसदनीही पाठवितात.

ते ज्या शैलीतून हे कथानक रंगवत गेले आहेत ती काही वेळा इतकी बालबोध होते की, घोडबारावाचा असाच शेवट होणार, हे आपल्याला फार आधीच जाणवतं. माझ्या मते, हे लेखकाचं मुख्य अपयश आहे.

शिवा आणि पुतळा ही जोडी मात्र मनोहरांनी अत्यंत कलात्मकतेनं चितारली आहे. कळत्या-नाकळत्या वयात त्यांचं एकत्र येणं आणि त्यांचं एकमेकांवरील निर्व्याज नाकळतं प्रेम विलोभनीय आहे. त्या दोघांचं लग्न घडवून आणेपर्यंत मनोहरांनी त्यांच्यात शृंगार भावनेची एकदाही देवाण घेवाण केलेली नाही, की प्रेमभावनेचं कुठे प्रकटीकरण झालेलं नाही, पण या दोघांच्या मनात परस्परांबद्दल अपार प्रेम आहे, हे आपल्याला ठायी ठायी जाणवतं. हे वातावरण निर्माण करण्यासाठी मनोहरांनी निरनिराळ्या क्लृप्त्या वापरल्या आहेत. कधी त्या दोघांचे निष्कपट, गोड संवाद, कधी त्यांची भाडणं, कधी त्या दोघांबद्दल इतरानी केलेली सूचक पण निखळ विधानं, तर कधी त्यांच्या भोवतालचं वातावरण यांचा उपयोग त्यानी त्यासाठी करून घेतला आहे. या दोघाच्या लग्नानंतरही जो शृंगार मनोहरानी दाखवला आहे, त्यातही सूचकताच अधिक आहे. उत्तानता कटाक्षाने टाळली आहे. कादंबरीच्या जवळजवळ प्रारंभापासून अखेरपर्यंत या दोघाचे संबंध अशा हळुवार रीतीने उलगडत दाखवलेले आहेत की, वाचक आपोआप त्यात बांधला जावा !

शिवाय व्यक्तिचित्र मात्र अधुरं वाटतं. नागरी आणि ग्रामीण जीवनातला तो दुवा आहे; हा दुवा मनोहरांनी अधिक घट्ट करायला हवा होता; पण 'पैली पाटी पुसल्याबिगर त्यावर नवं ल्हेता येत नाय. तुजं वलन चाकरमान्याचं. ते बदलायचं, तर तुला लई तरास पडल. नाचन्याची भाकर तुला आवडली नाय, तीच खावी लागल. अस्या परकारानं तुला समदं बदलून घ्यावं लागल. (पान ५२) असं त्याला गुणाकडून ते एकदा बजावतात आणि त्याची पाटी पार कोरी करून लिहायला लागतात. त्याला बदलताना पडणारा त्रास कुठे जाणवतच नाही. कोणताही माणूस इतक्या सहजी आपलं पहिलं शहरी जीवन विसरून नव्या खेड्यातील जीवनाशी समरसून जाऊ शकणार नाही. मनोहरांनी अधूनमधून शहरी जीवन आणि ग्रामीण जीवन याची शिवाच्या मनात जी तुलना घडवली आहे ती अशीच अपुरी—अर्धवट आणि केवळ उल्लेखासाठी म्हणून केल्यासारखी वाटते.

गुणाची जिद्द, बाळू मोटेचा कोल्ह्याहून काकणभर सरस असा कावेबाजपणा आणि आगलावेपणा, बाबाजीचा विचारी आणि जीवनाचे व्यवहारातील बारकावे दाखवून देणारा सावध स्वभाव या साऱ्या गोष्टी मनोहरांनी बारकाव्याने टिपल्या आहेत. बाबाजीची व्यक्तिरेखा तर इतक्या बारीकसारीक तपशिलांनी समृद्ध आहे की, लेखकाला या कादंबरीचं नायकत्व बाबाजीकडे तर सोपवावयाचं नाही ना, असा संभ्रम पडावा ! शिवाच्या मार्गदर्शकाचं मुख्य काम त्याच्याकडे सोपवलेलं आढळतं; परंतु 'राब' ही शिवाची किंवा बाबाजीची रहात नाही. ती त्या परिस्थितीची कहाणी बनते. समाजाचं दर्शन ठरते; पण ही कहाणीही घडवलेली आहे. आधी रेखाचित्रं—व्यक्तिचित्रं, निसर्गचित्रं ठरवली आणि मग त्यांचं एक सुंदर मिश्रण केलं आहे, हे मात्र जाणवल्याखेरीज रहात नाही. पांडबाराव आणि विठोबाअण्णा या पूरक व्यक्तिरेखा. त्या परस्परांनाही अधिक पूरक केलेल्या. त्या तशा करताना एकमेकांत इतक्या मिसळल्या आहेत की, त्यांच्या नावांची अदलाबदल झाली तरी ते लेखकाच्या लक्षात आलेलं नाही. अगदी फायनल प्रुफं वाचतानाही ते नजरेतून सुटून गेलं. याचा नमुना पान १७८–१७९ वरील संवादात सापडतो.

तो भाग पहा : मग मात्र आनशी थांबली नाही. ती तान्हं पोर घेऊन पांडबारावाच्या घरी गेली. पांडबाराव जेवण करून हात धुवायला बाहेर येतात, तो आन्शीनं तान्हं मूल त्यांच्या पायावर घातलं नि हमसाहमशी ती रडत म्हणाली, 'रावांनू, तुमी खूद त्येंना शासन करा. त्येंना तुमच्या पायतानानं मारा, नाय तर गावातून धिंड काढा, पर आमच्यावर राग धरू नका ! मी गावापुढं पदार पसारते, पर आमाला मापी द्या !'

विठोबाराव म्हणाले, 'पोरी, खरं हाय तुजां. पर आता ह्ये गावकीचा काम हाय. मी एकटा काय करनार ? मी जनलोकासी पुन्यांदां बलावतो.'

विठोबानं गावकीपुढं आन्शीचं म्हणणं नीट मांडलं नि विचारलं, 'आसं ना आसं हाय तर त्येवर गावकीचं म्हननं काय ?'

विठोबाअण्णा म्हणाले, '.........'

या साऱ्यात विठोबाअण्णा हे विठोबाअण्णाच आहेत, पण बाकी सारे विठोबा, विठोबाराव हे उल्लेख वस्तुतः पांडबारावऐवजी पडले आहेत.

असे किरकोळ दोष सोडले तर शैली आणि बांधणी सरस आहे; पण थोडंसं आत डोकावायचं ठरवलं तर ? शेवट जसा विनाकारण लांबवलेला वाटेल तसाच ग्रामीण आणि शहरी जीवनाचं नातं जोडण्याचा प्रयत्नही फसलेलाच दिसेल !

हा सांधा मनोहरांना जुळवता आलेला नाही. या दोन संस्कृतीतील तफावत त्यांना दाखवता आलेली नाही; तसंच त्या जोडण्याचा ग्रामसेवक जाधव आणि शिवामार्फत केलेला प्रयत्नही फसवा वाटावा इतका निष्प्रभ आहे. या दोन संस्कृती वेगळ्या दाखवताना त्यांनी जे 'भिरी'चं पाणी त्यांमध्ये सोडलं आहे ते बहुधा या संस्कृतीचा सांधा जुळवणं कठीण वाटल्यामुळंच असावं आणि ते तसं नसेल तर मनोहरांनी दिलेले शहरी जीवनाचे संदर्भ म्हणजे व्यर्थ दवडलेली पानं आहेत, असंच म्हणावं लागेल. त्यांच्या या अपयशामुळंच ग्रामीण साहित्याच्या मळलेल्या वाटा हळुवार पावलांनी तुडवण्यापलीकडे त्यांच्या पदरी फारसं काही पडत नाही. □

**'राब'**
अनंत मनोहर
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
विजयानगर, पुणे ३०.
पृष्ठे : ४१३, किं. : चाळीस रुपये

## नाचती वैष्णव भाई रे

पृष्ठ ८ वरून

सुद्धा स्मरणात नाही; पण भाईंच्या ते लक्षात आहे! माझ्या नव्या लेखनाबद्दल त्यांना उत्सुकता आहे. या पत्राला मी उत्तर लिहिलं नाही. प्रेमाला, आपुलकीला उत्तर द्यायचं नसतं, प्रेमानंच त्याची केवळ जपणूक करायची असते.

या जगातलं सौंदर्य, सौहार्द डोळे भरून पाहण्यात भाईंचं समाधान आहे. हे सौंदर्य आपल्यानंतरही आपल्या डोळ्यांना पाहयला मिळावं ही भाबडी इच्छा तर भाईंच्या नेत्रदानामागं नसेल? माझी ही एक भोळी इच्छा आहे. पु. ल., पी. एल, भाई यांचं आत्मचरित्र वाचायला मिळावं. ते खरंखुरं एका आत्म्याचं चरित्र असेल.

भाईंवर, माझा–तुमचा, तेवढा हक्क निश्चितच आहे.

१९८२ च्या 'कालनिर्णय' दिनदर्शिकेमध्ये समस्त मराठी जनाना नववर्षाच्या शुभेच्छा देताना पु. ल. म्हणतात–

'नवं वर्ष हे सुखाचा चेहरा ओळखायला लावणारं ठरो!'

ते असंही म्हणतात. 'दु:खाची चव पहायला मिळत नाही त्यांना सुखाची चव काय कळणार?'

आयुष्यभर भाईंनी, लोकाना सुखाचा चेहरा ओळखता यावा यासाठी अतोनात प्रयत्न केले. दु:खाची कडवट चव कमी व्हावी यासाठी विनोदाचा आसरा निर्माण केला.

भाईंना दिसलेला 'सुखाचा चेहरा' आणि 'दु:खाच्या अगणित मुद्रा' त्यांच्या आत्मकथनातून वाचावयास मिळाव्यात एवढीच अपेक्षा!

□

# धर्म: बौद्धिक क्रांतीचा शत्रू?

**पुण्यात भरलेल्या बुद्धिप्रामाण्यवाद्यांच्या मेळाव्यापुढे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अध्यक्षीय भाषणात केलेल्या काही विधानांचा त्यांच्याच 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथातील विचारांच्या आधारे घेतलेला परामर्श.**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे धर्म, तत्त्वज्ञान आणि संस्कृति या विषयांतले एक गाढे विद्वान आहेत. मार्क्सवादाचाही त्याचा अभ्यास आहे. त्यामुळे समाजवादी विचारसरणीच्या तरुण कार्यकर्त्यांच्या विविध गटांना त्यांचे वैचारिक नेतृत्व मानवते. विशेषत:, शंकराचार्य, चातुर्वर्ण्य, ब्राह्मण्यवाद इत्यादींच्या संदर्भात तर्कतीर्थ हे त्यांना विशेषच उपयुक्त वाटत असले तर नवल नाही; पण पौर्वात्य आणि पाश्चिमात्य ज्ञान-विज्ञानाचा गाढ परिचय असलेल्या त्यांच्यासारख्या पंडिताकडून समतोल विचाराची अपेक्षा केली तर ते रास्त ठरावे. बुद्धिवादाच्या निकषावर हिंदु समाजातील आचार-विचार तपासून पाहावेत, त्याज्य असेल ते टाकून देण्याबद्दल हिरीरीने प्रचार करावा हे सर्व अगत्याचे खरे, पण तसे करताना हा समाज बुद्धिनिष्ठ, समतावादी, विज्ञानाभिमुख व्हावा, गतिशील आणि समर्थ व्हावा अशी अतिम उद्दिष्टे समोर असावीत. एरवी फक्त वर्णविद्वेष, जातिकलह यांचेच पोषण होईल; बुद्धिवादी विचाराची मुख्य समाजापासून जी फारकत झाली आहे ती कायमच राहील. आजवर अशा विचारवंतांचे जे झाले तेच यांचेही होईल आणि समाज पूर्वीइतकाच दुबळा, छिन्नविच्छिन्न आणि स्थितिशील राहील.

हे सर्व सुचले ते पुण्यात काही दिवसांपूर्वी झालेल्या बुद्धिप्रामाण्यवाद्यांच्या मेळाव्यात तर्कतीर्थांचे जे अध्यक्षीय भाषण झाले त्याच्या वृत्तातामुळे. तर्कतीर्थांच्या भाषणाचे सार असे; 'जगात आज उत्तर व दक्षिण असा वाद उत्पन्न झाला आहे. उत्तरेकडील देश बुद्धीचा वापर करून उत्कर्षाला पोचले. जगातील मोठे धर्म दक्षिणेत वाढले, पण ते देश मागासले. प्रगत देशांना भौतिकवादी संबोधून आपल्या धर्माचे समर्थन करणे ही आत्मवंचना आहे. धर्म हा बौद्धिक क्रांतीचा पहिला शत्रू आहे. नैतिक बुद्धिवादाच्या आधारावर बुद्धिप्रामाण्याचा विचार आपल्याला पुढे चालवावयाचा आहे. आता आपल्याला इहवादी व्हायचे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात अध्यात्मवादाची आत्मवंचना चालणार नाही.' ('म. टाइम्स' १ नोव्हें. ८१) वृत्तं यातल्या काही विधानांवर विचारमंथनाच्या दृष्टीने तर्कतीर्थांनी अधिक प्रकाश पाडणे इष्ट ठरेल.

(१) उत्तरेकडील देश बुद्धीचा वापर करून उत्कर्षाला पोहोचले आणि दक्षिणेतले देश धर्म मानीत असल्याने मागासले.

(२) धर्म हा बौद्धिक क्रांतीचा पहिला शत्रू आहे.

(३) अध्यात्मवादाचा त्याग करून आता इहवादी बनले पाहिजे.

### धर्म आणि ऐहिक उत्कर्ष यांचा विरोध?

बुद्धीचा वापर करून उत्कर्षाला पोहोचलेल्या-अर्थातच पाश्चात्य देशांत धर्म, ही त्याज्य, निदान नगण्य बाब ठरलेली असावी, किंबहुना धर्मनिष्ठेचा पूर्ण त्याग आणि केवळ बुद्धीचा वापर यातूनच त्यांची प्रगती झाली असावी, असा त्यांच्या विधानाचा अर्थ निघतो. प्रत्यक्षात मात्र व्हॅटिकन जागच्या जागी आहे, पोपमहाशयांची धर्मसत्ता प्रबळ, प्रभावी आणि सर्वंकष आहे, धर्मप्रसारार्थ द्रव्य आणि प्रचारक यांचा याच उत्तरेकडील देशांतून जगभर प्रचंड पुरवठा होत आहे आणि बुद्धिनिष्ठ मार्क्सवादाचे बाळकडू दोन पिढ्या प्यायल्यानंतरही रशिया आणि पूर्व युरोपमधील देश याच्यात प्रार्थनामंदिरे, मठ आणि धर्मनिष्ठा याची वाढच होत आहे, असे दृश्य दिसते. राजपुत्र चार्लसचा विवाह हजार वर्षांपूर्वीच्या धार्मिक परंपरेला अनुसरून थाटामाटात होतो आणि युरोपातले कोट्यवधी लोक तो 'धार्मिक' सोहळा उत्कंठेने पाहतात, असेही वृत्तपत्रे सांगतात. रशियातल्या मुस्लिम धर्मीयांची धर्मनिष्ठा इराण-अरबस्तानातल्या मुस्लिमाइतकीच प्रबळ असल्याचे तेथील राज्यकर्त्यांच्या प्रत्ययास

येत आहे, अशाही बातम्या येतात. असे असूनही आकाशातील ग्रहांवर याने जात आहेत, विज्ञानाची घोडदौड किंवा विमानक्षेप चालू आहेच. तेव्हा धर्म आणि भौतिक उत्कर्ष यांचे शंभर टक्के वाकडे असल्याचे तिकडे तरी दिसत नाही. इतकेच नव्हे तर विज्ञानात सर्वाधिक प्रगत असलेले इस्रायली आज दोन हजार वर्षांपूर्वीच्या धर्म-संस्कृतीचे पुनरुज्जीवन विज्ञाननिष्ठेइतक्याच हिरीरीने करीत आहेत, असे वाचावयास मिळते.

### आणि ग्रंथातले विचार

धर्म हा बौद्धीक क्रांतीचा पहिला शत्रू आहे. हे तर्कतीर्थांचे विधान धर्म किंवा अध्यात्मिकता आणि बुद्धीनिष्ठा किंवा ऐहिकता यांच्यात जणू काही पूर्ण विरोध असावा, असे सूचित करते. त्याचे विधान खूप जोरदार आहे आणि आमच्या सामाजिक क्रांतीच्या उत्साही शिलेदारांना वॉशिंग्टनच्या कुऱ्हाडीसारखे ते उपयुक्त ठरणार आहे. तर्कतीर्थांचे चिंतन मात्र निराळाच अभिप्राय व्यक्त करीत असावे, असे 'वैदिक संस्कृतीचा विकास' या त्यांच्या सुप्रसिद्ध ग्रंथातील खाली दिलेल्या विधानांवरून वाटते. (कंसात पृष्ठक्रमांक : आवृत्ती १९७२)

(१) ऋग्वेदकालीन सामाजिक जीवन आशावादी व ऐहिक वैभवाची आकांक्षा बाळगून स्थिरावत होते. जीवनाचे तत्त्वज्ञान ऐहिक जीवनाला प्राधान्य देणारे होते. (६६) (२) मनुष्य ही कल्पना अत्यंत उदात्त अर्थाची द्योतक आहे, असा शोध लागल्यावर ईश्वरालाच पुरुष म्हणजे मनुष्य या संज्ञेने ऋग्वेदातील पुरुषसूक्तात निर्दिष्ट केलेले आहे. ऐतरेय उपनिषदात म्हटले आहे की, 'विश्वशक्तीची सुकृती म्हणजे मनुष्य होय. मनुष्य हा सुकृत म्हणजे पुण्य आहे.' विश्वाबद्दलचे हे विचार हे सांस्कृतिक उत्कर्षाचे सर्वांत श्रेष्ठ गमक होय. (१०३) संगतिपूर्ण व व्यवस्थित विचार (अथवा बोध) म्हणजे तर्क होय. क्षर व अक्षर, नित्य व अनित्य, श्रेय व प्रेय, धर्म व अधर्म, सत्य व असत्य, सत् व असत्, चेतन व अचेतन, जीवात्मा व परमात्मा, माया व ब्रह्म या तऱ्हेचे वैचारिक विभाजन हे तर्कबुद्धीचेच कार्य आहे. (१६२) कठोपनिषदात नीतिशास्त्रविषयक कल्पना अधिक शास्त्रीय झाली आहे. श्रेय व प्रेय असे मनुष्याच्या प्रवृत्तीचे दोन विषय त्यात सांगितले आहेत. तात्पुरत्या योगक्षेमाकरिता व क्षणिक सुखाकरिता बुद्धिमांद्यामुळे मनुष्य प्रेयाकडे ओढला जातो आणि व्यापक हिताच्या विचाराचा उदय झाल्यावर मनुष्य श्रेयाच्या मार्गाने चालू लागतो, असे येथे प्रतिपादले आहे. **आत्मज्ञानाचा आणि सदाचरणाचा अभेद्य संबंध त्या प्रतिपादनात दाखविला आहे.** (२०८) लोकव्यवहार चालवण्याकरिताच धर्म अस्तित्वात आला आहे, ही वेदातील कल्पना व्यासाने विवेचनपूर्वक मांडली आहे. नीतिशास्त्रदृष्ट्या ही कल्पना मूलभूत व व्यापक आहे. (२१२) भारतीय नीतिशास्त्राच्या दृष्टीने पुरूषार्थाची कल्पना फार उपयुक्त आहे. मनुष्याच्या केवळ पारलौकिक ध्येयाचे साधनभूत आचरण म्हणजे नीति, अशी काहींची कल्पना आहे. इंद्रियांच्या गरजांना यत्किंचितही नीतिमूल्य न देणे हे अवास्तव, काल्पनिक व अव्यवहार्य नीतिशास्त्रास जन्म देते. त्यामुळे मिथ्याचार वाढीस लागतो, समतोलपणा नाहीसा होतो. त्यापेक्षा पुरुषार्थाची विचारसरणी अधिक शुद्ध आहे असे सिद्ध होते. (२१५) महाभारतातील शांतिपर्व व अनुशासनपर्व यात धर्मपरिवर्तनाचा इतिहास, राजशास्त्र, नीतिशास्त्र आणि अध्यात्मविद्या यांचे उत्कृष्ट मंथन करून विचार मांडले आहेत. समाज, कुटुंब व व्यक्ति यासंबंधी तात्त्विक मूलभूत विचार सांगितले आहेत. ही महाभारतातली धर्ममीमांसा बुद्धिवादी आहे.

श्रद्धामूलक धार्मिक आचारापेक्षा नैतिक मूलभूत तत्त्वांची श्रेष्ठता प्रतिपादिली आहे. असा वारंवार उपदेश केला आहे की, नैतिक तत्त्वच धर्माचा आधार आहे.

### बौद्धिक उत्क्रांतीचा परिपाक

तर्कतीर्थांचे 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथातले हे विचार पाहिले म्हणजे धर्म, किमानपक्षी हिंदु धर्म, हा बौद्धिक क्रांतीचा शत्रू असण्याऐवजी बौद्धिक उत्क्रांतीचा सर्वोत्कृष्ट, परिपक्व परिपाक आहे असे दिसते. हिंदु धर्मातले अध्यात्म हे तर्कबुद्धीवर आधारलेले आहे आणि आत्मज्ञान व सदाचरण ही अभेद्य आहेत, अशी ग्वाही ते देतात. त्यांच्या मते नैतिक अधिष्ठान हाच धर्माचा सर्वोत्कृष्ट आधार असू शकतो असेही दिसते. निदान महाभारतातल्या तशा अर्थाच्या विधानांचा त्यांनी गौरव केला आहे. सर्वांभूती आत्मौपम्यता हे केवळ सर्वश्रेष्ठ नैतिक मूल्यच नाही, तर हिंदूंच्या सर्व आध्यात्मिक विचारांचे ते सारसर्वस्व आहे, असा तर्कतीर्थांचा निष्कर्ष दिसतो.

तेव्हा तर्कतीर्थांनी आपली अमोघ वाणी, प्रतिपादन-कुशलता, व प्रकांडपांडित्य केवळ निषेधात्मक आणि नकारात्मक प्रचारासाठी वापरू न देता हिंदु धर्माचा हा पथ्यकर, शुद्ध, बुद्धिप्रामाण्यवादी गाभा लोकांसमोर मांडावा आणि जातिभेद, तज्जन्य जन्मजात उच्चनीचता, अस्पृश्यता, समाजविघातक रूढी आणि भोळसर श्रद्धा हे जे 'पाखंड' धर्माच्या नावाखाली समाजात रुतून बसले आहे ते नाहीसे करण्यास प्रवृत्त करावे. हिंदु धर्माइतकीच अन्य धर्मांचीही त्यांनी चिकित्सा करावी आणि आज आठव्या शतकातील समाजाजीवनाचा आग्रह धरणाऱ्या मुस्लिम पुनरुज्जीवनवादातली धर्मांधता आणि बौद्धिक क्रांतीचे शत्रुत्व उघड करावे. एरवी केवळ गर्भित अर्थाने हिंदु धर्मालाच प्रगतीचा शत्रू मानण्याची शिकवण देत राहिल्याने क्षणिक सुखाला प्रवृत्त होणारे बुद्धिमांद्यच विद्वन्मान्य आणि आधुनिक ठरण्याचा धोका आहे.

—व. ल. वष्ट

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र
**एक होता कार्व्हर**
लेखिका : सौ. वीणा गवाणकर
मूल्य : रुपये पंधरा
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

चित्रपट

# हृदय पिळवटून घ्या....

आडनावावरून 'जात' किंवा त्याची पोटजात ओळखण्याचं कसब मराठी माणसाच्या हाडामासी रुजलं आहे अगदी त्याच चालीवर गेल्या दशकाचा अनुभव घेऊन 'शीर्षका'वरून चित्रपटाची कथा सांगायचं कौशल्य मराठी सिनेप्रेक्षकाला गवसलं आहे आणि यामुळंच विशिष्ट चित्रपटांपाशी रेंगाळणारा प्रेक्षकवर्ग आहे आणि विशिष्ट 'शीर्षका' पाशी घुटमळणारे चित्रपट आहेत.

'हळदीकूकू' 'मानाचं कुंकू' 'लक्ष्मी आली घरा' 'थांब लक्ष्मी कुंकू लावते', 'सून माझी लक्ष्मी', 'सौभाग्यलेणं', 'सतीची पुण्याई' अशी नुसती शीर्षकं जरी आठवली तरी या चित्रपटांत तीच उंबऱ्याआडची रडकथा मांडलेली असते. तकलादू दिग्दर्शन, ठरीव प्रसंग आणि तेच नेहमीचेच 'अ'–यशस्वी कलाकार असूनही 'सत्यनारायणाच्या पूजेचं' निमंत्रण असल्यासारखे प्रेक्षक या चित्रपटांना गर्दी करतात. मुख्यत: स्त्रीवर्गावर भिस्त ठेवून 'रिस्क' पत्करणाऱ्या या चित्रपटांना 'कुंकू' लावल्याशिवाय उंबरठा न ओलांडणाऱ्या स्त्रियांची आणि त्यांना तसा उंबरठा ओलाडण्यास अडविणाऱ्या पुरुषाची गर्दी असते.

एकीकडे स्त्रियाच्या डोळ्यातून घळघळा पाणी काढणाऱ्या या 'उपसा' व जलसिंचनयोजनांचा पुरस्कार करणारे हे कुंकूवादी चित्रपट आहेत तर दुसरीकडे बसल्या जागी 'पवित्र' स्थळांची व तीर्थक्षेत्रांची भेट घडविणाऱ्या 'ट्रॅव्हल एजन्सी'ची भूमिका पार पाडणारे चित्रपट आहेत. (उदा. अष्टविनायक वगैरे)

पण हे झाले कुंकवाच्या कोयरीतले शुद्ध 'मराठी' चित्रपट. पांढरपेशांना रिझवणारे, त्यांच्या हुंदक्यांना गोंजारणारे हे चित्रपट आहेत तर 'तोतया ग्रामीण चित्रपट' म्हणून ओळखला जाणारा दुसराही एक 'मऱ्हाठी' चित्रपट आहे. पाटलीण, पाटलाचा पोर, झुज, दगा अशा शीर्षकांशी निगडीत असणारा 'तमाशा'च्या बोर्डाप्रमाणे लटकणारा आणि डफ-तुणतुण्याच्या तालावर डोलणारा हा ग्रामीण चित्रपट ! सूड आणि संघर्षाचं धैर्य या चित्रपटात उभं राहतं तेच पाटीलवाड्याच्या आधारानं.

आता अलीकडे हाच 'मऱ्हाठी' सिनेमा 'पोलिटिकल' बनू लागला आहे. म्हणजे पाटलाच्या जागी सरपंच, सरकारसम्राट मंत्री, आमदार अशा नावाने तो वावरतो इतकेच ! बाकी जुनाच तमाशाचा बोर्ड, तीच लावणी आणि तीच निळू फुले, इतकेच !

एकंदरीत चावून चोथाच नव्हे तर पार कडबा झालेल्या कथा ! वैरण करण्यासही योग्य नसलेल्या कथांवर बेतलेला हा मऱ्हाठी सिनेमा, आमच्या मराठी प्रेक्षकांची पचनशक्ती पुरेशी अशक्त असल्यामुळं रिचवला जातो; तर सणासुदी, व्रत-वैकल्य आणि देवघरापुरतं सीमितच जीवन जगणाऱ्यांना त्याचेच उदात्तीकरण करून दाखविणारा, कुंकूवादी सिनेमाही, मेहूण बोलविल्याच्या थाटात प्रेक्षकांकडून पचवला जातो.

पुण्यात नुकताच प्रदर्शित झालेला अरविंद सामंत यांचा 'अरे संसार संसार' यापेक्षा वेगळा आहे असं म्हटलं जातय ! तो वेगळा आहे कारण त्यात गाव असून पाटील, डफ-तुणतुणं, लावणी या तमाशा पटातील हुकमी प्रसंगाची गुंफण नाही ! ती एका स्त्रीची कथा असूनही उंबऱ्याआडच्या देवघरापाशी तो चित्रपट रेंगाळलेला नाही तर उंबऱ्याबाहेर पाऊल ठेवून परिस्थितीला सामोऱ्या जाणाऱ्या जिद्दी शेतकरी स्त्रीची समस्या उभी करणारा हा चित्रपट आहे!

आता अशी कथा म्हटली तरी तात्काल मेहबूब या सुजाण दिग्दर्शकाच्या 'मदर इंडिया' या चित्रपटाची आठवण होते. त्यातील काही विसंगतीची दखल घेऊनही तो शेतकऱ्याच्या तीन पिढ्यांचं समग्र दर्शन घडविणारा आविष्कार ठरतो. व्यावसायिकता आणि कला यांचा उत्कृष्ट मेळ घालून एक प्रेक्षणीय किंवा शोभादायक देखावा तयार करण्यात मेहबूब पटाईत होता. भडक रंग, तंत्रसफाई, कुशलतेचं वर्चस्व आणि विसंगतरीत्या ठिकठिकाणी पेरलेली गाणी असा आकर्षकपणा साधूनही 'मदर इंडिया'ला वास्तवतेचा स्पर्श होता.

'मदर इंडिया'तील राधा म्हणजे मेहबूबनं इथल्या भारतीय स्त्रीचं केलेलं उदात्तीकरण होतं. सर्व प्रकारचा छळ सोसून, केवळ सूडापायी अनावर झालेल्या आपल्या मुलाकडून, 'नैतिक मूल्ये' पायदळी तुडवली


**– नवीन दाखल झालेली पुस्तके –**

१. **आम्ही मराठी माणसं**–(कथासंग्रह)–दि. बा. मोकाशी
२. **मी मुंबईचा इन्स्पेक्टर**–(लेखकाचे पोलीस-अनुभव)–अरविंद पटवर्धन
३. **हुंगओव्हर**–(कादंबरी)–श्रीकान्त सिनकर
४. **गझल**–मंगेश पाडगावकर
५. **हल्दीघाटीतून कुलूघाटीत**–(प्रवासवर्णन)–प्रा. सौ. मेधा काळे
६. **मर्ढेकरांची कविता** : एक अभ्यास–धोंडो विठ्ठल देशपांडे
७. **सुखाचं फूल**–(कथा)–रविंद्र पिंगे

1. **The Encyclopaedia-Britannica**–(1981–edition)– Rs. 6000/–
2. **Steve McQueen**–(Biography)–Malachy McCoy
3. **Noble House**–(Bestseller–Novel)–James Clavell
4. **Private Practices**–(A Medical Novel)–Linda Wolfe

* " As a general rule the most successful man in life is the man who has the best information "—Benjamin Diraeli.
When you join ' Phoenix ', you get plenty of information.

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC–W 28
(Licensed to post without prepayment of postage–No. 11)

जात आहेत म्हणून, पोटच्या मुलाला गोळी मारणारी राधा, नैतिक मूल्यांचा विजय आणि पुत्रवियोगाचं दुःख,. असा एकाच क्षणी भारतीय 'स्त्री'- आणि 'आई'चं दुहेरी 'नाट्य' मेहबुबनं रुपेरी पडद्यावर साकार केलं आणि म्हणूनच 'मदर इंडिया' यशस्वी ठरला !

राजदत्त दिग्दर्शित 'अरे संसार संसार' हा चित्रपट म्हणजे हे नाट्य वगळून, मदर इंडियाच्या दृश्याबरहुकूम, यातील कलाकारांची कुवत आणि क्षमतेनुसार साकार केलेला 'मदर महाराष्ट्र' आहे !

इथं रत्ना (रंजना) नावाच्या नायिकेचा नववधूपासून वृद्धत्वापर्यंतचा प्रवास रेखाटला आहे. रत्नाकडे आकर्षित झालेला दुष्ट सावकार (अशोक सराफ) तिच्या नवऱ्याचा (कुलदीप पवार) छळ माडतो. परिणामी अनेक आपत्ती ओढवतात. लग्नाचं कर्ज फेडण्यासाठी वाडा व जमिनीवर जप्ती येते; ही दोघं उघडयावर पडतात. नवी उमेद घेऊन रत्ना नवऱ्यात शेती करण्याची जिद्द निर्माण करते, पिकं उभी राहतात ! पण पुन्हा सावकार ती जाळतो, त्यात तो नवऱ्याला मारतो ! रत्ना तीन मुलासह निर्धाराने उभी राहते ! परिस्थितीच्या कात्रीत सापडलेल्या रत्नाला सावकार अनेक आमिषं दाखवतो; पण ती बळी पडत नाही ! तीन मुलाचा संसार उभा राहतो. वैधव्याची जखम घेऊन रत्ना सुख उपभोगत असते ! तोच सावकार मुलाना फूस लावून कुटुंबात बेबनावाचं वातावरण निर्माण करतो. सासू-सुना, जावा-जावाची भाडणं, भाऊबंदकी यांना ऊत येतो, रत्नाची मुलांकडून परवड होते ! हे सारं आता सहन करण्याच्या पलीकडे गेलेलं असतं – तोच व्हायचं तेच होतं. सर्वांना आपल्या चुका उमगतात; पण रत्ना मेलेली असते !

काय, बसला का हृदयाला 'चटका ?' नसेल तर 'अरे संसार संसार' पहा आणि हृदय पिळवटून घ्या ! पंडित महादेवशास्त्री जोशी याच्या मूळ कथेत फेरफार करून (म्हणजे मदर इंडियाची उचलेगिरी करून) तयार केलेला हा चित्रपट वेगळा वाटण्याची शक्यता असली तरी त्यात नाविन्यही नाही, उत्स्फूर्तताही नाही.

'त्या थोर चित्रपटाची माझ्या चित्रपटाशी काय तुलना ?' अशा प्रकारे आपली बौद्धिक दिवाळखोरी जाहीर करणारे निर्मात्याचे उद्गार या चित्रपटाच्या क्षमतेबाबत बरंच काही सांगून जातात ! पण समोर एवढं 'जिवंत' उदाहरण असताना देखील आम्ही तितकी सहजता, कुशलता जमवू शकत नाही हे सागण्याचा प्रामाणिकपणा सामंत यांच्याजवळ असला तरी तो एक 'करंटे'पणा आहे हेही ध्यानात ठेवलेलं बरं!

'मसाला' लिपून कथानक उभं करण्याचा अट्टाहास इथं नसला तरी वटसावित्री, नागपंचमी असे सण, विविध व्रत–वैकल्यं, श्रद्धा, पूजा-अर्चा असे हरएक मराठी चित्रपटात आवर्जून उपस्थित असलेले प्रसंग इथं ओढून-ताणून बसवले आहेत आणि चित्रपटाची रिळं मात्र वाढविली आहेत. (खरं तर या सेल्युलाइडच्या बागडया करून जरी वाटल्या तरी बरंच 'पुण्य' गाठीशी लागल्याचं समाधान मिळेल अणि आमच्या हृदयाची पिळवणूक थाबेल ! )

इतकं असूनही 'अरे संसार संसार'चं वैशिष्ट्य म्हणजे राधानगरीच्या परिसरात केलेलं बाह्य चित्रण ही जमेची बाजू ! रंजनाचा 'आव' मध्यंतरापर्यंत चागला असला तरी नंतरचं वृद्धत्व, निवृत्ती दळवीच्या केश–वेषभूषेचं कसब मानावं लागेल. नर्गिसची तुलना करणं सोयीचं असल तरी त्यातून रंजनाची गैरसोय होईल म्हणून त्याबाबत काही लिहिणं बरं नव्हे !

गुलछबू ठोंबा कुलदीप पवार या चित्रपटात आहे एवढं सागितलं तरी पुरे ! मोहन गोखलेंना आपण 'पुरुषोत्तम करंडक' स्पर्धेच्या स्टेजवर नाही, वा 'हनिडयू'च्या जाहिरातपटात नाही, हे कळायला जरा वेळ लागेल असं दिसतं. त्यामुळं त्याच्या अभिनयाबाबत 'लई सरस !' अस म्हणणं जरा अवघड आहे. (आम्ही हनिडयू पीत नाही हेही त्याला कारण असेल ! )

दोद सुटलेला अशोक सराफ सावकार म्हणून शोभला तरी वागला मात्र तसा नाही. बाकी बुडीत खाती इतकंच !

संगीताबाबत एकंदर 'अनिल-अरुण' आहे. ('अनिल-अरुण' हा आता वाक्प्रचार करायला हरकत नाही.) 'काळ्या मातीत तिफाण चालतं' याची चाल आणि टेकिंग चांगलं आहे. मात्र 'विठूमाउली...' 'वर्षाच्या सणाचा' आणि 'नागोबाला पुजू या...' ही भजनं व आरत्या सर्वच दृष्टीनी भयानक आहेत. चित्रपटातही उगाचंच आहेत.

तेव्हा सागायचा मुद्दा असा की, 'अरे संसार संसार' पहाण्याचा सल्ला आम्ही देऊ तो एका अटीवर आणि ती अट म्हणजे पुन्हा वर्षभर शीर्षकांवर भाळून मराठी सिनेमा पाहणार नाही अशी 'शपथ' घेत असाल तरच !

—कलंदर

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की

सुमती देवस्थळे

मूल्य वहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०